# घटक -१

## कविता एक साहित्यप्रकार

**घटक रचना :**

१.१ प्रस्तावना
१.२ कवितेचे स्वरुप
१.३ कवितेची व्याख्या
१.४ पाश्चात्य परंपरेतील कवितेची व्याख्या
१.५ आकलन आस्वाद
१.६ कवितेचे आकलन
१.७ कवितेची वैशिष्ट्ये
१.८ संदर्भसूची

### १.१ प्रस्तावना

मानवी संस्कृतीच्या अगदी प्रारंभकाळापासून 'काव्य' ही संज्ञा आपल्या जीवनाला सर्वांगाने व्यापून राहिली आहे. कवितेचा जन्मच मुळी भाषेबरोबर झाला असे मानले जाते. मानवी वाणीचा हा पहिला आविष्कार पूर्णत - सर्जनशील स्वरुपाचा होता. 'काव्य' या संकल्पनेची बीजे मूलतः - या सर्जनशील प्रकाराच्या आविष्काराशी निगडीत आहेत. तथापि मानवी वाणी अखंडपणे, सर्वकाळ केवळ सर्जनशील या एकाच पातळीवर राहू शकलेली नाही. सर्जनशीलतेच्या जोडीला तिथे स्थितीशील, सांकेतिक रुपही धारण केले. ही वाणी केवळ मौखिक न राहता तिला लिखित रुपही प्राप्त झाले. भाषेची गद्य-पद्य अशी विभागणी झाली. या प्रक्रियेत निर्माण झालेले विविध लहान-मोठे आविष्कार निरनिराळी नामरुपे धारण करुन 'काव्य' या एकाच संज्ञेखाली राहू लागली.

काव्याच्या संकल्पनेबाबत एकवाक्यता आढळून येत नाही. व्यावहारिक, आकृतिक आणि कलात्मक अशी तीन भिन्न-भिन्न पातळ्यांवरचे अगणित अविष्कार 'काव्य' या एकाच स्थूल आणि सामान्य संज्ञेने संबोधले गेलेले आढळतात. प्रेरणा, प्रयोजन, निर्मिती यानुसार वेगवेगळ्या कालखंडात काव्यविषयक संकल्पना, संकेत, समजुती, भूमिका ह्यात बदल झाले तरी काव्य ही संज्ञा तीच आहे. त्यामुळे कुठे पराकोटीची एकारलेली संकल्पना, तर कोठे एकाच पातळीवरील आविष्कारक्षेत्रात परस्परविरोधी संकल्पना असाही प्रकार दृष्टोत्पत्तीस येतो. त्यामुळे काव्य ही संज्ञा एकाच वेळी एका बाजूला कुठल्या तरी एकाच पैलूभोवती व घटकाभोवती केंद्रित होऊन अतिसंक्षिप्त, संकुचित, कमालीची अव्याप्त व आग्रही होतांना दिसते.

munotes.in

मात्र अशी वस्तुस्थिती असूनही केवळ रसिकालाच नव्हे, तर सर्वसामान्य व्यक्तीलादेखील काव्य ही संज्ञा ओळखीची आणि जवळची वाटते. काव्याविषयीचे एक धूसर कल्पनाचित्र त्याच्या त्याच्या परीने प्रत्येक व्यक्तीच्या मनात असते. दुसऱ्या कोणत्याही वाङ्मयप्रकाराच्या बाबतीत असे दिसून येत नाही. काव्य या संज्ञेचे हे एक वैशिष्ट्यच म्हणावे लागेल.

## १.२ कवितेचे स्वरुप

कविता म्हणजे नेमके काय? नेमकी कोणत्या प्रकारची रचना? कविता कोणकोणत्या घटकांनी आकाराला येते? कथा, कादंबरी, नाटक इत्यादी वाङ्मयप्रकाराहून कवितेचे वेगळेपण कोणत्या घटकात आहे? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे कवितेचे स्वरुप तपासतांना शोधावी लागतात. कवितेच्या विविध व्याख्या करण्याचे प्रयत्न अनेकांनी केलेले दिसतात. प्राचीन काळापासून भारतीय साहित्यशास्त्रात काव्याच्या व्याख्या अनेक साहित्य मीमांसकांनी केलेल्या दिसतात, त्यातील काही निवडक व्याख्या पुढीलप्रमाणे -

१) शब्दार्थौ सहितौ काव्यम् - भामह
२) ननू शब्दार्थौ काव्यम् - रुद्रट
३) शब्दार्थौ सहितौ वक्रकविव्यापारशालिनी बन्धे व्यवस्थितौ काव्यं...
४) तद्दोषौ शब्दाथौ सगुणौ अनलंकृती पुनःक्वापि - मम्मट
५) वाक्यं रसात्मकं काव्यम् - विश्वनाथ
६) रीतीरात्मा काव्यस्य, विशिष्टा पदरचना रीतीः विशेषो गुणात्मा - वामन

वरील काव्याच्या व्याख्या करणारे सारे भारतीय साहित्यातील संस्कृत मीमांसक आहेत. यातील बहुतांश मीमांसक केवळ वाक्यातील शब्द आणि अर्थ यांच्या एकात्मतेला महत्त्व देतांना दिसतात. कुंतलाने काव्यातील सूचक अर्थ महत्त्वाचा मानला तर विश्वनाथ यांनी रसपूर्ण म्हणजेच भावपूर्णवाक्य म्हणजे काव्य असे मानले आहे. मम्मटाने निर्दोष, गुणयुक्त आणि अलंकाररहित रचना म्हणजे काव्य मानले. वामन आपल्या काव्यव्याख्येत गुणयुक्त, रीतीपूर्ण विशिष्ट अशा पदरचनेला काव्य असे मानतो. मात्र हे सारे प्रयत्न समाधानकारक असलेले कवितेमध्ये शब्द, अर्थ नाद, लय इत्यादी घटक असतात. या घटकाची परस्परांशी नते असते आणि या सर्व घटकाचें मिळून संपुर्णाशी नाते असते. हे नाते कसे प्रस्थापित होते पाहणेही महत्त्वाचे आहे. कवितेमध्ये प्रतिमा, रुपक, प्रतिक यांच्या माध्यमातून अर्थ अविष्कृत केला जातो. शब्दयोजना व ओळींची मांडणी यांच्यातून नाद व अर्थाची लय निर्माण केली जाते. या सर्वातून जो एकात्म स्वरुपाचा अर्थ त्याच्या नाद लयीसह सूचित होतो त्याला काव्यार्थ म्हणू. कवितेतील अर्थ काव्यार्थ्याच्या पातळीवर गेल्यामुळे तिला एक सूत्र लागते. या सूत्रामुळे कवितेमध्ये एकात्मता निर्माण होते. कवितेतील भाषिक घटक, अर्थघटक एकमेकांशी अविभाज्यपणे जोडले गेलेले असतात. शब्दांची नादमयता ओळीच्या मांडणीतून निर्माण होणारी लय अर्थघटकांना परिपूर्णता प्राप्त करुन देते. आशय आणि अभिव्यक्ती, शब्द आणि त्यातून अविष्कृत होणारा अर्थ यांच्यात अभिन्नता असते. यालाच कवितेतील सेंद्रिय एकात्मता असे म्हणतात. कवितेच्या अस्तित्वाचा मूलघटक म्हणून सेंद्रिय एकात्मतेचा कवितेच्या संरचनेत महत्त्वपूर्ण स्थान असते.

## १.३ कवितेची व्याख्या

अगदी सुरुवातीच्या काळापासून काव्य म्हणजे काय याविषयी आपल्या समजुतीनुसार विवेचन केलेले आढळते. काव्याच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे देता येतील.

| | | |
|---|---|---|
| भामह | - | काव्यात शब्द आणि अर्थ दोहोंनाही सारखेच प्राधान्य असते. |
| मम्मट | - | दोषरहित, गुणांनी युक्त आणि सामान्यतः अलंकारांनी युक्त परंतु क्वचित तसे नसलेले शब्द आणि अर्थ म्हणजे काव्य |
| जगन्नाथ पंडित | - | रमणीय अशा अर्थाचे प्रतिपादन करणारे शब्द म्हणजे काव्य |
| वामन | - | रीती म्हणजे शैली हाच काव्याचा आत्मा आहे |
| आनंदवर्धन | - | ध्वनी हाच काव्याचा आत्मा होय |
| विश्वनाथ | - | रसात्मक वाक्य म्हणजे काव्य |
| कार्लाईल | - | लयबद्ध विचार म्हणजेच काव्य |
| पो | - | काव्य म्हणजे सौंदर्याची लयबद्ध निर्मिती |
| हॅलझिट | - | काव्य ही कल्पना आणि भावना यांची भाषा होय |
| वर्डस्वर्थ | - | उत्कट भावनेचा उत्स्फूर्त आविष्कार म्हणजे काव्य |
| ह.ना.आपटे | - | काव्याचे घटकावयव तीन दिसतात, नाद, अर्थ आणि ध्वनी, नुसती शब्दरचना म्हणजे काव्य नव्हे. ती नादवती, अर्थवती व ध्वनीवती पाहिजे. शब्द यथोचित पाहिजेत. बाह्यर्थ सुंदर पाहिजे. त्या बाह्यार्थाच्या अंतरंगी असणारा जो अर्थ जो रसिकाने आपल्या रसिकतेनेच काढावा लागतो तो अर्थही फार सुंदर पाहिजे. |
| रा.श्री. जोग | - | काव्य ही एक कला आहे व तिचे शिल्प, चित्र, नर्तकलाबरोबर साधर्म्य आहे. या साऱ्या कलांचे अस्तित्व त्यातील सौंदर्यदर्शनावर अवलंबून आहे. |
| सुधीर रसाळ | - | प्रतिमांची सेंद्रिय रचना म्हणजे कविता होय. |
| वसंत डहाके | - | नादवती, अर्थवती, ध्वनिवती शब्दरचना म्हणजे कविता |

काव्याच्या वर दिलेल्या व्याख्यांमधून कवितेची विविधता व्यक्त झाली आहे. संपूर्ण कवितेची अशी व्याख्या करता येत नाही. कविता ही स्वानुभवाचा विषय आहे. या सर्व दिसत नाहीत. पाश्चात्य साहित्य परंपरेतही काव्याच्या व्याख्या करण्याचे प्रयत्न झालेले दिसतात. त्यांचा थोडक्यात परामर्ष घेणे आवश्यक ठरावे.

## १.४ पाश्चात्य परंपरेतील कवितेची व्याख्या

1) Poetry is the spontaneous overflow of powerful feelings… Emotion recollected in tranquility - वर्डस्वर्थ

munotes.in

2) The rhythmic creation of beauty - एडगर ॲलन पो
3) The best words in best order - कोलरिज
4) Poetry is the antithesis of science - अर्नोल्ड
5) The most delightful and perfect form of utterance that human words can reach - कार्लाइल

वरील काव्यव्याख्या कवीमनातून उत्स्फुर्तपणे प्रकट झालेल्या भावना म्हणजे काव्य, भावनांची लयबद्धनिर्मिती, संगीतमय निर्मिती आणि विचारविरोधी कृती म्हणजे कविता असे सांगण्यावर या समीक्षकांचा अधिक भर असलेला दिसतो. कोलरिजने उत्तम प्रकारच्या रचनेबरोबर बुद्धीवादी विचारांपेक्षा भावनाशील कृतीला कवितेत महत्त्वाचे मानले. अर्नोल्ड यांनी वृत्तछंदाला कवितेत प्राधान्य दिले. तरीही या काव्यव्याख्या आजवरच्या काव्यलेखनाकडे पाहिल्यास परिपूर्ण आहेत. समग्र काव्याच्या स्वरुपाच्या शक्यतांच्या विचार मांडणाऱ्या आहेत असे म्हणता येत नाही.

हे सर्व संकेत ओलांडून काव्य प्रकट होऊ शकते. म्हणून काव्याच्या स्वरुपाचा विचारही व्यापक पातळीवरुन करावा लागतो.

यावरुन कवितेच्या स्वरुपामुळे कोणतीही एक समर्पक व्याख्या करता येणे शक्य नाही असे लक्षात येते. त्यामुळे कविता म्हणजे काय? या प्रश्नाचे उत्तर शोधताना अनेक शक्यता गृहित धराव्या लागतात. सातशे वर्षाच्या मराठी काव्यपरंपरेतील काव्यलेखनाच्या आधारे वसंत आबाजी डहाके यांनी कविता या लेखनप्रकाराचे स्वरुप सांगताना असे म्हटले आहे की, कवितेत शब्द असतात, त्याची मांडणी काही एक क्रमानुसार केलेली असते. अशा वेळी गद्य वाक्यांप्रमाणे कर्ता, कर्म, क्रियापद अशा नसतात. कधी कर्ता, कर्म तर कधी क्रियापद अयाह्रद असते. कवितेत शब्दांच्या नादाला अधोरेखीत केलेले असते. ओळीमधे लय असते. एकापुढे एक ठेवलेल्या शब्दांच्या अनुक्रमातून लय उत्पन्न होते. कविता छंदात, वृत्तात मुक्तशैलीत असते. कवितेतून एखादी कथा सांगितलेली असते. विचार सांगितलेला असतो. भाव व्यक्त झालेला असतो. भावनाची अभिव्यक्ती झालेली असते. स्थितीचे चित्रण केलेले असते. प्रसंग मूर्त केलेला असतो. घटनाप्रसंगावरचे भाष्य असते. श्रोत्यांना किंवा वाचकांना आवाहन असते. कवितेत अलंकार, प्रतिमा, प्रतीके असतात. प्रत्येक कवितेतून कवीचा निवेदकाचा सूर ऐकू येत असतो. कवितेतून कवीची जीवनदृष्टी व्यक्त होत असते. कवितेचे आकारमान एका ओळीपासून असंख्य ओळीपर्यंत असू शकते. म्हणजे एका ओळीची कविता असते, पंधरा हजार ओळींची कविता असते. ओळींची संख्येवरुनही. मात्र कविता एका ओळीची असणे शक्य आहे तरी कथा, कादंबरी, नाटक या बाबतीत म्हणता येत नाही... कवितेत संगीत नाट्य आणि चित्र या कलांमधून आलेले गुणविशेष आढळतात. (वसंत आबाजी डहाके, कवितेविषयी, स्वरुप प्रकाशन औरंगाबाद पृ. ०१३) डहाके यांनी सांगितलेले कवितेचे स्वरुप म्हणजे कवितेच्या अनेक शक्यता आहेत.

कवितेचे स्वरुप विचारात घेतांना कवितेची विविध वैशिष्ट्ये विचारात घ्यावी लागतात. यातूनच कवितेच्या शक्यतांसह अन्य साहित्यप्रकाराहून कविता कोणकोणत्या बाबतीत भिन्न आहे याचाही उलगडा होत जातो.

## १.५ आकलन आस्वाद

एखादी कविता आपल्यासमोर सादर केली जात आहे. असे आपण गृहीत धरु. कवितेचे सादरीकरण करणारा त्या कवितेची भावलय पकडून पहिल्या शब्दापासून अखेरच्या शब्दापर्यंत जेव्हा वाचत जातो. तेव्हा त्या शब्दाचा नेहमीपेक्षा वेगळा अनुक्रम, त्यातून निर्माण होणारा तद्‌बंध आपणास घेरीत जातो. आपल्या मनात विशिष्ट भावृत्ती जागृत होऊ लागते. ही भाववृत्ती काही प्रमाणात कवीच्या प्रवृत्तीशी सुसंवादी असते. विशिष्ट लयीत कवितेचे वाचन होत असतांना आपणांस कवितेची प्रचीती येते. परंतु या प्रचीतीचे स्वरुप जर आपल्याला फारसे साधत नाही. त्यामुळे काव्य ऐकले, या काव्याचा मनावर परिणाम झाला पण कवितेचा अर्थ मात्र कळला नाही असा अनुभव कविता ऐकतांना येतो.

'ग्रेस' या कवीच्या बहुतेक कविता लय, छंद, नाद यांच्या प्रभावाने विलक्षण झपाटून टाकणाऱ्या आहेत. पण त्यांचा अर्थ कळतोच असे नाही.

उदा.

संदिग्ध घरांच्या ओळी  
आकाश ढवळतो वारा  
माझ्याच किनाऱ्यावरती  
लाटांचा आज पहारा

या अनुक्रमात आपणास जे सौंदर्य जाणवते ते वाचनातील शब्दोच्चारांच्या नादामुळे, अर्थाच्या लयीमुळे. सौंदर्य प्रतीतीची ही प्रक्रिया आस्वाद होतांना जाणवत असते. या वेळी आकलनाची प्रक्रिया अगदीच सुरु झालेली नसते. असे नाही. आकलन आणि त्यानंतर आस्वाद असा क्रम तेथे नसतो. ती जणू एकाच वेळेस घडणारी प्रक्रिया असते. त्याच वेळेस त्या कवितेचे मूल्यमापनही आपण करतो. वरील कडवे आस्वादायला सोपे पण आकलनासाठी अवघड होत जाते. अशावेळी कवितेच्या आकलनासाठी आपल्याला कवीच्या मार्गाचाच अवलंब करावा लागतो. म्हणजे कवी कविता लिहून झाल्यावर त्या कवितेमध्ये काही दुरुस्त्या करतांना स्वतःला निर्मितीच्या मनोवस्थेमध्ये ज्याप्रमाणे नेतो त्याप्रमाणे कवितेचे आकलन करतांना रसिकाचे मन कवितेच्या भावलयीने भारले गेलेले, ओथंबून गेलेले असले पाहिजे. अशा अवस्थेत असतांनाच केव्हातरी कवितेचे आशयसूत्र उलगडू लागते.

आपण कवितेचे वाचन करु लागतो. तेव्हाच आपल्या मनात आस्वाद, आकलन आणि मूल्यमापन या प्रक्रिया सुरु होतात. कवितेतील शब्द आपल्या मनात हळूहळू भावजागृती करु लागतात. या शब्दांमधूनच कवितेच्या अर्थापर्यंत जाण्याचा मार्ग आपल्याला सापडू लागतो.

## १.६ कवितेचे आकलन

एखाद्या कवितेचे आकलन होणे म्हणजे त्या कवितेतील अनुभवाचा साक्षात प्रत्यक्ष देणे अशा प्रकारच्या प्रत्ययाला कवितेची प्रचीती असे म्हणतात. कवितेचे आकलन किंवा ग्रहण भाषेच्या शैलीच्या अनुभवाच्या पातळीवर झाले म्हणजे कवितेची प्रचिती येते.

### १.६.१ कवितेची दृश्य मांडणी :

कविता हा वाङ्मयप्रकार अन्य वाङ्मयप्रकाराहून वेगळा ठरतो त्याच बरेचसे श्रेय तिच्या दृश्य मांडणीत सामावलेले असते. तोडलेल्या ओळी, कडवी किंवा वाक्यांचे खंड अशी विशिष्ट दृश्य मांडणी असल्यास तिला सर्वसाधारण कविता असे समजण्यात येते.

सकाळपासून रात्रीपर्यंत
तेच ते! तेच ते!
माकडछाप दंतमंजन;
तोच चहा, तेच रंजन
तीच गाणी, तेच तराणे;
तेच मूर्ख, तेच शहाणे;
सकाळपासून रात्रीपर्यंत
तेच ते! तेच ते!

(विंदा करंदीकर)

किंवा

करितो आदरे। सद्‌गुरुस्तवन
ज्यांनी सत्यज्ञान। वाढविले

(विंदा करंदीकर)

अशा मांडणीच्याही विविध शक्यता असतात. काहीवेळा परिच्छेदासारखी रचना करुन कवितेची मांडणी केली जाते. वसंत गुर्जर यांची आम्ही माणूस म्हणून जन्माला आलो ही कविता किंवा प्रवीण बांदेकरांच्या खेळखंडोबाच्या नावानं या काव्यसंग्रहात अनेक काव्यखंड परिच्छेद वजा असलेले दिसतात. त्यामुळे दृश्य मांडणी हेच कवितेचे एकमेव लक्ष्य मांडता येत नाही. भावकविता आणि शाहिरी कविता आणि अभंगकविता, मुक्तछंदातील कविता अशा वेगवेगळ्या काव्यप्रकारात दृश्य मांडणीला महत्त्व असते. या दृश्य मांडणीमुळे कविता, कथा, ललित निबंध अशा लेखनाहून वेगळी ठरत असते. दृश्यात्मकतेबरोबर लय हा घटक कवितेच्या संहितेला खूप प्रभावित करीत असतो.

### १.६.२ लयबद्धता किंवा नादमयता :

कविता लयबद्ध असते. नादमयता हा काव्याचा एक महत्त्वाचा विशेष मानला जातो. वृत्तछंदाच्या वापरामुळे आणि यमक रचनेमुळे कवितेत लय निर्माण होते. गद्यभाषेत लयबद्धता नसते. त्यामुळे कविता गद्यातून भिन्न ठरते. कवितेतील लय तिच्यातील वेगवेगळ्या घटकातून आविष्कृत होते. कवितेतील लय तिच्यासाठी निवडलेल्या वृत्तछंदातून जशी आविष्कृत होते तशीच ती तीच्यातील शब्द, नाद, नादशब्द, यमके, अंतर्यमके, अनुप्रास, प्रतिमा, प्रतीके, शब्दांची किंवा ओळींची पुनरावृत्ती इत्यादी घटकांतूनही आविष्कृत होत असते. ती या वेगवेगळ्या घटकांच्या परस्पर प्रक्रियेतूनही सिद्ध होत असते. (पाटणकर, वसंत, कवितेचा शोध, पृ. ७६, मौज प्रकाशनगृह) कवितेतील लय अनुभवाची एकात्म झालेली असते.

या माझ्या पंखांनी
उडण्याचे वेड दिले
पण माझ्या हातांनी
घरटे हे निर्मियले

(मंगेश पाडगावकर)

कवितेच्या वरील कडव्यामध्ये लयबद्धता आली ती पंखांनी-हातांनी, वेड दिले-निर्मियले अशा यमक रचनेमुळे आली आहे. शिवाय उडण्याचे वेड पण घरट्याची निर्मिती यातून गतीशीलता आणि स्थितीशीलता असा आशयातील विरोधी ताणही व्यक्त होतो.

कवितेतील लय मात्रावृत्ते, अक्षरगणवृत्ते यातूनही आणली जाते. मध्ययुगीन कालखंडातील पंडिती काव्यातून अशी कविता विपूल प्रमाणात लिहिली गेली आहे. पुढे केशवसूत, ते रविकीरणमंडळाची कविता इथपर्यंत वृत्तछंदाचे अनेक प्रयोग केले गेले. मर्ढेकरांनीही ओवी अभंग या छंदाचा वापर आधुनिक आशय व्यक्त करण्यासाठी केलेला दिसतो. अलीकडे मुक्तशैलीतील कविता मोठ्या प्रमाणात लिहिली जाते. या प्रकारच्या कवितेत वर्णांच्या पुनरुक्तीतून, अनुस्वारयुक्त वर्णाच्या वापरातुन, शब्दबंध किंवा शब्दबंधाच्या पुनरावृत्तीतून लय निर्माण केली जाते. उदा.

पुष्कळ अंग तुझं, पुष्कळ पुष्कळ मन;
पुष्कळातली पुष्कळ तू
पुष्कळ पुष्कळ माझ्यासाठी

(पु.शि. रेगे)

या कवितेत रेग्यांनी पुष्कळ या शब्दाच्या पुनरावृत्तीतून विशिष्ट नादमयता निर्माण केलेली दिसते.

वृत्तछंदात्मक कवितेत लयीच्या प्रभावामुळे भावनांची उत्कटता आणि एका विशिष्ट भारलेपणाचा प्रत्यय येतो असे म्हटले जाते यासाठी पुढील उदा. पाहता येईल.

भरले ताम्हण तरली गंगा हात शुभंकर झाले
तीर्थाआधी स्वरगंगेचे पाणी डोळा आले
मिटले लोचन उरात भरली दिशातील पुण्याई
कविते आई तुला भेटलो म्हण आता अंगाई

(वसंत सावंत)

अशा शब्द योजनेमुळे कवितेची मंत्रात्मकता वाढतांना दिसते. मात्र असे भारलेपण मुक्तशैलीतील कवितेतही प्रत्ययाला येते. उदा. भालचंद्र नेमाडे यांची कशा रांगोळ्या घालता तूम्ही घरंदाज व्यथांनो... किंवा करंदीकरांची यंत्रावतार या कविता अशा भारलेपणाचा प्रत्यय देतात. मुक्तशैलीतील कवितेत आंतरिक लय असते असे मानले जाते. वर म्हटल्याप्रमाणे शब्दांची, वर्णाची पुनरावृत्ती, विरामचिन्हांचा वापर यातून ही लय प्रकट होते. लयीची बदललेली कल्पना आज पुढे आलेली दिसते.

### १.६.३ वाच्यार्था पलीकडील अर्थ :

कवितेत वाच्यार्था पलीकडे जाणारा एक अर्थ असावा अशी अपेक्षा केली जाते. लक्षार्थ आणि ध्वन्यर्थ यामुळे कवितेचा आशय वाच्यार्थापलीकडे जात असतो. काव्याच्या पहिल्या अर्थापेक्षा तिचा दुसरा, तिसरा अर्थ महत्त्वाचा असतो. गद्यभाषा ज्ञानभाषा म्हणून कार्य करीत असते. त्यामुळे तीमधून वाच्यार्थाहून अलग अर्थ प्रकट झाल्यास कल्पना, विचारात गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असते. तसेच गद्यभाषा व्याकरणाच्या नियमांना आधार ठेवून रचावी लागते. व्याकरणिक संकेताची मोडतोड केल्यास नेमका अर्थ तयार होण्यास अडथळा निर्माण

munotes.in

होतो. म्हणून ज्ञानभाषा ही एकच एक अर्थ व्यक्त करणारी असावी लागते. मात्र कवितेच्या बाबतीत नेमके उलट असते. जेव्हा कविता एकाहून एक अधिक अर्थ व्यक्त करते तेव्हा तिचे मूल्यही वाढत जाणारे असते.

कुसूमाग्रजांची अहिनकूल ही कविता केवळ साप किंवा मुंगस यांच्यातील संघर्ष रेखाटते, इतक्या वाच्यार्थाच्या पातळीवर न राहता राक्षसी शक्तींचा प्रतिकार करुन त्यांना नामोहर करणाऱ्या, जिंकून घेणाऱ्या संघर्षशील प्रवृत्तीचे रुपक उभे करते. दया पवार यांच्या पाणी, धरण इत्यादी कविता वाच्यार्थाच्या सीमा ओलांडून शोषितांच्या कारुण्यमय, अभावग्रस्त जीवनाचे सूत्र रेखाटतांना दिसतात.

लक्षार्थ आणि ध्वन्यर्थ यातून कवितेत एकाहून अधिक भाववृत्तींचे दर्शन घडवण्याची क्षमता असते. प्रतीक, प्रतिमा, रुपक यांच्या योजनेमूळेही काव्यात सुचितार्थ प्रकट होत असतो. हा सुचितार्थ गुंतागुंतीचा असतो तेव्हा कवितेला विशेष प्रकारची मूल्यवत्ता लाभते. काव्यार्थाचे प्रतीकात्मक पातळीवरुन व्यक्त होणे, कविता आणि अर्थ यांचे अभिन्नत्व निर्माण होणे या प्रक्रिया सुचितार्थामूळे घडतात. अर्थात काव्यातील विविध भाववृत्ती किंवा सुचितार्थ वाचकांना आस्वादाच्या सहसर्जक प्रक्रियेत जाणवत असतात. म्हणून काव्याचे वाचन सर्जनशील असावे लागते.

असे असले तरी साऱ्याच कविता वाच्यार्थाच्या पलीकडे जाऊन अर्थ व्यक्त करतात असे नाही. यामूळे त्या कविता निकृष्ठ असतात असे नाही. विषमतापूर्ण सामाजिक संकेतांवर प्रहार करणाऱ्या अनेक कविता वाच्यार्थाच्या पलीकडे न जाताही महत्त्वाच्या ठरतांना दिसतात. इतकेच की सुचितार्थ महत्त्वाच्या मानल्यास या कविता सामान्य ठरतात.

### १.६.४ कवितेची अनेकार्थता :

अनेकार्थता हा काव्याला उच्च पातळीवर घेऊन जाणारा एक विशेष मानला जातो. पाश्चात्य समीक्षा विचारात विल्यम एम्पसन यांने काव्यातील अनेकार्थतेचे तत्त्व मांडले. कवितेच्या भाषेत एकाचवेळी अनेक अर्थ व्यक्त करण्याचे सामर्थ्य असले पाहिजे जे शास्त्रीय भाषेत नसते कवी कमीतकमी शब्दातून जास्तीत जास्त अर्थ व्यक्त करीत असतो. कवीच्या भाषेत जास्तीत जास्त अर्थ व्यक्त करण्याची क्षमता असते त्यालाच एम्पसनने अनेकार्थता असे म्हटले आहे. मराठीत कवी बी यांची चाफा बालकवींची औंदुबर, मर्ढेकरांची पिपांत मेले ओल्या उंदीर, कवी वसंत सावंत यांची बैल अशा अनेक कविता अनेकार्थता या तत्त्वाने संघटित झालेल्या दिसतात.

## १.७ कवितेची वैशिष्ट्ये

### अ) भाषिक अवकाश

स्फुटता किंवा भाषिक अवकाशाचे लघुत्त्व हे कवितेचे एक रुपवैशिष्ट्य मानले जाते. मात्र केवळ भावकवितेच्या बाबतीत हे गृहित धरता येते. भावकविता अल्पाक्षरत्त्व या विशेषाने युक्त असु शकते. संतांचे अनेक अभंग भाषिक अवकाशाच्या बाबतीत कमीतकमी शब्दात असले तरी त्यांची अर्थ व्यक्त करण्याची क्षमता मात्र अधिक असलेली दिसते. आधुनिक मराठी

कवितेत पु.शि. रेगे यांच्या अनेक कविता अल्पाक्षर असूनही व्यापक आशय व्यक्त करतांना दिसतात.

ज्ञानेश्वरी, दासबोध हेही काव्यग्रंथच आहेत. या ग्रंथाच्या बाबतीत हे तत्त्व लागू पडणारे नाही. किंबहुना आजही खंडकाव्यसदृश्य कविता लिहिली जाते. तिलाही हा निकष लावता येणार नाही.

**ब) आशयाची संवेद्यता**

आशयाची संवेद्यता म्हणजे कवितेतून जाणवणारी भावप्रतीची होय. जेव्हा कविता वाचता वाचता वाचकाला त्यातील शब्दांच्या माध्यमातून जी अनुभवाची प्रतीती येते. तिलाच संवेद्यता असे म्हटले जाते. कवितेने भावप्रतीती द्यावी अशी अपेक्षा धरली जाते. लयीचा, नादमयतेचा वापर, विशिष्ट प्रकारची शब्दकळा, रुपके इत्यादी घटकांच्या आधारे कवितेत संवेद्यता प्रकट होत असते.

**क) निवेदक**

कवितेत कथा आणि कादंबरी प्रमाणे एक निवेदक असतो. मात्र हा निवेदक कथा कादंबरीतल्या निवेदकाहून भिन्न असलेला दिसतो. कविता हा आत्मनिष्ठ वाङ्मयप्रकार असल्यामुळे कवितेतील निवेदक अधिकाधिक प्रत्यक्ष जीवनानुभवाकडे जात असतो. मात्र हा निवेदक स्वचे भावविश्व किंवा विचारविश्व अभिव्यक्त करीत असतांना तो स्वतःला व्यापक अशा समाजमनाशी जोडून घेत असतो. सौंदर्यवादी कवितेतील निवेदक आणि प्रत्यक्ष कवी यात एकात्मताच असते. काही कवितात मात्र तटस्थ निवेदक असतो. तो काव्यात अनुभव आत्मनिष्ठ पातळीवर न व्यक्त करता वस्तूनिष्ठ पातळीवरुन व्यक्त करतो. उदा. पंडिती कवितेतील निवेदक, संतांच्या कवितेतील निवेदक व्यापकपणे कोणत्याही भक्ताच्या रुपात अभिव्यक्त होतांना दिसतो.

**ड) प्रतीमा, प्रतीक, रुपक, मिथके**

कवितेच्या भाषेत प्रतीमा, प्रतीक, रुपक आणि मिथकथा यांचा वापर केल्यामूळे कवितेच्या भाषेला विशेषप्रकारचे अर्थसौंदर्य लाभते. कवितेत अनेकार्थता प्रकटते म्हणून त्याचे स्वरुप थोडक्यात पाहणे आवश्यक ठरावे.

➢ **प्रतीमा**

कवितेत अनेक प्रकारच्या प्रतिमांचा वापर केला जातो. कवीला जो जीवनानुभव आलेला असतो तो व्यक्त करण्यासाठी त्याने योजलेला वाचक शब्द म्हणजे प्रतीमा होय. अशा शब्दाद्वारे कवी आपल्या जाणीवा, संवेदना व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत असतो. ऐंद्रिय संवेदना प्रतिमेतून व्यक्त होत असतात. वाचकांच्या मनातही अशाच अर्थाची प्रतिमा निर्माण होत असते.

उदा.

सर्वत्र नांग्या असलेली स्तब्धता
ओठ मुरडलेली दारं
उद्ध्वस्त दगडी पायऱ्यांवर
एक जुनंपुराणं तंतूवाद्य
राहून गेलंय घाबरल्यासारखं
मला तिथवर पोचायचं आहे (वसंत आबाजी डहाके)

मनातील भयाचे भाव, सभोवती पसरुन राहिलेली दहशत व्यक्त करण्यासाठी कवीने या काव्यखंडात वापरलेल्या विविध प्रतीमा वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या दिसतात.

प्रतीमांमधून कवीच्या अंतर्मनाचे दर्शन घडू शकते. व्यक्तीच्या अबोध मनात अनेक जाणीवा संवेदना दडलेल्या असतात. काव्यनिर्मितीच्या क्षणी या संवेदना मूर्त अशा प्रतिमांचे रुप धारण करुन काव्यातून प्रकट होत असतात. या प्रतिमांना कवी नवे अर्थ देत असतात. त्यामुळे समकालीनता, ताजेपणा अर्थवाहीपणा, उत्कटता असे अनेक गुण प्रतिमेला प्राप्त होत असतात. गंध स्पर्श, दृश्य, श्रवण या संदर्भातील प्रतिमा काव्यात प्रकटतात. तसेच आदिमकाळापासून मानवी मनात वसत असलेल्या आदिबंधात्मक प्रतिमा, सामाजिक प्रतिमा, निसर्ग प्रतिमा, असे प्रतिमांचे विविध प्रकार सांगितले जातात.

➢ **प्रतीक**

प्रतीक म्हणजे अर्थाची खूण किंवा चिन्ह होय. कोणताही शब्द जेव्हा विशिष्ट अर्थाचा निर्देश करतो तेव्हा त्याला प्रतीक म्हटले जाते. सांस्कृतिक जीवनात माणसे अनेक प्रकारच्या चिन्हांचा वा खुणांचा वापर करुन अर्थ व्यक्त करीत असतात. उदा. राजकीय पक्षांची चिन्हे, कुस, कळस, कुंकू, चुडा किंवा देवादिकांच्या मूर्त्या ही सुद्धा सांस्कृतिक अर्थ व्यक्त करणारी चिन्हेच आहेत. जीवनाच्या विविध क्षेत्रात अर्थ व्यक्त करण्यासाठी अशा प्रतिकांचा वापर केला जातो. प्रतीके ही सामूहिक जीवनातून प्राप्त झालेली असतात.

भाषासृष्टीत कवी आपल्या काव्यात व्यक्तिनिष्ठ पातळीवरुन प्रतीकांचा वापर करीत असतात आणि त्यांना सार्वत्रिक आशय देण्याचा प्रयत्न करतात. मर्ढेकरांनी मुंगी, ओल्या पिंपात मेलेले उंदीर ही प्रतीके तर कुसूमाग्रजांनी अहिनकुल, आगगाडी आणि जमीन, बालकवींचे पारवा, करंदीकरांनी निळा पक्षी, वसंत सावंत यांनी बैल अशी प्रतीके वापरलेली दिसतात. चंद्र, सूर्य, अग्नी, नंदीबैल, वटवृक्ष अशी अनेक प्रतीके काव्यात वारंवार वापरली जातात.

➢ **रुपक**

काव्याची भाषा रुपकात्मक असते. अर्थ व्यक्त करण्याची विशिष्ट पद्धत म्हणजे रुपक होय. एखाद्या शब्दातून दूसऱ्या गोष्टीतील साम्य, सरुपता, किंवा सरुपकता व्यक्त करण्याचा प्रकार म्हणजे रुपक होय. एखादी कल्पना विचारभावना यातील साम्य रुपकातून व्यक्त केले जाते. लाक्षणिक प्रयोगातही रुपकात्मकता असते. उदा. तो सिंहासारखा आहे. खुर्चीचे पाय, टेबलाची पाठ, छंदाचे चरण इत्यादी शब्दप्रयोगातही रुपकभाव असलेला दिसतो.

संत एकनाथांनी आपल्या भारुड रचनेत अनेक प्रकारची रुपके वापरलेली दिसतात. त्यांच्या भारुडात विंचू, एडका, रोडगा, भोळी ही रुपके आध्यात्मिक अर्थ व्यक्त करण्यासाठी येतात. रोडगा या भारुडात सासरा, सासू, नणंद, दीर, जाऊ, नवरा ही रुपके षडरिपूंचे अर्थ व्यक्त करतात. आधूनिक काव्यातही अनेक कवींनी रुपकांचा वापर काव्यासाठी केलेला दिसतो. उदा.

पिवळ्या डागासारखा दिसे निस्तेज चंद्र
पितळी जाड घांटेसारखा उंच तरुस लोंबणारा
वाटे अभद्र!! (शरदचंद्र मुक्तिबोध)

किंवा

दगडातही परी असतात...
काही असतात नुकतेच दगड
काही विठ्ठल रुक्मिणीसारखे परखड
काही कोडगे... काही घनचक्कर
असलाच तर एखादा रोंदाचा थिंकर (सदानंद रेगे)

अशा रुपकातून नवनिर्मिती होत असते. लेखक आपली जीवनदृष्टी व्यक्त करण्यासाठी समान अर्थाचे बंध सातत्याने शोधत असतो. विविध स्थळे, काळ, आणि समाज जीवनातील विविध घटना यांचे चित्रण रुपकात्मकतेने केले जाते. इंदिरा संत यांनी आपल्या मृदगंध या ललितलेख संग्रहात नद्यांना धरित्रीच्या कविता असे म्हटले आहे. हा ही रुपकभाव होय.

- **मिथके**

मिथके म्हणजे पुराणातील कथा, दिव्यकथा किंवा पारंपारिक रीतीने चालत आलेल्या लोककथा होत. प्राचीनकाळापासून मानवी जीवनात अनेक कथा दंतकथा पुराणकथा आणि लोकजीवनातून चालत आलेल्या असतात. त्यांना त्यांचे असे मूळचे अर्थ असतात. मात्र लेखक या दंतकथांना आपल्या कल्पनाविलासाने आणि प्रतीभेने नवे अर्थ बहाल करीत असतात. मिथकातून मानवी जीवनाच्या त्यातील आदिमत्वाचा शोध घेतलेला असतो. निसर्ग आणि मानवी नातेसंबंध, अमानवी किंवा ईश्वरी संकेत व मानवी जीवन यांचा संबंध शोधण्याचा प्रयत्न मिथकांच्या आधारे केला जातो. चिरंतन मानवी भावनांचा अर्थ लावण्यासाठी मिथके उपयुक्त असतात.

पु.शि. रेगे यांनी आपल्या कवितेत राधाकृष्ण, अहिल्या, शहनाज, अशी मिथके योजलेली दिसतात. तर सदानंद रेगे यांनी इराकस, सिसिपस अशा ग्रीक कथाविश्वातील मिथकांचा वापर केलेला दिसतो. वसंत आबाजी डहाके यांच्या शुनःशेप या काव्यसंग्रहाच्या प्रारंभी पुराणातील शुनःशेपाची कथा समकालीन काव्यार्थ व्यक्त करण्यासाठी प्रातिनिधिक स्वरुपात वापरलेली दिसते.

मिथकामुळे काव्यभाषेला समृद्धता लाभते. आशय अधिक व्यामिश्र आणि गुंतागूतीचा बनविता येतो. मानवी जीवनाची संगती लावण्याचे किंवा शोधण्याचे कार्य मिथकांच्या माध्यमातून करता येणे शक्य असते. या दृष्टीने मिथके ही समूहनिष्ठ असतात.

कवितेच्या आकलनात कवितेचे शब्दरुप, लय, नाद इत्यादी घटकांच्या आधारे कवितेचे रुपात्म आकलन केले जाते.

कवितेतील सौंदर्यप्रतीतीची प्रक्रिया आपणास काव्याचा आस्वाद घेताना जाणवत असते. यावेळी आकलनाची प्रक्रिया अगदीच सुरु झालेली नसते असे नाही. आकलन आणि त्यानंतर आस्वाद असा क्रम तेथे नसतो. ती जणू एकाच वेळेस घडणारी प्रक्रिया असते. आस्वाद आणि समीक्षेच्या मधल्या अवस्थेत चालणारी ती प्रक्रिया आहे. असे काही अभ्यासकाचे मत आहे. कवितेतील शब्दांद्वारेच अर्थापर्यंत जाण्याचा मार्ग आपल्याला सापडतो. कवितेमधील शब्दरुपांचे आकलन हे कवितेच्या आकलनाची महत्त्वपूर्ण पायरी असते. शब्दांच्या उच्चाराने नादरचना घडत असते. शब्दांच्या उच्चारातून जी एक लयबद्धता जाणवते ती आपल्या अनुभवाचे, भावनांचे सूचन करते. कवितेमध्येही ती प्रक्रिया घडते.

munotes.in

सामाजिक सांस्कृतिक दृष्टिकोनातून कवितेचे आकलन करतांना विशिष्ट समाजरचनेमुळे निर्माण झालेली सामाजिक सांस्कृतिक परिस्थिती, तिचा कवितेतून झालेला आविष्कार, या आविष्काराला लाभलेले कलात्मक स्वरुप यांची मीमांसा केली जाते.

कविता ही वेगवेगळ्या प्रकारची असू शकतो. वाचक हाही भिन्न-भिन्न असू शकतो. आणि त्यामुळेच रसग्रहणाची सर्वसामान्य अशी एक प्रक्रिया असू शकत नाही. शिवाय रसग्रहणाचा तात्त्विक विचार करताना कविता ही कविता अशी का आणि केव्हा होते याचाही विचार केल्यावाचून भागत नाही. हा सर्वच विचार त्यामुळे पुष्कळसा घोटाळ्याचा होऊन बसतो. कवितेचे रसग्रहण हा अर्थव्यस्त म्हणजेच हा रुपविस्तार, शब्दातून जे कवितेला रुपत्व येते त्याच्या अवस्था पुढे दिल्याप्रमाणे मांडता येतील.

१) **नाद** - हा शब्दाचा प्राथमिक घटक टाळता येत नाही. म्हणून कवितेचे गीत व संगीतातील स्वर यांच्याशी एका बाजूने नाते आणि कवितेची अभाषांतरियता.

२) **संकेत** - नादघटकांचे भाषेतील शब्दांच्या संदर्भात एक पारंपारिक स्थान व कार्य असते. 'प' आणि 'क्षी' हे दोन शब्दवर्ण एकापुढे एक आले की 'पक्षी' या पारंपारिक नाद-समुच्चयाचा बोध होतो.

३) **शब्द** - या नाद समुच्चयातून शब्दाची एक तात्त्विक प्रतिमा आकार घेते. 'पक्षी' हा शब्द म्हणजे पक्षी नव्हे, त्या शब्दाने बोध होणारी ती एक तात्त्विक ज्ञान प्रतिमा.

४) **अनुसंधान** - या तात्त्विक प्रतिमांकनांतून लगेच लौकिक, कल्पित आणि वैयक्तिक व्यवहाराशी वेगवेगळे संबंध जोडले जातात. घटित शब्द आणि त्यांचा ग्राहक यांच्यात एक देवाण-घेवाण सुरु होते. पक्षी म्हणजे एक मुक्त किंवा कोंडलेला प्राणिविशेष, तो गातो, केकाटतो, मी त्या दिवशी पाहिलेला पक्षी, तिचे मोरपंखी डोळे इत्यादी.

५) **अर्थ** - शब्दवर्णातून व्यक्त होणारी जाणीव तेथेच थांबत नाही. त्यातून एक नवे कल्पन प्रगत होत असते. एक नवे प्रस्थापन होत असते हे नवे प्रस्थापन त्या शब्दवर्णाच्या पलिकडे जाऊन इतर शब्दवर्णांच्या संदर्भात एक अनन्यसाधारण रुप घेते. पक्षी-झाडे आणि गाणे हे तीन नादसमुच्य पक्षी जे झाडावर गाणे गातो या एका वाक्यपुंजाच्या आकारात गुंतले जातात. या वाक्यपुंजाला एक स्वतंत्र अस्तित्व असते. अंतर्गत रहस्य आणि चित्रांकित रुप असते. संबंध कवितेची बांधणी या वाक्यपुंजाच्या आधाराने होत असते. दोन किंवा अधिक वाक्यपुंजाच्या संबंधातून एक वाक्यसंधी प्रकट होते. नवी स्तरनिर्मिती होते. पक्षी जे झाडावर गाणे गातो आहे झाडच दुसरे पुन्हा त्या गाण्यात पक्षी जे झाडावर गाणे गातो कवितेच्या बांधणीत हे वाक्य संधी म्हणजे एकतर कवितेच्या नकाशातील ठळक जागा हे अशाप्रकारचे वाक्य संधी मिळून एक वाग्बंध होतो, संबंध कवितेची कल्पना तयार होत असते. या थोड्याशा सुब्रमय प्रवासातून रसग्रहणाच्या संदर्भात काही प्राथमिक सूचना मांडता येतील.

१. कविता केवढी असावी ते केव्हाही आधीच सांगता किंवा ठरविता यावयाचे नाही. काव्य हे... अल्पविस्तारी असते. अहेही म्हणूनच म्हणता यावयाचे नाही. कवितेतील वाग्बंधाची अंतर्गत आवश्यकता व संघस्पर्शता यावर ही लांबी प्रामुख्याने मापावी लागेल.

२. नाद का काव्याचा प्राथमिक घटक म्हणून काव्य म्हणजे नाद नव्हे. छंद-शास्त्राचा कवितेच्या काव्यत्वाशी प्रत्यक्ष संबंध नाही. म्हणूनच काव्यातील लयीचा संगीतातील लयीशी संबंध

नाही. काव्यातील लय कवितेच्या वाक्यबंधात अनुस्तूत असते. त्याचे अर्थवाहकत्व व त्यातून दाटणारे मानसिक आंदोलन वाक्यबंधात अनुस्तूत असते. त्याचे अर्थवाहकत्व व त्यातून दाटणारे मानसिक आंदोलन त्यातही लय शोधण्याचा आग्रहच धरला तर शोधावी लागेल. खरे म्हणजे हा लयीचा शोध सोडूनच द्यायला हवा.

३. कवितेला अन्वय आणि रुढ अर्थाने अर्थ हे दोन्ही नसतात. तिच्याच फक्त एक वस्तुनिष्ठ अवाहकत्व असते. कारण कवितेहून जर वेगळा असा एखादा अर्थ असला तर कवितेचे कविता म्हणून प्रयोजन ठरत नाही. म्हणून ज्या कवितेचा अर्थ वेगळ्या शब्दात तितक्याच किंवा अधिक प्रभावीपणे सांगता येईल ती कविता 'कविता' होऊ शकत नाही.

४. कविता 'समजणे' म्हणजे तिच्यातील आवाहकत्वाला आपण आपले रुप देणे. हा गुण जितका कवितेचा तितकाच आपलाही. एखादी कविता इतर अनेक कारणांमुळे दुर्बोध होऊ शकेल पण तिच्यातील काव्यत्वामुळे कधीच नाही. सावधगिरी म्हणून रसग्रहणाच्या आपल्या मर्यादा संपल्या की काय ते आधी पाहावे. सर्वच काव्य सर्वांना सर्वकाळी समजले पाहिजे असा आग्रह धरण्याचे कारण नाही.

५. कविता ही वेगवेगळ्या प्रकारची असू शकते, कारण आपण सर्व एकाच प्रकारचे असत नाही. या प्रकारात तरतम भाव लावला पाहिजे असेही नाही. जिच्यात अवाहतत्व अधिक ती आपल्या मनोविश्वाशी अधिक संबद्ध होते. इतकेच पुष्कळ गोष्टी आपण विसरुन जातो, मागे टाकतो, तशाच पुष्कळशा कविताही.

६. कवितेचे रसग्रहण, कविता टाळून किंवा वगळून होत नाही.
(केशवसुत गाऊनि गेले या पुस्तकातून)

## १.८ संदर्भसूची


१. भारतीय साहित्य - ग.त्र्यं. देशपांडे
२. कविता आणि प्रतिमा - सुधीर रसाळ
३. अर्वाचीन मराठी काव्य - रा. श्री. जोग
४. पाच कवी - मंगेश राजाध्यक्ष
५. कविता विसाव्या शतकाची - डहाके वसंत आबाजी
६. कवितेविषयी - डहाके वसंत आबाजी
७. मराठी वाङ्मयकोश - चौथा खंड


❖❖❖❖

# घटक -२

# कवितेचे प्रकार

**घटक रचना :**

२.१ विविध पद्यप्रकार आणि काव्यप्रकार

२.२ आशयानुसार वर्गीकरण

२.३ संरचनेनुसार वर्गीकरण

२.४ सादरीकरणाच्या तत्त्वाने वर्गीकरण

## २.१ विविध पद्यप्रकार आणि काव्यप्रकार

काव्याचे विविध प्रकार पाडले जातात. हे प्रकार कोणत्यातरी तत्त्वाने केले जातात. मराठी काव्याचे प्रकार सांगण्याचे प्रयत्न अनेकांनी केलेले दिसतात. कविता आणि प्रतिमा या ग्रंथात सुधीर रसाळ यांनी भावकविता, चिंतनगर्भ कविता, कथाकविता, नाट्यकविता आणि गीत असे पाच प्रकार केले आहेत. वसंत आबाजी डहाके यांनी सातशे वर्षाच्या मराठी परंपरेत लिहिल्या गेलेल्या कवितेला समोर ठेवून आपल्या कवितेविषयी या ग्रंथात भावकविता, कथाकविता, नाट्यकविता आणि भाष्यकविता असे चार ठळक प्रकार केले आहेत. चिंतनपर दीर्घ काव्याचा समावेश त्यांनी भाष्यकविता या प्रकारात केला आहे. ओवी, अभंग, गीत, पद, आरती, धावा, धवळे, विराणी, स्तोत्र, पाळणा, भूपाळी, लावणी, सुनीत, गझल, हायकू, रुबाई इत्यादी प्रकार भावकवितेत घातले आहेत. तर आख्यानकविता, कटाव, पोवाडा, खंडकाव्य, स्वयंवरकाव्य, महाकाव्य, कथनपर दीर्घ कविता ही कथाकविता आहे. पोवाडे, भारुडे, रुपके इत्यादी नाट्यकविता आणि ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, यथार्थदीपीका या भाष्यकविता होत असे त्यांनी म्हटले आहे.

वरील वर्गीकरणापेक्षा वसंत पाटणकरांनी आपल्या कविता संकल्पना, निर्मिती आणि समीक्षा या ग्रंथात काव्यप्रकाराचे काटेकोर तत्त्वांनी वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते - काही काव्यप्रकार आशयात्मक तत्त्वांनी, काही संरचनात्मक तत्त्वांनी तर काही प्रस्तूतीकरणात्मक किंवा सादरीकरणात्मक तत्त्वांनी सिद्ध होतात. हीच काव्याच्या वर्गीकरणाची व्यापक तत्त्वे म्हणता येतील. (वसंत पाटणकर, कविता संकल्पना, निर्मिती आणि समीक्षा, पृ. २८) अशी वर्गीकरणाची तत्त्वे सांगून त्यांनी आशय या तत्त्वानुसार विलापिका, जानपदगीत, निसर्गकाव्य, प्रेमकाव्य, गुढगुंजनपर कविता, ग्रामीण कविता, दलित कविता, महानगरी कविता असे प्रकार मानता येतील असे म्हटले आहे. तर रचनातत्त्वाच्या अंगाने केले जाणारे प्रकार म्हणून भावकाव्य, नाट्यकाव्य, कथाकाव्य, सुनीत, रुबाई, हायकू, गझल इत्यादी. सादरीकरणाच्या अंगाने केले जाणारे प्रकार म्हणजे धवळे, गौळण, विराणी, पदे, भारुडे, लावणी हे होत. ओवी, अभंग, आर्या श्लोक साकी, दिंडी, कटाव हे काव्यप्रकार नसून ते पद्यप्रकार आहेत. रचनाप्रकार

आहेत. असे असले तरी अनेक काव्यप्रकार आणि पद्यप्रकार एकमेकांत मिसळून गेलेले दिसतात. वरील तीन अंगानी केल्या जाणाऱ्या वर्गीकरणाचा विचार विस्ताराने पाहू.

## २.२ आशयानुसार वर्गीकरण

आशयानुसार काव्याचे गीत, विलापिका, निसर्गकाव्य, गुढगुंजनपर कविता, दलित ग्रामीण इत्यादी प्रकार मानता येतील. गीतकाव्य हा काव्याचा खूपच व्यापक असून याचे आशयानुसार अनेक प्रकार सांगता येतील. भक्तिगीते, गोपगीथे, उत्सवगीते, जानपदगीते, बडबडगीते, कोळीगीते, स्त्रीगीते, अंगाईगीते इत्यादी प्रकार गीत या एकाच प्रकारात सामावलेले दिसतात. भक्तिगीते ही भावगीतेच असतात. भक्तीभाव कधी ओवी अभंगरुपात व्यक्त होतो तर कधी आरती, स्तोत्र अशा रुपातही प्रकट होत असतो. गोपजीवनाचे चित्रण करणाऱ्या गीतांना गोपगीते म्हणता येईल. विविध उत्सवाप्रसंगी गायिल्या जाणाऱ्या गीतांचा समावेश उत्सवगीतांमध्ये होतो. अंगाई गीत हे प्रामुख्याने स्त्रीगीतच असते. मुलाला निजवतांना अपत्याविषयी वाटणारा प्रेमभाव, वात्सल्य आणि निद्रासुखाची आराधना हे मूख्य भाव या गीतात असतात. कोळीगीत हा लोकगीताचा प्रकार असला तरी आधुनिक काळात खूप लोकप्रिय झालेला काव्यप्रकार आहे. कोळीसमाजाची जीवनपद्धती, त्यातील लोक विशिष्ट भावना, संकेत आणि कोळी समाजाची वैशिष्ट्यपूर्ण भाषा यातून कोळीगीत साकारत असते.

विलापिका हा एक स्वतंत्र गीतप्रकार म्हणून मान्यता पावलेला दिसतो. प्रिय व्यक्तीचा वियोग किंवा मृत्यू, नैसर्गिक आघात यामुळे जीवन शोकात्म झाल्याची भावना विलापिकेतून व्यक्त केली जाते. विलापिकेतून दुःखभाव दैनंदिन, सामान्यप्रकारच्या दुःखभावाहून तीव्र असतो. अशा शोकभावाबरोबर विलापिकेतून चिंतनही प्रकट होत असते.

जानपदगीत हे प्रायः ग्रामीण जीवनाचे चित्र रेखाटणारे असते. मात्र त्यांचा अधिक जवळचा संबंध लोकजीवनाशी आणि लोकगीतांशी असतो. कृषिसंस्कृती, मेंढपाळ यांच्या संस्कृतीशी गीते निगडित असतात. ग्रामीण जीवनातील शांतता, निसर्गसौंदर्य, आनंदमयता, आणि खेड्यामधील लोभस सौंदर्य हे या गीतांचे प्रमुख विषय असतात. मात्र आजची ग्रामीण कविता ज्या भकास वास्तवाचा आणि ग्रामीणतेवर होणाऱ्या अनेकांगी आक्रमणाचा विचार मांडते या कवितेहून जानपदगीते भिन्न असलेली दिसतात. जानपदगीते ही ग्रामीण जीवनाचे रंजनात्मक वर्णन करणारी ठरतात.

गीत या प्रकारात येणारी बालगीते आणि बडबडगीते प्राधान्याने बालभावनांच्या अभिव्यक्तीसाठी आणि बालकांच्या रंजनासाठी लिहिली जातात. यांचे स्वरुप खेळकर असते. विशिष्ट्य नाट्यभाव या गीत या गीतामध्ये असतो. विविध चमत्कारिक कल्पना, बालविश्वाचे, बालमनोभावाचे दर्शन ही गीते घडवितात.

## २.३ संरचनेनुसार वर्गीकरण

विशिष्ट प्रकारच्या रचनातत्त्वाला प्राधान्य देऊन केल्या जाणाऱ्या काव्यप्रकारांचा समावेश या विभागात करता येईल. अन्य भाषांतून मराठीत आलेले आणि केवळ मराठीत निर्माण झालेले काही काव्यप्रकार येथे देता येतील. सुनीत, रुबाई, हायकू, कणिका, उद्देशिका तसेच

ओवी अभंग हे रचनात्मक अंगाने महत्त्वाचे ठरणारे काव्यप्रकार आहेत. सुनीत हा काव्यप्रकार केशवसूतांच्या कवितेपासून मराठीत रुढ झालेला दिसतो. इंग्रजी काव्यपरंपरेतून जी काही कविता भाषांतरीत झाली त्यातून सुनीत हा काव्यप्रकार मराठी कवींनी स्वीकारलेला दिसतो. भावना आणि चिंतनात्मकता ही प्रमुख आशयसूत्रे सुनीतामध्ये दिसतात. एकुण चौदा ओळी असलेली सुनीत रचना दोन प्रकारची असते. मिल्टॉनिक आणि शेक्सपीअरन असे दोन प्रकार या रचनेत दिसतात. मिल्टनप्रणित सुनीत रचनेत ओळींची विभागणी आठ ओळी सहा ओळी अशी दोन कडव्यात केली जाते. ती शेक्सपीअरनप्रणित सुनितरचनेत चार ओळींची तीन कडवी आणि शेवटचे दोन ओळींचे कडवे अशा चौदा ओळी असतात. मराठी काव्यरचनेत सुनितरचनेसाठी शार्दुलविक्रिडित हे वृत्त प्रामूख्याने वापरले गेले. यमक रचनेचे साचेही या रचनाप्रकारात निश्चित केलेले दिसतात. या रचनाप्रकाराची मोडतोड करीत मराठीत विंदा करंदीकरांनी मुक्तसुनिते लिहिली ती विलास सारंग यांनी प्रतिसुनिते लिहिलेली दिसतात.

रुबाई हा काव्यप्रकार उर्दु काव्यातून मराठी आला असून माधव ज्यूलियन यांनी उमरखय्यामाच्या रुबायावरुन मराठी रुबाया रचल्या आहेत. ही चार ओळींची रचना असून पहिल्या तिसऱ्या व चौथ्या ओळीत यमक साधलेले दिसते. भूपति किंवा लीलीरति हे जातीप्रकार रुबायाच्या रचनेसाठी वापरले गेलेले दिसतात. एखादा चमत्कृतीपूर्ण अनुभव रुबायातून व्यक्त केला जातो. याच प्रकारे अलीकडे चारोळी हा काव्यप्रकार पुढे आलेला दिसतो.

जपानी काव्यरचनेचा प्रकार म्हणून मराठीत शिरीष पै यांनी हायकू हा काव्यप्रकार रुढ केला. एखादा भावकण, निसर्गदृश्य केवळ सतरा अक्षरात मांडणे अशी हायकूंची सर्वसाधारण रचना असते.

अभंग हा काव्यप्रकार मानल्यास अभंगाची रचना समरचनी असलेली दिसते. यात किमान तीन चरण आणि सहा ओळी आवश्यक असतात. भक्तिभावनेपासून आधुनिक जाणिवेतील कोणताही भाव अभंगातून मांडता येतो. प्रत्येक चरणाच्या शेवटी यमक साधलेले असते.

## २.४ सादरीकरणाच्या तत्त्वाने वर्गीकरण

सादरीकरणाच्या अंगाने केले जाणारे प्रकार म्हणजे धवळे, गौळण, विराणी, पदे, भारुडे, लावणी हे होत. हे प्रकार विशिष्ट उद्देशने सादर केले जाणे काव्यप्रकार आहेत म्हणून यांचा विचार सादरीकरणाच्या अंगाने करणे अधिक संयुक्तिक आहे. धवळे म्हणजे लग्नात गायिली जाणारी वरविषयक गीते होत. लग्नात ज्या स्त्रीया गातात त्यांना धवलेरी म्हणतात. ही स्त्रीगीतेच असतात. या गीतातून वरविषयक विविध भावभावना व्यक्त होतांना दिसतात. गौळणी आणि विराण्या ही ईश्वर विषयक गीते अंतिमः स्त्रीगीतेच असतात. कारण यातील निवेदकाची भूमिका स्त्रीकडे असते. परमेश्वर किंवा कृष्ण, विठ्ठल या देवतेला केंद्रस्थानी ठेवून ही गीतरचना झालेला दिसते. मराठी वारकरी परंपरेत या काव्यप्रकारांना प्रतिष्ठा लाभलेली दिसते. गेयते बरोबरच विशिष्ट पद्धतीने यांचे सादरीकरण केले जावे अशी अपेक्षा असते. गौळणी आणि विराण्यामधून प्रेमभाव, कामभाव, शृंगार या भावभावनांचे चित्रण केले जाते. मात्र यातील प्रमिक हा ईश्वर असतो. त्यामुळे निवेदक भक्ताच्या रुपाने सिद्ध होत असतो.

भारुड हा लोकप्रिय काव्यप्रकार सादरीकरणानेच प्रभावित झालेला दिसतो. रुपककाव्याचा हा एक उत्कृष्ट नमूना आहे. मानवी जीवनाला उपकारक ठरणारा बोध देणे हा भारुडांचा प्रमूख उद्देश आहे. संत एकनाथांनी अनेक प्रकारच्या भारुडांचे लेखन केले आहे. विंचू, ऐडका, भोळी, जोशी, वासुदेव अशी अनेक भारुडे विनोदाच्या आणि उपहासाच्या अंगाने बोध देतांना दिसतात.

लावणी हा शाहिरी काव्याचा प्रकार खूपच लोकप्रिय काव्यप्रकार असलेला दिसतो. ध्रुपद आणि चार चरणांची कडवी अशी लावणींची रचना असते. नृत्ययुक्त गीत असे लावणीचे स्वरुप आहे. ढोलकी आणि तुणतूण्याच्या तालावर लावणीचे सादरीकरण होत असते. भृंगावर्तनी किंवा पद्मावर्तनी लावणी अशी लावणीची रचना असते. लावणीप्रमाणे पोवाडा हा गीतप्रकार शाहिरी काव्यात येतो. वीरसंयुक्त अशी रचना पोवाड्याची होते.

गझल हा काव्यप्रकार मुस्लीम काव्यपरंपरेतून मराठीत स्थिरावलेला दिसतो. गझलेत दोन ओळींचे चरण असतात. त्यांना शेर म्हणतात. प्रत्येक शेर स्वतंत्र असतो तरी त्यांचे कोणत्यातरी एका आशयसूत्राशी नाते प्रस्थापित करण्याचा प्रयत्न गझलकार करीत असतो. प्रेम, भक्ती, दुःख, वियोग हे भाव गझलेतून व्यक्त केले जातात.

सादरीकरणाच्या या प्रकारात भूपाळ्या, स्तोत्रे, मंगलाष्टके, पाळणी श्लोक, आरत्या यांचा समावेश करता येईल.

अशाप्रकारे कविता हा अनेक केंद्री आशय आणि अनेक रचनतत्त्वे असलेला वाङ्मयप्रकार आहे. आधुनिक कविता मुक्त शैलीतील कविता आहे. काळाप्रमाणे बदलणाऱ्या जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न कवी कविता करताना दिसते. असे असले तरीही आजवर कवितेत वापरले गेलेले अनेक रचनाप्रकार आजच्या कवितेतही दिसतात.

❖❖❖❖

munotes.in

# घटक -३

## मराठी कवितेची पंरपरा

**घटक रचना :**

३.१ प्रस्तावना
३.२ मराठी कवितेचा विकास
३.३ बाराव्या शतकातील काव्य
३.४ संत काव्य
३.५ पंडिती काव्य
३.६ १९४५ नंतरचे काव्य
३.७ १९६० नंतरचे काव्य
३.८ १९८० नंतरचे काव्य
३.९ समारोप
३.१० संदर्भग्रंथ सूची

### ३.१ प्रस्तावना

'निवडक मराठी कविता' या कविता संग्रहाचा अभ्यास करण्यापूर्वी मराठी कवितेचे स्वरुप यांचा विचार करणे गरजेचे आहे. मराठी काव्य कालखंडानुसार कसे बदलत गेली. प्रत्येक कालखंडातील कवितेचे स्वरुप जाणून घ्यावे लागेल. १८८० नंतरच्या कविता वास्तववादी जीवन चित्रण केलेले दिसून येते. या कविता संग्रहातील कविता प्रामुख्याने १९८० नंतरच्या कालखंडातील कवीच्या कविता आहेत.

### ३.२ मराठी कवितेचा विकास

कविता हा जसा व्यक्तिगत भावानुभूती उत्कटपणे साकारणारा साहित्यप्रकार आहे, तसाच तो सामाजिक वास्तवाला भिडणारा महत्त्वाचा साहित्यप्रकार आहे. मराठी साहित्यामध्ये काव्य आणि समकालिन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक वास्तव यांचे अनेकपदी नाते प्राचीन काळापासून चालत आलेले आहे. सभोवतालच्या वास्तवाचा संबंध काव्याचे विषय, आशय, अभिव्यक्तीचे स्वरुप व प्रकार आणि काव्याची उद्दिष्टे यांच्याशी नेहमीच प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे जुळलेला असतो. प्रत्येक कालखंडातील काव्यात समाजाच्या अंतरंगाचे सूक्ष्म दर्शन घडते. या समाजचित्रणाचे स्वरुप व काव्यातील त्याचे स्थान यामध्ये काळाच्या ओघात बरेच बदल होत गेलेले आहेत. असे असेल तरी समाजातील बऱ्या-वाईट प्रवृत्तींचा निर्देश करणे, त्यांचे

munotes.in

व्यक्तिमत्त्वावर होणारे परिणाम दर्शविणे, जीवनभाष्य करणे, समाजाला संवेदनशील व विचारप्रवृत्त करणे इ. कार्ये प्रत्येक कालखंडामध्ये अनेक कवींनी कल्पकतेने केली आहेत.

## ३.३ बाराव्या शतकातील काव्य

बाराव्या शतकात सुरु झालेल्या मराठी काव्यपरंपरेतील ज्ञानदेव ते तुकाराम (इ.स. चे १३ वे - १७ वे शतक) येथपर्यंतच्या संतकाव्यामध्ये तत्कालीन समाजसंस्कृतीचे दर्शन घडते. तो समाज अनेक धर्मपंथांमध्ये व अगणित देवदेवतांच्या उपासनेत विभागलेला होता. तसेच जातिव्यवस्थेच्या उच्च-नीचतेच्या अनिष्ट विचार-आचारांमध्ये दुभंगलेला होता. संतकवींनी ओवी व अभंग या अस्सल मराठी छंदांमध्ये केलेल्या रचना प्रामुख्याने त्या समाजातील दुष्ट व दांभिक प्रवृत्तींचे दर्शन घडवितात व त्या नष्ट करण्याचे आवाहन पुन:पुन्हा करतांना दिसतात. सात्विक मूल्यांचा आग्रह धरीत समाजाला भक्तीचा मार्ग दाखवतात. जीवनाचे श्रेय हरवले असलेल्या माणसांना अनिष्ट रुढी व अंधश्रद्धा यातून बाहेर काढून, मोक्षप्राप्तीच्या उदात्त ध्येयाकडे वळवण्याचा प्रयत्न करतात. येथे समाजचित्रण हा काव्याचा गाभा नव्हता. तर परमार्थसाधनेच्या मार्गदर्शनासाठी लिहिल्या गेलेल्या काव्यात दृष्टान्त व रुपके याद्वारे वास्तवाला कल्पकतेने प्रतिसाद देण्यात आला होता.

## ३.४ संत काव्य

संतकाव्याप्रमाणेच पंडिती काव्यानेही बाह्य वास्तवाला कलात्मक प्रतिसाद दिलेला आढळतो. महानुभाव पंडित कवी नरेंद्रापासून ते मोरोपंतापर्यंत (१८ वे शतक) चरित्रकथा सांगणे या प्रेरणेबरोबरच भक्तांच्या चरित्रातील घटनांच्या कथनाद्वारे श्रोत्यांना भक्तीकडे वळवण्याचा हेतू लक्षात येतो. पंडित कवींनी आख्यानकाव्यातून पुरणातील व्यक्तींची वर्णने करताना समकालीन सामाजिक वातावरणाची पार्श्वभूमी योजिली. सामाजिक, वास्तव, समकालीन जीवनपद्धतीचा सूक्ष्म चित्रणाच्या साहाय्याने त्यांनी पौराणिक कथा रंगवल्या, समकालीन वाचकांना आकर्षित करुन भक्तिमार्गाकडे वळवणे हाच त्यांचा हेतू होता. संतसाहित्याप्रमाणे गतानुगतिकतेवर थेट हल्ला केला गेलेला नसला तरी पंडिती काव्याचा हेतू समाजाला सत्प्रवृत करण्याचाच होता.

## ३.५ पंडिती काव्य

पंडिती कवितेत प्राधान्याने समाजातील उच्चवर्णियांची जीवनशैली प्रतिबिंबित झाली असली तरी शाहिरी काव्यात (१८-१९ वे शतक) तळागाळातील मराठी समाजाचे, त्यांच्या सुख-दु:खाचे सविस्तर चित्रण प्रथमच घडले. पेशवाईच्या काळातील अवनत समाजातील स्त्री-पुरुषांच्या आकांक्षा, अभिरुची, जीवनमूल्ये या काव्याने प्रामुख्याने टिपल्या. येथे समाजाला उपदेश करण्याची वृत्ती कमी झाली व समाजाच्या भावभावनांमध्ये रंगून जाऊन त्यांची नावीन्यपूर्ण प्रतिमांतून वर्णने करण्याची पद्धती रुळली.

राजकीय परिस्थिती आणि काव्याचे स्वरुप व उद्दिष्टे यांचा परस्पर संबंध इंग्रजांच्या राजवटी सुरु झाल्यावर पुन्हा एकदा वेगळ्या रीतीने दृढ झाला. इंग्रजांच्या आगमनाबरोबरच

इंग्रजी विद्या, इंग्रजी काव्य यांचा परिचय मराठी कवींना झाला. त्यातून नव्या काव्यविषयक जाणिवाही रुजू लागल्या. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या जागतिक पातळीवरील नव्या जीवनमूल्यांचा पुरस्कार कवितेतून प्रथम केशवसुतांनी (इ.स. १८८५) मध्ये केला. लौकिक जीवनातील सर्वसामान्य विषयही काव्यविषय झाले. प्रेमादी लौकिक भावनांबरोबरच समाजाविषयीच्या प्रतिक्रिया, रुढीविरुद्धचे बंड, क्रांतीचा पुरस्कार व्यक्त करणे हा काव्याचा मुख्य व निखळ हेतू झाला आणि या सर्वांची अभिव्यक्ती छंद व अक्षरगणवृत्तांपेक्षा मात्रावृत्तांतून होऊ लागली.सुनीतादी नवे रचनाप्रकार रुढ झाले. केशवसुतांनी काव्याला अनेक बंधनातून मुक्त केले. येथे काव्यामध्ये क्रांती घडली. सामाजिक आशयाची कविता हा महत्त्वाचा प्रवाह केशवसुतांपासून सुरु झाला व या स्वरुपाची कविता पुढे काही प्रमाणात गोविंदाग्रज, बालकवी, कवी बी आणि म. फुले आदींनी लिहिली. कुसुमाग्रज आणि अनिल यांच्या कवितेत सामाजिक दृष्टी अधिक विशाल आणि मानवतावादी झाली. त्यांनी राष्ट्रीयत्वाच्या मर्यादाही पार केल्या. कवी अनिलांनी छंद व वृत्तांचे बंधन ओलांडले. मुक्तछंद रुजवला.

## ३.६ - १९४५ नंतरचे काव्य

इ.स. १९४५ च्या सुमारास जागतिक महायुद्धामुळे समाजवास्तवात प्रचंड उलथापालथ झाली. यंत्रयुग अवतरले, यंत्राबरोबर काम करणारा माणूस यंत्रवत् झाला. त्याची जीवनशैली, मूल्यसरणी बदलली; तो परात्म झाला. याची जाणीव मराठी साहित्यविश्वात मर्ढेकरांच्या कवितेतून प्रथम उलटली. आशय, विषय व प्रतिमा, भाषा या सर्व स्तरांवर काव्यात दुसऱ्यांदा क्रांती झाली. जागतिक परिस्थितीचे अत्यंत सखोल व दूरगामी परिणाम आपल्या जीवनमानावर, सांस्कृतिक विश्वावर होताहेत; आपले स्वत्व नष्ट होते आहे. याची दाहक जाणीव प्रथम मर्ढेकरांनी व्यक्त केली. या नव्या जाणिवेचे समांतर आविष्कार शरदश्चंद्र मुक्तिबोधांच्या कवितेतून दिसून येतात. विंदा करंदीकरांच्या कवितेतील साम्यवादी जाणिवा हा भांडवलशाही समाज व्यवस्थेस दिलेला महत्त्वाचा प्रतिसाद ठरतो.

## ३.७ – १९६० नंतरचे काव्य

१९६० च्या सुमारास कविता अनेक दिशांनी समाज वास्तवाला भिडली. त्यात प्रतिक्रियांची तीव्रता व विविधता लक्षणीय होती. नारायण सुर्वे यांच्या कवितेत कष्टकरी माणसांचे अव्यक्त भावविश्व विविध पैलूंसह अवतरले. या विश्वामधील माणसांचे सहजीवन, त्यांची एकजूट व कामगार चळवळीतील, परिवर्तनावरील अजोड विश्वास हे विशेष उठून दिसतात. मर्ढेकरांपासून काव्यात व्यक्त होऊ लागलेल्या महानगरी संवेदना सुर्व्यांच्या कवितेत अधिक विस्तारल्या व पुढे दिलीप चित्रे, अरुण कोल्हटकर, भालचंद्र नेमाडे, वसंत आबाजी डहाके, सतीश काळसेकर यांच्या कवितांतून त्यांना वेगवेगळी परिमाणे लाभली. महानगरी कविता असा एक लक्षणीय प्रवाह लक्षात येऊ लागला.

याच काळात महाराष्ट्रात दलित चळवळ, स्त्रीमुक्तीची चळवळ, ग्रामीण साहित्याची चळवळ इत्यादी चळवळी मूळ धरु लागल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने शिकून विचार करु लागलेल्या वर्गाने प्राप्त परिस्थितीला तीव्र भाषेत प्रतिसाद दिला. आपली शतकानुशतकाची वेदना काव्यरुपात व्यक्त करुन प्रस्थापित व्यवस्थेला जबरदस्त नकार दिली. तिच्याशी विद्रोह

केला. दलित कविता हा प्रभावी काव्यप्रकार निर्माण झाला व तो दलित चळवळीचा, सामाजिक चळवळीचा ऊर्जास्त्रोत बनला. वामन निंबाळकर, यशवंत मनोहर, दया पवार, नामदेव ढसाळ, हिरा बनसोडे आदी अनेक कवींनी या प्रवाहाच्या कक्षा रुंदावल्या.

१९६०-८० पर्यंतच्या दशकात समाजाचा कोणता ना कोणत्या परिवर्तनवादी शक्तीवर विश्वास होता. एकजूट, संघटना, चळवळी, त्यांचे पुढारी यांच्याविषयीचा दुर्दम्य विश्वास काव्यातही स्पष्टपणे अधोरेखित होत होता. तो विश्वास पुढे नष्ट झाला. चळवळींना साचलेपणा आला. त्यांत अनिष्ट प्रवृत्ती शिरल्या. या वास्तवाविषयीच्या, माणसाच्या एकटेपणाच्या, तुटलेपणाच्या व व्यर्थतेच्या प्रतिक्रिया महानगरी कवितेत उमटू लागल्या.

## ३.८ - १९८० नंतरचे काव्य

१९८० च्या सुमारास समाजवास्तवात आणखी एक मोठे स्थित्यंतर सुरु झाले. कामगार चळवळी थंड पडू लागल्या. मुंबई महानगरातील कापडगिरण्या, औषध कंपन्या बंद पडू लागल्या. त्यातील कामगार या महानगरातून व अर्थव्यवस्थेतूनही बाहेर फेकल्या गेल्या. संघटित चळवळी संपण्याच्या काळातच जागतिकीकरणाचे जोरदार वारे वाहु लागले. भारताने स्वीकारलेल्या मुक्त अर्थव्यवस्थेस हे आव्हान पेलणे अवघड नव्हते; परंतु त्यातून एक नवी जीवनशैली अपरिहार्यपणे निर्माण होऊ लागली व त्यातून स्पर्धा व दबाव निर्माण झाला. जागतिक मापदंडानुसार स्वतःला बदलवणे, घडवणे याची शक्ती शहरवासीयांना स्वीकारावी लागली. हा ताण शहरांबरोबरच ग्रामीण भागावरही परावर्तित होऊ लागला. बी-बियाणे, खते, शेतीची साधने, उत्पादनक्षमता, मालाचा दर्जा, बाजारपेठ मिळवणे, बाजारभाव, निर्यात इत्यादींच्या संदर्भातील स्पर्धेमुळे शेतीव्यवसायावरही त्याचा बरावाईट परिणाम झाला आणि एकूणच जनजीवनाची घडी अनेक प्रकारे व झपाट्याने बदलू लागली. ग्रामीण भागात 'सेझ' (स्पेशल इकॉनॉमिक झोन) सारखे प्रकल्प येऊ लागले आणि जागतिक बाजारपेठेत टिकाव धरतांना मेटाकुटीस आलेला शेतकरी या योजनांनी अधिक संभ्रमित झाला.

जागतिकीकरणातून आलेली नवी बाजारपेठ, खरेदीची संस्कृती सध्या शहराशहरांतून उभारलेल्या मॉल्सच्या रुपाने वाढू लागलेली दिसते. एकीकडे माणसाची क्रयशक्ती वाढवली जाते आहे व कृत्रिम गरजा निर्माण केल्या जात आहेत. त्या गरजा भागविण्यासाठी मॉल्समध्ये चकचकीत वस्तूंचे ढीगच्या ढीग ओतले जात आहेत. माणूस 'ग्राहक' होतो आहे. एकसारख्याच दिसणाऱ्या अनंत वस्तुंच्या ढिगाऱ्याखाली माणसाची व्यक्ति-विशिष्ट ओळख, गरज व आवडनिवड हरवत चालली आहे. व्यापारीकरण व बाजारपेठीकरण यामुळे जगभराच्या ग्राहकांच्या आवडीनिवडी एकाच प्रकारच्या बनवल्या जात आहेत. सांस्कृतिक भेद नाहीसे होऊन, विविधता नष्ट होऊन आपल्या विभिन्नतेचे 'सपाटीकरण' होते आहे.

जागतिकीकरणाची लाट आपण थोपवू शकत नाही; ती स्वीकारुन सर्वांना पुढे जावे लागणार आहे. मात्र या महालाटेमध्ये आपले स्वत्व कसे जपायचे, हा प्रश्न अनेक विचारवंतांना भेडसावतो आहे. सामान्य माणसे 'ग्राहक' बनून भौतिक साधनांच्या भरमसाट गोतावळ्यातच सुख शोधताहेत. अशा ग्राहकांना जगण्याच्या प्रत्येक क्षण उन्मादक करावयाचा आहे. मनोरंजनाच्या नवनवीन साधनांतून तो तसा भारावलेला व अर्थपूर्ण करता येईल, अशी त्यांची

munotes.in

धारणा आहे. उलट अशी धारणा असलेला व भौतिक सुखसाधनांमागे धावणारा माणूस वस्तूंच्या गर्दीतही एकटा पडला आहे. आपल्या सत्वापासून नकळत दुरावत चालला आहे. नव्याने परात्म झाला आहे हे समकालीन, छुपे वास्तव आहे. या वास्तवाची दाहक जाणीव झालेले अनेक संवेदनशील कवी विविध पातळ्यांवरुन या गुंतागुंतीच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक पेचांना सर्जक प्रतिसाद देतांना दिसतात.

## ३.९ समारोप

प्रस्तुत काव्यसंग्रहामध्ये बदललेल्या समाजवास्तवाच्या नव्या संवेदनशीलतेने भिडणाऱ्या काही प्रातिनिधिक कवितांचा समावेश करण्यात आला आहे. या कविता संग्रहात, जागतिकीकरणाचा समाजावर झालेला परिणाम, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न, ग्रामीण भागातील महिलांच्या समस्या त्यांच्या व्यथा, वेदना आणि सुशिक्षित बेकार तरुणांचे प्रश्न, राजकिय स्वार्थी पुढारी, वाढती महागाई याचे भीषण चित्रण 'निवडक मराठी कविता' या कविता संग्रहातून व्यक्त होते.

## ३.१० संदर्भग्रंथ सूची


१. भारतीय साहित्य - गं. त्र्य. देशपांडे
२. अर्वाचीन मराठी काव्य - रा.श्री. जोग
३. कविता आणि प्रतिमा - सुधीर रसाळ
४. कवितेविषयी -वसंत आंबाजी डहाके


❖❖❖❖

munotes.in

# घटक -४

# ‘निवडक मराठी कविता’ संग्रहातील कविता (बा.सी. मर्ढेकर, मंगेश पाडगावकर)

**घटक रचना :**

४.१ प्रस्तावना
४.२ ‘निवडक मराठी कविता’ संग्रहा विषयी
४.३ अ) कवी बा.सी. मर्ढेकर यांचा परिचय
४.३.१ ‘किती तरी दिवसात’
४.३.२ ‘पिपात मेले ओल्या उंदीर’
४.३.३ ‘सकाळी उठोनी चहा -कॉफी घ्यावी’
४.३.४ ‘अजून येतो वास फुलांना’
४.४ ब) कवी मंगेश पाडगावकर यांचा परिचय
४.४.१ ‘प्रेम म्हणजे प्रेम असतं’
४.४.२ ‘दिवस तुझे हे फुलायचे’
४.४.३ ‘मी फुल तृणातील इवले’
४.४.४ ‘रात्रभर आपण चालत आहोत’
४.५ समारोप

## ४.१ प्रस्तावना

मराठी साहित्याला अनेक वर्षानुवर्षांपासुनची उज्ज्वल परंपरा लाभली आहे. ही परंपरा गद्य वाङ्मयापेक्षा पद्य वाङ्मयाचा अधिक उत्कट आणि उत्स्फूर्तपणे अविष्कार करताना दिसते. संत, पंत, तंत ते आधुनिक काळातही पद्यातून अधिक प्रमाणात अभिव्यक्ती होत आली आहे. यामधून मनातील विचार भावनांना मोकळी वाट करुन देण्याचा प्रयत्न कवीवर्यांनी केलेला आहे. या भावनात्मक काव्यप्रकाराचा परिचय होणे गरजेचा आहे.

## ४.२ ‘निवडक मराठी कविता’ संग्रहा विषयी

प्रस्तुत ‘निवडक मराठी कविता’ संग्रहात मराठीतील निवडक जुन्या आठ कविंच्या कवितांचा समावेश करण्यात आला आहे. बहिणाबाई चौधरी, पद्मा गोळे, बा.सी. मर्ढेकर, मंगेश

पाडगावकर, अनुराधा पाटील, अरुण काळे, इंद्रजित भालेराव, वीरधवल परब या कविंच्या कविता अभ्यासण्यासाठी नेमण्यात आल्या आहेत. मराठी कवितेत अनेकविध जाणीवांचे कवी आहेत. वेगवेगळ्या कालखंडातील आणि वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्तींच्या कवींच्या कवितांचा समावेश या संग्रहात केला आहे.

बहिणाबाई सारखी निरक्षर स्त्री आपल्या ग्रामीण भागातील बोलीभाषेत जीवनावर भाष्य करते. तिची जीवनाबद्दलची समज किती खोल आणि समंजस आहे हे या कवितेतून जाणवते. मर्ढेकर , पाडगावकर, अरुण काळे, पद्मा गोळे, अनुराधा पाटील, इंद्रजित भालेराव, वीरधवल परब यासारख्या विविध परिसरातील, विविध काळातील, विविध जाणीवांचे कवी या संग्रहात समाविष्ट झाले आहेत.

विद्यार्थ्यांसाठी अध्ययनपूरक या पुस्तकात प्रत्येकी दोन कवींच्या एकत्रित समावेश करुन अभ्यास उपयुक्त प्रकरणांची सोय करण्यात आली आहे. सदर कवींच्या कवितांचा लेखन वैशिष्ट्यांचा अभ्यास या सहाय्याने करता येईल.

## ४.३ अ) कवी बा. सी मर्ढेकर यांचा परिचय

बाळ सीताराम मर्ढेकर यांचा जन्म १ डिसेंबर १९०९ रोजी खानदेशातील फैजपूर या गावी झाला त्यांचे शालेय शिक्षण धुळे येथून आणि पुढचे महाविद्यालयीन शिक्षण पुणे येथून झाले. पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयातून  बी. ए. ची पदवी घेवून १९२९ मध्ये ते इग्लंडला गेले तेथे आय. सी. एस. परीक्षेस तीन वेळा प्रयत्न करुनही त्यांच्या वाटयाला अपयश आले. व्यवसायिक अस्थिरता मर्ढेकरांच्या वाटयाला आली होती. भारतात परतल्यावर मर्ढेकरांनी पत्रकारितेबरोबरच इंग्रजीचे अध्यापन सुरु केले. तसेच १९३८ मध्ये आकाशवाणीच्या नोकरीत रुजू झाले आणि त्यांच्या व्यवसायिक जीवनातील नव्या पर्वाला सुरुवात झाली. त्यांचे वास्तव मुंबई आणि दिल्ली या ठिकाणी होते.

मर्ढेकर वृत्तीने अंतर्मुख आणि अबोल होते मानी होते. त्यांच्या मनात सतत अनेक प्रकारचे ताण व द्वंद्वे असत. १९४० नंतर त्यांच्या लेखनाला बहर आला. या काळातील मर्ढेकरांचे लेखन विविध प्रकारचे विपूल आणि कसदार आहे त्यांच्या लेखनात कविता, लघुकथा, कादंबरी, साहित्यसमीक्षा, कलामीमांसा, संगीतीका यांचा समावेश होता. मराठी भाषेबरोबरच त्यांनी इंग्रजी भाषेतूनही लेखन केले. मर्ढेकरांचा पहिला काव्यसंग्रह 'शिशिरागम' (१९३९) प्रसिद्ध झाला. पुढे 'काही कविता' (१९४७), 'आणखी काही कविता' (१९५१) हे संग्रह प्रसिद्ध झाले. या संग्रहातील कविता पाहिल्यावर मर्ढेकरांची प्रतिभा किती श्रेष्ठ दर्जाची व सौंदर्यप्रेमी होते हे दिसून येते.

केशवसुतांनंतर मराठी काव्याला क्रांतीकारक वळण देण्याचे काम मर्ढेकरांनी केले. मराठीत नवकाव्याचा प्रवाह मर्ढेकरांनी रुढ केला. मर्ढेकरांच्या कवितेवर इंग्रजी कवी एलियट, हॉपकिब्स, ऑडेन, स्पेंडर, पाऊंड तसेच मराठीतील तुकाराम, रामदास अशा संत कवींचे संस्कार झालेले दिसून येतात. मर्ढेकरांनी आपल्या लेखनातून कृत्रिम भाषेला नकार देत, अर्थसंपन्न थेट भाषा वापरली. त्यांनी कवितेतील रुढ संकेत मोडले. भाषेची मोडतोड करुन तिथे नवे संघटन केले.

मर्ढेकरांनी कवितेबरोबरच अन्य लेखनही विपूल केले रात्रीचा दिवस (१९४२), तांबडी माती (१९४३), पाणी (१९४८) या त्यांच्या कादंबऱ्या होत. या बरोबरच मर्ढेकरांनी इंग्रजी व मराठी भाषेतून समीक्षा ग्रंथही लिहिले आहेत. १९५६ मध्ये मर्ढेकरांचे निधन झाले.

### ४.३.१ '**किती तरी दिवसात**':

कै. बा. सी. मर्ढेकर हे नवकाव्याचे जनक. मर्ढेकरांचा कवी म्हणून मोठेपणा मात्र मुख्यत: एका वेगळ्याच गोष्टीवर आधारलेला आहे. ती गोष्ट म्हणजे त्यांची वेदना, ती वेदना तीव्र आहे. तिची पाळेमुळे खोलवर रुजलेली आहे. याचा प्रत्यय त्यांच्या 'किती तरी दिवसांत' या कवितेतून येत राहतो.

किती तरी दिवसांत
नाही चांदण्यांत गेलों;
किती तरी दिवसांत
नाही नदींत डुंबलों

कवीला विविध गोष्टींची खंत आहे. कारण कवी कित्येक दिवसात रात्रीच्या चांदण्यात फिरायला गेला नाही. कारण आजच्या या विजेच्या झगझमगाटात चांदण्यात फिरण्याची मजाच राहिली नाही. तसेच लहानपणी कवी नदीत डुंबत होता. परंतु आता डुंबण्यासारख्या नदयाच राहील्या नाहीत. औदयोगिकरणामुळे नदया प्रदूषित झाल्या आहेत. त्यामुळे त्यामध्ये डुंबण्याची मजाच उरली नाही. त्यामुळे कवीच्या मुखातून अशा प्रकारे खंत प्रकट होते. पुढे कवी म्हणतो -

खुल्या चांदण्याची ओढ
आहे माझी ही जूनीच;
आणि वाहत्या पाण्याची
शीळ ओळखीची तीच.

पूर्वी कवी कधी काळी खुल्या चांदण्यात फिरला आहे. आणि त्याला त्याची ओढ आहे. खळखळणाऱ्या वाहत्या पाण्याचा आवाजही त्याला ओळखीचाच आहे. परंतु आता धकाधकीच्या जीवनात या सगळ्या गोष्टी म्हणजे फक्त आठवणीच राहिल्या आहेत. विज्ञानाच्या वाढत्या हिंसासाधनेंत आणि यंत्राच्या अमानुषी आक्रमकतेंत मानवता उध्वस्त होत आहे. मानवा मानवांत चढेल तुसडी नाती बनली आहेत रोज भंकंपाचे धक्के बसत आहेत. युद्धसंभावना दुमदुमत आहे. शवांचे ढिगारे पडले आहेत. कार्तिकाचे गव्हाळ ऊन्ह खास असतां मनाच्या ढिल्या कातडयांतून आतील जुन्या जखमा भीतीने उलतात. तरी अशा परिस्थितीमध्ये सुद्धा आम्हाला सौंदर्याचे दर्शन घडत असावे हें आमचे केवढे भाग्य. कवी याबाबत आशावादी आहे. त्यादृष्टीने तो म्हणतो -

केव्हा तरी चांदण्यांत, पुन्हा जाईन निर्भय;
गांवकाठच्या नदींत, होईन मी जलमय.

पुन्हा केव्हांतरी चांदण्यात निर्भय मनाने जाईल असा कवी आशावादी आहे. गावाकडच्या नदीतही तो जलमय होईल अशी आशा करतो आहे. पण त्याच्या मनात भीती आहे. कारण मोकळा श्वास घ्यायला या गजबजाटात चांदणे कुठे आहे. आणि नदीच्या पाण्यात साधा

पाय बुडवण्यासारखी स्थिती नाही. कारण जलप्रदुषण एवढया मोठया प्रमाणात झाले आहे की, अंगावर काटा उभा राहतो.

आज अंतरांत भीती, खुल्या चांदण्याची थोडी;
आणि नदीचा प्रवाह, अंगावर काटा काढी

म्हणून कवी स्वतःचे समाधान करुन घेतो. निसर्गातील गोष्टीपेक्षा कृत्रिम गोष्टींवरच समाधान मानतो. त्यामुळे तो म्हणतो बरा दिवा पारवा पाऱ्याचा. तसेच नदीच्या पाण्यात डुंबण्याची हौस तो बारीक येणाऱ्या नळाची धार डोक्यावर घेत ऋचा म्हणतो आहे.

बरा म्हणून हा इथे, दिवा पारवा पायाचा;
बरी तोतया नळीची, शीरीं धार, मुखी ऋचा.

कवी बा. सी. मर्ढेकर हे वास्तववादी कवी आहेत. त्यांनी आपल्या काव्यामध्ये बदलते जग दाखवून दिले आहे. काही ठिकाणी कवीचे मन स्वप्नवत आहे. तर लगेच कवी भानावर येऊन वास्तव जगाशी समरस होतो. कारण आजच्या औदयोगिकरणाच्या जगात निसर्ग लोप पावत चालला आहे. कधी काळी अनुभवलेली निसर्गातील सुखं आज आपल्याला मिळणार नाहीत याचे भान कवीला येते. परंतु त्याचबरोबर कवीचे मन आशावादी आणि तेवढेच व्याकुळही होते. आणि ही व्याकुळता, समायोजन, तडजोड कवीच्या काव्यातून उमटतांना दिसून येते.

### ४.३.२ **'पिंपात मेले ओल्या उंदिर'** -

कै. बा. सी. मर्ढेकर यांची 'गणपतवाणी बिडी पितांना' आणि 'पिंपात मेले ओल्या उंदिर' या दोन कविता माणसाच्या जगण्यातील निराशता दाखवून देतात. माणसाच्या जीवनात आनंद उरत नाही त्यावेळी फक्त उदासिनता येते. आणि या उदासीन जीवनाचे वर्णन 'पिंपात मेले ओल्या उंदिर' या सारख्या कवितेची निर्मिती होते.

श्री. भाऊ पाध्ये यांच्या म्हणण्याप्रमाणे कवितेतील उंदिरांची प्रतिमा नाझी छळछावण्यातील कैदयांकरीता वापरली असावी मर्ढेकरांना जर्मन प्रचार चित्रपट 'दी इटर्नल ज्यू' ची माहिती असावी. त्यामुळे कैदी म्हणजे उंदिर असे गृहित धरले तर कवितेच्या पुढील ओळींचे पुर्नसंदर्भीकरण हाते.

पिपांत मेले ओल्या उंदिर;
माना पडल्या, मुरगळल्याविण;
ओठांवरती ओठ मिळाले;
माना पडल्या, आसक्तीविण.
गरिब बिचारे बिळांत जगले.
पिंपात मेले उचकी देऊन;

ओले पिंप म्हणजे छळछावण्यातील गॅस चेंबर्स असा अर्थ निघु शकतो. हे पिंप ओलेच का? कारण गॅस चेंबर्सच्या भिंती आतील शॉवर्सच्या पाण्यामुळे ओलसर राहत असतील. गॅसचेंबरमध्ये मेल्यानंतर कैदयांच्या माना पडलेल्या असतात व त्या माना सुद्धा मुरगळल्याशिवाय

पडल्या असतात. त्या कैदयांनी तोंडात विषारी वायु जाऊ नये म्हणून ओठावर ओठ दाबून धरले असतील. त्यांना त्यांच्या स्वतःच्या मरणाविषयी कोणतीही कल्पना नसतांना ते मेले असतील व त्यामुळे मरतांना त्यांच्या माना आसक्तीशिवाय पडल्या असतील. या कैदयांना गरीब बिचारे असे म्हटले आहे. कारण हे ज्यू कैदी निरपराध आहेत. केवळ ज्यू असणे हाच त्याचा अपराध आहे. बिळात जगले याचा अर्थ घाबरुन जगले. ज्यूंच्या वसाहतीसुद्धा वेगळ्या होत्या. गॅस चेंबरमध्ये विषारी वायू नाकातोंडात जाऊन मरतांना, त्यांनी उचकी देऊनच मरणाला जवळ केले असेल.

'पिंपात मेले ओल्या उंदिर' ही कविता यमकदृष्टया अभिनव आहे. इथे तऱ्हेतऱ्हेची यमक रचना केली आहे. इथे पादाकुलक मात्रावृत्ताच्या अष्टमात्रिक दोन आवर्तनांनी सिद्ध होणाऱ्या चरणाच्या अखेरीस यमक रचना अपेक्षित असते. पण या कवितेत मात्र यमक चरणांतील न येता चरणात कुठेही येतो.

उदा. मेले, ओल्या, ओठांवरती, ओठ मिळाले, बिचारे देऊन घेऊन तसेच ओल्या, पडल्या मुरगळ्याविण, पडल्या घाऱ्या. अशा प्रकारे यमकाऐवजी उच्चारणसाम्य असलेल्या वर्णवृत्तीतून व प्रासातून तोच बांधिवपणा इथे साधला गेला आहे.

बा. सी. मर्ढेकराच्या कवितेची व्याकरणदृष्टया समीक्षा करतांना त्यामध्ये विविध प्रयोग केलेले दिसून येतात. उदा. याच कवितेत कडवे आहे पण ते वेगळ्या धर्तीचे, वेगळ्या मांडणीचे आहे. ते चार ओळींचे भासते पण त्याची दृश्य मांडणी आशयानुसारी केली आहे. अशी आशयानुसारी, अवकाशयुक्त विभागणी मर्ढेकर करतात. या बदलाखेरीज मर्ढेकरांनी आशयाच्या प्रभावी संक्रमणासाठी काही अभिनव बदल आपल्या कवितेत केले.

### ४.३.३ 'सकाळी उठोनी । चहा-कॉफी घ्यावी':

बा. सी. मर्ढेकरांनी या कवितेमध्ये मानवी आयुष्य यंत्रयुगात क्षुद्र कसपटासमान कसे बनले आहे याचे चित्र रेखाटले आहे. मुंबईतील यंत्रसंस्कृतीमधील चाकरमानी मध्यमवर्गीय माणसांची क्रांतीशून्य दैनंदिनी या कवितेत मर्ढेकर चित्रित करता. मुंबईच्या नोकरदार वर्गाची पोटापाण्यासाठी सकाळपासून धावपळ सुरु असते धावपळ करुनच त्यांना लोकलच्या गर्दीत शिरावे लागते. त्यावर कवी मर्ढेकर लिहितात,

सकाळी उठोनी । चहा-कॉफी घ्यावी.
तशीच गाठावी । वीजगाडी।।

दिवसभर कामाच्या ठिकाणी आपल्या साहेबाची हाजी हाजी ('हूजर' म्हणून) करायची अशाच दुपारी भोजन मिळाले की, जीवनच सार्थकी लागल्याचा अनुभव घेऊन अथक कष्ट करावेत आणि सायंकाळी काम करुन चिपाड झालेले शरीर व मेलेलं मन घेऊन ओढत-ताणत घरी यायचे ही मध्यमवर्गीय माणसाची रोजची दैनंदिनी या कवितेतून व्यक्त झाली आहे.

सायंकाळी घरी परतल्यावर दिवसभर लाचार जगण्याचा संताप आपल्या पोराबाळांवर काढला जातो. त्याच बरोबर घरी वादविवादात आपली भूक दाबून सगळे काही सोसावे आणि सहन करावे लागते हयाचे वर्णन कवितेच्या तिसऱ्या कडव्यात आले आहे.

रात्री नशिबावर हवाला ठेवून, हेवेदावे विसरुन मध्यमवर्गीय झोपी जातो पण त्याला झोप येत नाही याची कारणमीमांसा कवी करतांना चवथ्या कडव्यात लिहितो.

निद्रेच्या खोपटी । काळजीची बिळे;
होणार वाटोळें । होईल ते ।।

मध्यमवर्गीयांचे जीवन काळजी विंवचनेने भरलेले असल्याने त्यांना नीट झोपही लागत नाही. म्हणून वाटोळे होण्याचे टळत नाही असेही कवी या कडव्यात सूचतो.

कवितेच्या पाचव्या कडव्यामध्ये विडीसारख्या क्षुद्र व्यसनात स्वतःअलिप्तपणे बुडवून टाकून विडी पिण्यातील मर्यादित सुख आपले स्वतःचे आहे असे तो मानतो. असे हे मध्यमवर्गीय माणसाचे जीवनव्यंगचित्र कवी रेखाटतो.

अखेरच्या कडव्यामध्ये घाईगर्दीच्या जिण्या जगण्यामुळे यंत्रनियंत्रित साचेबद्धता मानवी जीवनात आल्यामुळे 'आम्ही प्रेतरुपी जमदग्नी' आहोत असा उपहास व्यक्त झाला आहे.

शब्द, शब्दबंध, कडवी, विरामचिन्हे यामधून अर्थाचे अदृश्य वलय कवी चित्रित करतो. तसेच या कवितेतून दिनचक्र आणि जीवनचक्रातील जीवनचक्र आणि मानवाची अवस्था अधोरेखित केली आहे.

### ४.३.४ अजून येतो वास फुलांना -

कवी बा. सी. मर्ढेकर हे नवकाव्याचे जनक आहेत. त्यांचे काव्य हे वास्तववादी आहे. स्वातंत्र्यप्राप्ती झाली तरीही मनुष्याला त्याचा उपभोग घेता येतोच असे नाही. जरी अनेक बाबतीत आशावाद दिसत असला तरी परिस्थितीमध्ये फारसा फरक पडलेला नाही कवी म्हणतो-

अजून येतो वास फुलांना, अजून माती लाल चमकते;
खुरटया बुंध्यावरी चढून, अजून बकरी पाला खाते

असे काही पाहिल्यावर मर्ढेकरांच्या निराशवादांत पुन्हा एकदा आशातून धरु लागतो. 'शिथिल मनातिल कथिल' सोने व्हावे आणि त्या सोन्याने मुलखाचे मिनिट उजळून नावे म्हणूनच सुंदरलेला जडतेचा किरीट देऊन धाडले आहे अशी मर्ढेकरांची श्रद्धा आहे. अजून फुलांना वास येत आहे. माती लाल चमकते आहे. सगळीकडे खुरटलेपण आहे. त्या खुरटलेपणावरच आपली उपजिविका चालु आहे. कवी पुढे म्हणतो -

अस्मानावर भगवा रंग, आणि नागवें समोर पोट;
अजून डुलक्या घेत मोजते, हया दोहांतिल अंतर ढोर.

आता आपली कुठे पहाट होत आहे. म्हणजेच स्वातंत्र्य मिळाले आहे. परंतु तरीही आपले दारिद्रय संपले नाही. नागव्या पोरांच्या रुपकाच्या दारिद्र्याचे दर्शन मर्ढेकर घडवतात. परंतु दोघांमधला फरक आपल्याला समजत नाही. एवढी आपली मने गुरांसारखी झाली आहेत पुढे कवी म्हणतो -

भूकंपाचा इकडे धक्का, पलीकडे अन् युद्ध-नगारे;
चहुंकडे अन् एकच गिल्ला, जून्या शवांवर नवे निखारे.

माणसाने जगायचे तरी कसे एकीकडे भुकंपाने सर्वच उद्धवस्त होत आहे. तर दुसरीकडे युद्धाचे डोंब उसळले आहेत. सर्व बाजूंनी अनाचार, अनागोंदीपणा आहे. आधीच माणसे मेलेली आहेत आणि त्याच्यावर अजूनच युद्धाचे, भुकंपाचे निखारे झेलावे लागतात. अशा संवेदनशील वृत्तीने कवी वास्तव परिस्थितीचे दर्शन घडवितांना दिसतो.

फत्तरांतला देव पाहतो.
कुठे जहाली माझी फत्ते;
माणुस म्हणतो चिरंतनाचे,
मनांत माझ्या अस्सल कित्ते.

परमेश्वर दगडाचा आहे. तो हे सर्व पाहत आहे. हे घडविलेले त्याचेच आहे. कोणाची सरशी झाली हे न्याहाळतो आहे. माणसाने आपल्या मनात कायम राखलेल्या अशाच गोष्टी चिरंतन म्हणजे चालु राहणार आहेत.

चढेल तुसड़ी तेढीं नाती
निश्वरतेंतही चिरका नखरा;
शिजल्या मासांमधून कोणी
स्वर्ग हुंगतो बुलंद गहिरा

माणसा माणसांतील तुसडेपणा, नात्यांमधील तेढ अशी ही परिस्थिती आहे आपला शेवट आहे हे माहित आहे पण त्यामध्ये नखरा आहे. जे आता राहिलेच नाही त्यातच तो स्वतःचे मोठपण म्हणजे स्वर्ग पाहतो.

सटीक मानवतेची टिपणी, पुन्हा वाचली अर्थ तोच तरि;
आभाळाच्या पल्याड स्पंदन, टिपरी त्याची हया मडक्यावरी

काळ बदलला तरी मानवामध्ये बदल होत नाही अर्थ तोच निघतो. माणसातील स्पंदन हे आभाळाच्या पलीकडे आहे. टिपरी त्याची हया मडक्यांवरी म्हणजेच डोक्यात काहीच शिरत नाही.

जगून थोडे अखेर मरणे,
उघडझाप ही डोळ्यांचीच
अंधारांतून रडारचा,
किरण चालला सतत पुढेच.

जे काही जगणे आहे हे किडयामुग्यांसारखे आणि त्यातच मरण आहे. प्रकाश हा नाहीच आहे. जीवन हे अंधारमय आहे. जो काही किरण आहे तो दिशाभुल सतत पुढे चालला आहे त्यांच्यापर्यत पोहचता येत नाही.

कार्तिकांतले गव्हाळ ऊन
जरी मनाची अशा रितीने
फाडुनि बघते दिली कातडी
जखम आतली जुन्या भीतीने;

जसे कार्तिकातले गव्हाळ ऊन वर वर चांगले वाटले तरी शेवटी मनामध्ये कायमच भीती असते कारण नंतर तेच आपल्या कातडीची लाही-लाही करते. कारण माणसा माणसातील भेदाभेद जाऊ शकत नाही त्याच त्याच जुन्या जखमांचा प्रत्यय येत राहतो. पुढे कवी म्हणतो -

तरीही येतो वास फुलांना,
तरीही माती लाल चमकते,
खुरटया बुंध्यावरी चढून,
तरीही बकरी पाला खाते;

एवढे असूनही आपण त्यातच समाधान मानतो. वास फुलांना येतोच आहे. माती लाल चमकते आहे आणि खुरटं का जीवन असेना त्याच्यावरच माणसं आपली उपजिविका करत आहेत.

अस्मानावर भगवा रंग
आणि नागवें समोर पोर
तरीहि डुलक्या घेत मोजतें,
हया दोहोंतिल अंतर ठोर!
"अहो बत महदाग्यं दुष्ट व्यवसिता वयम " -

## ४.४ ब) कवी मंगेश पाडगावकर यांचा परिचय

कवी मंगेश पाडगावकर यांचा जन्म १० मार्च १९२९ रोजी कोकणातील वेंगुर्ला येथे झाला. मराठी व संस्कृत विषयांतून त्यांनी एम. ए. ची पदवी संपादन केली. अध्यापन आणि साहित्य निर्मिती हे त्यांचे कार्यक्षेत्र ठरले. त्यांनी काही काळ मुंबई येथील रुईया महाविद्यालयात मराठी भाषा विषयाचे अध्यापन केले आहे. पत्रकारितेच्या क्षेत्रातही मर्ढेकर काही काळ कार्यरत होते. पुढे आकाशवाणी केंद्रात निर्माता म्हणूनही त्यानी काम पाहिले. युनायटेड स्टेट्स इन्फर्मेशन सर्व्हिस, मुंबई या अमेरिका माहिती केंद्रात मराठी विभागाचे प्रमुख संपादक म्हणून ते कार्यरत होते.

साहित्य क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा गौरव होतांना त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रभूषण, साहित्य अकादमी पुरस्कार त्यांना प्राप्त झाले. संगमनेर येथे झालेल्या 'मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचे २०१० साली त्यांनी अध्यक्षपद भुषविले आहे.' तसेच विश्व साहित्य संमेलनाचे २०१० साली ते अध्यक्ष होते. २०१३ साली त्यांना 'पद्मभुषण' पुरस्कार प्राप्त झाला. २०१३ साली त्यांना 'महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार' त्यांना प्राप्त झाला.

'धारानृत्य' (१९५०), 'जिप्सी' (१९५३) हे त्यांचे आरंभीचे गाजलेले काव्यसंग्रह आहेत. त्यानंतर त्यांची अनेक काव्यसंग्रह ललित लेखनसंग्रह अशी पुस्तके प्रकाशित झाली. त्यामध्ये प्रामुख्याने छोरी (१९५७), शर्मिष्ठा (१९६०), उत्सव (१९६२), वात्रटिका (१९६३), भोलानाथ (१९६४), मीरा (१९६५), विदुषक (१९६६), बबलगम (१९६७), सलाम (१९७८), गझल (१९८१), भटके पक्षी (१९८४), तुझे गीत गाण्यासाठी (१९८९), बोलगाणी (१९९०), उदासबोध (१९९४), त्रिवेणी (१९९५), कबीर (१९९७), मोरु (१९९९), राधा (२०००), आनंदऋतू (२००४), सूर आनंद घन (२००५), मुखवटे (२००६), गिरकी (२००८), अखेरची वही (२०१३), या कविता संग्रहात त्यांच्या कविता आहेत. याबरोबरच त्यांचे चांदोमामा (१९९२), सुट्टी एके सुट्टी (१९९२), वेडं कोकरु (१९९२), आता खेळ नाचा (१९९२), असे बालगीत संग्रह आहेत. शिवाय त्यांची काही संपादने, ललित लेख संग्रह आहेत. १९५० ते २००४ सालापर्यंत त्यांनी अमाप काव्यलेखन आणि ललितलेखन केलेले दिसून येते.

मंगेश पाडगावकरांच्या कवितेवर कवी कुसूमाग्रज, बा. भ. बोरकर, भा. रा. तांबे याचा प्रभाव असले दिसून येतो. तसेच इंग्रजी कवी वर्डस्वर्थच्याही कवितांचा प्रभाव त्यांच्या काव्यलेखनात आढळून येतो. पाडगावकरांची कविता ही बिशुद्ध प्रेमकविता आहे प्रेम जाणीवेच्या विविध छटा त्यातील हळुवार भावाचे दर्शन होते प्रेमजाणीवेबरोबरच निसर्गाचे सौंदर्य देखील त्यांच्या कवितेतून अविष्कृत होतांना जाणवते. निसर्गातील विविध प्रतिमा त्यांच्या कवितेतून येतात. ही निसर्गचित्रे रेखाटतांना शब्दांची सौंदर्यपूर्ण गुंफण दिसून येते. जीवनातील नानाविध अनुभवांना सतत सामोरे जातांना त्यांची कविता दिसते. कधी मध्यमवर्गीयांच्या संवेदना मांडते. तर सामाजिक, राजकीय, धार्मिक व्यंग उपहासात्मक पद्धतीने मांडते. गझल, गेयता, भाव कवितेमुळे पाडगावकरांना अधिक लोकप्रियता मिळालेली आहे.

**४.४.१ प्रेम म्हणजे प्रेम असतं :**

कवी मंगेश पाडगावकर यांच्या 'बोलगाणी' काव्यसंग्रहातील ही प्रेमकविता प्रेमभावनांच्या विविध छटांचे दर्शन घडविते. प्रेम ही जशी हळुवार, नाजूक जाणीव आहे तशी ती गंभीर भावही घेवून येते. संबंध मन व्यापून टाकणारी ताकद प्रेमात आहे. प्रेमात वाटणारी हुरहुर त्यातील अनुभव, हे भावसौंदर्य कवितेतून येते. प्रेमाकडे रुक्षपणे पाहणाऱ्याचाही समाचार ही कविता येते.

प्रेमभावना ही सर्वव्यापी आहे. सर्वांचाच अनुभव यात सारखा आहे म्हणून त्यात आपण काही फरक करु शकत नाही. म्हणूनच कवी म्हणतो.

"प्रेम म्हणजे प्रेम असतं.
तुमचं आणि आमचं अगदी सेम असतं"

कवी विविध भाषेतील प्रेमाची व्याख्या उदाहरणे देवून व्यक्त होण्याची जाणीव शेवटी एकच आहे असे सांगतो. मराठीत इश्श्य म्हणून प्रेम करता येतं. तर उर्दुत त्याला इश्क म्हटले जाते. इंग्रजीत लव्ह म्हटले तरी प्रेमच व्यक्त होते. प्रेम व्यक्त करण्याला भाषेचे, व्याकरणाचे काही एक बंधन नसते म्हणून कमी म्हणतो,

व्याकरणात चुकलात तरी
प्रेम करता येतं,

वयाच्या सोळा वर्षे संपूण जेव्हा तारुण्यात प्रवेश होतो तेव्हा प्रेम भावना मनात उमलू लागते. मन स्वप्नांच्या हिंदोळ्यांवर झुलु लागते. अशावेळी कितीही संकटे आली तरीही त्याची पर्वा नसते. प्रेमात फार मोठी ताकद असते असे कवी सांगतो,

"सोळा वर्ष सरली की,
अंगात फुलं फुलू लागतात.
जागेपणी स्वप्नांचे
झोपाळे झुलू लागतात!"

उधाणलेल्या लाटांवर बेभान होवून स्वैरपणे जाण्याची तयारी त्यावेळी असते. अशावेळी आपल्याला बुडण्याचीही भीती त्यावेळी वाटत नाही कवी म्हणतो,

"बुडलो असतो तरी सुद्धा चाललं असते,
प्रेमाने अलगद वर काढलं असतं"

कधी कधी प्रेम भावनेला न मानणारी माणसे या जगात आपल्याला भेटतात, "प्रेम भावना हे सारे स्तोम आहे खोटं आहे" असेही ते म्हणतील. आम्ही कधी बायकोला फिरायला नेलं नाही, प्रेमबीम केल नाही. तरी आम्हाला पाच मुलं झाली, आमचं काही अडलं नाही, असे ते सांगतात परंतु प्रेमाशिवाय जगणे निरर्थक आहे. प्रेमाशिवाय आयुष्याला काहीच अर्थ नाही. हे प्रेम व्यक्त करायला फार मोठे दिव्य करावे लागत नाही. अगदी छोटया-छोटया बाबींतूनही व्यक्त होता येतं.

तिच्या सोबत पावसात कधी
भिजला असाल जोडीने।
एक चॉकलेट अर्ध अर्ध
खाल्लं असाल गोडीने।

आपल्या प्रिय सखी सोबत पावसांत भिजणे, एकच चॉकलेट खाणे, भर उन्हात तिच्यासोबत भटकणे, हे सर्व अनुभव म्हणजे जीवन समृद्ध करण्यासारखे आहे असे कवी म्हणतो. प्रेम व्यक्त करतांना दोन ओळीची चिठ्ठी लिहुनही करता येते आणि घट्ट मिठीच्या माध्यमातूनही करता येते.

"दोन ओळीची चिठ्ठी सुद्धा प्रेम असतं,
घट्ट घट्ट मिठीसुद्धा प्रेम असतं,
प्रेम म्हणजे प्रेम म्हणजे प्रेम असतं!"

कवी म्हणतो, प्रेमात रूसणे असते, डोळ्यांनीच हसणे असते, भांडण असते तसेच चांदण्याचीही बरसात असते. जगात कोठेही गेला तरी हा अनुभव सारखाच असणार आहे यात बदल होणार नाही. कारण प्रेमभाव हा सगळीकडे सारखाच असतो. असे कवी या कवितेतून सांगतो आहे.

### ४.४.२ '**दिवस तुझे हे फुलायचे**' -

मंगेश पाडगावकरांनी भावकविता हा काव्यप्रकार समर्थपणे हाताळला. या कवितेत 'दिवस तुझे हे फुलायचे' ही भावकविता महत्त्वाची ठरली आहे. तारुण्यात नुकताच प्रवेश केलेल्या युवतीचे भावविश्व उलगडणारी ही कविता आहे.

तारुण्यात जेव्हा एखादी तरुणी प्रवेश करते तिचे मन चंचल असते, आपल्या भावी आयुष्याची स्वप्ने रंगविण्यात ते रमलेले असते. आणि स्वप्नांच्या हिंदोळ्यावरच ते झुलत असते. कवी म्हणतो,

दिवस तुझे हे फुलायचे
झोपाळ्यावाचून झुलायचे
स्वप्नात गुंगत जाणे
वाटेत भेटते गाणे
गाण्यात हृदय झुरायचे

या दिवसात सतत निरनिराळी स्वप्ने पाहण्यात ती रममाण असते. गाणीही गुणगुणात असते. आपल्या स्वप्नातील राजकुमाराला भेटण्यासाठी मनोमन झुरत असते. स्वप्नात कधी गगणाला गवसणी घालते तर चांदण्या रात्रीत मनमुराद भटकून भावी आयुष्याचे इमले रचत आणाभाकाही ती घेते. तिचे मन अतिशय हळवे झालेले असते. नुसत्या स्पर्शानेही ती थरथरते. तारांना सुरांचाही भार व्हावा, फुलांच्या वर्षावानेही जखम व्हावी, इतकी नाजुक अवस्था तिची झालेली असते. कवी म्हणतो -

भरारे कोवळी तार
सोसेना सुरांचा भार
फुलांनी जखमी करायचे

अशा या भावविव्हल अवस्थेत आपल्या स्वप्नातील राजकुमाराचा आधार हवा असतो. कवी म्हणतो, तू डोळेमिट स्वप्नात तुला राजकुमाराचे घर दिसेल, त्याच्याजवळ तु थांब तुझे दोलायमान झालेले मन तिथेच शांत होईल तुझ्या मनाची झालेली ही संभ्रमाव्यस्था तुझ्या राजकुमाराच्या भेटीनेच संपेल
कवी म्हणतो,

'माझ्या या घराच्यापाशी
थांब तू गडे जराशी
पापण्या मिटून भुलायचे'

### ४.४.३ 'मी फुल तृणांतील इवले...' -

कवी मंगेश पाडगावकर यांच्या अनेक कविता या निसर्गकविता आहेत. या कवितांच्या माध्यमातून ते सहजगत्या निसर्गात रंगून गेलेले दिसतात. निसर्गाच्या बदलत्या रुपाचे निरिक्षण करुन त्यातील रंगांच्या, रुपांच्या, गंधांच्या, छायाप्रकाशाच्या, सुक्ष्म हालचालींच्या विविध छटांतील सौंदर्य टिपून त्यांनी ते आपल्या कवितांमध्ये मांडले आहे. निसर्गाशी ते सहज संवाद साधतात.

'जिप्सी' या काव्यसंग्रहातील 'मी फुल तृणांतील इवले' ही कविताही अशीच आहे. यात एका रानफुलाने सुर्याला साद घातली आहे. गवतामध्ये उगविलेले हे छोटेसे रानफुल आहे ते सुर्याला म्हणते,

शक्तीने तुझिया दिपुनी
तुज करितिल सारे मुजरे
पण सांग कसे उमलावें
ओठांतिल गाणे हसरें ?

तुझ्या सामर्थ्याने तू दहा दिशा प्रकाशमान करुन. उजळवून टाकशील, तुझी अचाट शक्ती पाहून सारे विश्व दीपून जाईल. सारे जग तुझ्यापुढे नतमस्तक होतील. मात्र तुझ्या तेजाने मी काही प्रभावित होणार नाही. या उलट पहाटे पडणारे दवबिंदू, गवताचे इवलेसे पाते मला जिंकुन घेईल. झुळझुळ वाहणारा वारा माझ्याबरोबर रेशमी, हळुवार नाते जोडेल.

कुरवाळित येतिल मजला
श्रावणांतल्या जलधारा
सळसळून भिजली पाने
मल करितिल सजल इशारा

श्रावणातील रिमझिम जलधारा मला कुरवाळतील या जलधारांनी भिजलेली तृणपाती मला इशारा करतील; असे सांगून ते रानफुल सुर्याला म्हणते, माझा इवलासा जीव तुझ्या प्रखर तेजापुढे त्याचा काय निभाव लागणार, माझा रंग, गंध हा तुझ्या सामर्थ्यापुढे फिका आहे. मी तुझ्यात कसा काय मिसळून जाऊ, त्यापेक्षा

येशिल का सांग पहाटे
किरणांच्या छेडीत तारा
उधळित स्वरांतून भवती
हळु सोनेरी अभिसारा

तु पहाटे कोवळ्या किरणाचा पिसारा फुलवून येशील का. या सोनेरी किरणांनी दशदिशा उजळून टाकशील का.

रानफुल म्हणते धुक्यातून मला शोधत होऊन तू ये तुझे तेज सामर्थ्य विसरुन तू ये, माझ्याही नकळत तू मला फुलव. मी तुझ्यात सामावून जाईल.

### ४.४.४ 'रात्रभर आपण चालत आहोत...' -

आयुष्यात अनेक संकटे, आव्हानांना सामोरे जावे लागते. अनेकदा अशी संकटांची मालिका आपली परीक्षा पाहात असते. अशावेळी वर्तमान भविष्य अंधकारमय वाटु लागतो. या साऱ्या काळाला कवी मंगेश पाडगावकर यांनी रात्रीची उपमा दिली आहे ते म्हणतात, कितीही असली अंधार असला तरी केव्हा तरी पहाट होणारच. तेव्हा आपण कोठे असु हे सांगता येणार नाही. पण तोवर तु तुझ्या पायातील त्राण कायम ठेव. रात्रभर चालून कुठेही पोहचलो तरी पहाट होणारच. तोपर्यंत धीर धर. कवी म्हणतो.

पहाट होईल तेव्हा आपण कोठे असु ?
पायांतले त्राण राहुन ठेव
कुठेही असलो तरीही पहाट होणारच
तू धीर धर आपण धीर धरु
रात्रभर आपण चालत आहोत....

कवी म्हणतो, रात्रीच्या अंधाराला तू भिऊ नकोस, माझा हात हाता धर. झाडाने पाखराला सांगितलेली एक गोष्ट तुला सांगतो. झाड पाखराला म्हणते, अंधार आहे, याचा अर्थ प्रकाश नाही. पण अंधारामागून प्रकाश येतोच. मग अंधार उरत नाही. ही गोष्ट ऐकुन पाखरु विश्वासाने झोपले, उदया पहाट होणार, प्रकाश येणार, या आशेवर हीच आशा रात्रभर चालणाऱ्यांनीही मनात बाळगायला हवी. ही गोष्ट त्यांच्यासाठीच आहे. कवी म्हणतो -

झाड म्हणाले, अंधार असतो, म्हणजे प्रकाश नसतो
पण प्रकाश येतोच आणि मग अंधार उरत नाही
पाखराने गोष्ट ऐकली आणि ते विश्वसाने झोपले
ही गोष्ट फक्त रात्रभर चालणाऱ्यांसाठीच आहे.

कवी म्हणतो, रात्रीच्या काळोखात चालत असतांना ती गोष्ट तुमची सोबत करेल. आणि झाडे पाखरांशी कधीच खोटे बोलत नाहीत. कारण त्याने सांगितलेल्या गोष्टीनुसार, दुसऱ्या दिवशी पहाट होते आणि झाडावरची फुले उमलतात, जी पाखरांना आनंद देऊन जातात.

रात्रभर चालत असतांना आपण कोठेही असलो तरी पहाट होणारच. त्यावेळी आपण नक्की जागे असु आणि कोठेही असलो तरी प्रकाशात असु अर्थातच संकटांची, आव्हांनाची मालिका संपून आपल्या अंधारमय आयुष्यात सुखाची पहाट केव्हातरी उगवेलच आणि ती आपले जीवन उजळवून टाकेल. त्यावेळी पाखरेही आनंदी होऊन उडत असतील, फुले उमलून त्यांचा सुवास आसमंतात दरवळत असेल आणि त्याही वेळी माझा हात तुझ्या हातात असेल, जो रात्रीच्या काळोखात अर्थात संकट काळात मी पुढे केलेला होता. त्यानंतर सर्वत्र प्रकाश असेल, मात्र त्याकरता रात्रभर चालावे लागणार आहे.

## ४.५ समारोप

कवी बा. सी. मर्ढेकर हे नवकवी आहेत. मर्ढेकर अत्यंत संस्कारक्षम आहेत. मात्र ते जून्या कवीसारखे भावनेंत वाहून नात नाहीत. नवकवी भावनाप्रधान नसून विचारप्रधान आहे. तो बदलत्या परिस्थितीला पूर्ण जागरुक असतो. विज्ञान प्रगतीबरोबर झपाटयाने पालटणाऱ्या परिस्थितीतून, नवकवींच्या विचाराला चालना आणि भावनेला चेतना मिळते. त्याचया मेंदू आणि हृदय पिळवटून काही एक मिश्रण तयार होते. ग्रामोपाध्ये सांगतात कि, "भावनात्मक आणि वैचारिकता यांच्या रासायनिक प्रक्रियेतून" नवकवीचा आंतरिक आशय आकारतो.

मर्ढेकर सौंदर्याचे परमभक्त होते म्हणूनच आजच्या जीवनांत सुंदराचे कुरुप झालेले पाहून त्यांच्या मनाला इतका पिळ बसला. त्याचा सादपडसाद त्यांच्या मनाच्या बाहयाभ्यन्तरांतून निघतो.

कवी मंगेश पाडगावकर यांनी रात्रभर आपण चालत आहोत या कवितेच्या माध्यमातून एक प्रकारचा आशावाद व्यक्त केलेला आहे. प्रयत्न करणाऱ्यांना यश हे येतेच अशी जाणीव व्यक्त केली आहे.

❖❖❖❖

# घटक -५

## बहिणाबाई चौधरी, पद्मा गोळे

**घटक रचना :**

५.१ अ) कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचा परिचय
५.१.१ संसार
५.१.२ मन
५.१.३ हिरीताचं देन घेनं
५.१.४ मानूस
५.२ ब) कवयित्री पद्मा गोळे यांचा परिचय
५.२.१ आम्ही कुलीनांच्या कन्या
५.२.२ अवखळ ये पोरीसमान
५.२.३ मी इथली
५.२.४ आईपणाची भीती
५.३ समारोप

## ५.१ अ) कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचा परिचय

निसर्गकन्या खानदेशातल्या आसोद या गावच्या माहेरवाशीण बहिणाबाई, शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या आणि जीवन व्यतीत केलेल्या बहिणाबाई चौधरी निरपेक्ष परंतु प्रतिभा संपन्न कवयित्री होत्या. त्यांचे काव्यविश्व शेतकरी स्त्रीचे विश्व आहे. त्याचबरोबर त्यातून शेतकरी संस्कृतीचे मार्मिक चित्रण होते. या कवियित्रीचे संवेदन माती, निसर्ग, प्राणी ऋतू, संसार, समाज, आणि मानवी स्वभावाशी निगडित आहे.

(मन) या कवितेतून कवयित्री सर्जक चिंतन व्यक्त करते. घर संसाराची कविता त्यांच्या काव्यातून चित्रित होते. बहिणाबाईची गाणी (१९५२) मधील या नव्वद पानांच्या लहानशा पुस्तकातून शेतकरी पेशाच्या निसर्गकन्येचे मन जीवनातल्या सुख दुःखाची अनुभूती चित्रित करते.

ग्रामीण जीवन संस्काराच्या मधून ही कविता आल्यामुळे तिच्यात साधेपणा आणि गोडवा आलेला आहे. सूक्ष्म निरीक्षणशक्ती, कल्पकता, कथात्मता, नाट्य, सुख दुःखाकडे समतेने पाहण्याचे शहाणपण, (जगण्यातल्या सुख दुःखातून आणि संकटातून शिकलेले) उपजत विनोद बुध्दी (उपहासातून निर्माण होणारा विनोद) मानवी जीवनाबद्दलची सखोल सहानुभूती ही व अशासारखी त्यांच्या कवितेची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

munotes.in

**५.१.१ 'संसार' :**

श्रीमती बहिणाबाई चौधरी यांच्या 'बहिणाबाईंची गाणी' या काव्यसंग्रहातील 'संसार' ही कविता संसाराचे वास्तव चित्र रेखाटतांना बहिणाबाईंची काव्यमय दृष्टी दिसून येते. संसार ही गोष्ट अशी आहे की आधी चटके सोसावेत लागतात. त्यावेळीच पुढे आयुष्यात सुखाचे दिवस दिसतात. हे पटवून देण्यासाठी बहिणाबाईंची काव्यमयता कशी फुलून येते हे दिसते.

बरा संसार संसार
जसा तवा चुल्हयावर
आधी हाताला चटके
तेव्हा मियते भाकर

तवा तापला आणि भाकरी टाकतांना हाताला चटके बसू लागले म्हणजे संसाराची रहस्ये काव्यरुपाने बहिणाबाईंच्या मुखावाटे प्रकट होतात.

करा संसार संसार
खोटा कधी म्हणू नही
राऊळाच्या कयसाले
लोटा कधी म्हणू नही

संसार करतांना त्यामध्ये नाराजी कधीच असू नये. कितीही दू:ख झाले तरी त्यात समाधान मानणे गरजेचे असते. संसाराला खोटा कधीच म्हणू नये. यासाठी बहिणाबाई राउळाच्या कळसाची उपमा देतात. जरी कळस हा लोट्यासारखा भासला तरी तो कळसच असतो.

अरे, संसार संसार
खीरा येलावरचा तोड
एक तोंडा मधी कडू
बाकी अवघा लागे गोड

खिरनी म्हणजे निंबोणीच्या आकाराचे फळ. ते सुरुवातीला कडू वाटले तरी पुढे संपूर्णपणे गोड असते. तसाच संसारामध्ये एखादा कडू अनुभव आला म्हणून त्याला नाकारु नका, तर तो शेवट गोडच करतो.

अरे, संसार संसार
नही रडनं कुढनं
येड्या. गयातला हार
म्हनू नको रे लोढनं

संसार हा कधीच रडत कुढत करु नका, सौभाग्यवतीच्या लेण्याला म्हणजेच गळ्यातला मंगलसूत्राला कधीच लोढणं (जनावर कुठेही पळू नये म्हणून त्याच्या गळ्यात बांधण्यात येणारे बांबू किंवा लाकूड) म्हणू नका. ते सौभाग्याचे प्रतिक असते.

ऐका, संसार संसार
दोन्ही जीवाचा इचार
देतो दु:खाले होकार
अन् सुखाले नकार

संसार म्हणजे दोन्ही जिवांचा विचार आहे. त्यामध्ये कधी कधी दु:ख पदरी पडत असते. तर कधी सुखाला नकार देत असतो. यालाच संसार असे म्हणतात. संसारात सुख हे सहज मिळत नाही ते खरे तर मानण्यावर असते ही कल्पना आपल्या काव्यातून बहिणाबाई मांडताना दिसतात.

देखा, संसार संसार
दोन्ही जीवाचा सुधार
कधी नगद कधी उधार
सुख दु:खाचा बेपार

संसारात कधी सुख असते तर कधी दु:ख असते. कधी ते तात्काळ मिळते तर कधी उशीरा असा हा संसाराचा व्यापार आहे.

अरे, संसार संसार
असा मोठा जादूगार
माझ्या जीवाचा मंतर
त्याच्यावरती मदार

संसार हा मोठा जादूगार आहे. त्यामध्ये काय होईल आणि काय नाही? शेवटी जीवनाचा जो मंत्र आहे, त्याच्यावर विश्वास ठेवून तो हाकावा लागतो. कवियित्री बहिणाबाई चौधरी यांनी संसारामधील चढ-उतार विविध उपमा देऊन दाखवून दिले आहेत. संसार हा कधीही सोपा, सरळ असा नसतो. त्याला कष्ट तर असतातच पण त्याचबरोबर सुख हे मानावे लागते. त्यालाच संसार असे म्हणतात.

या कल्पना आधुनिक पंडितांना स्तिमित करुन टाकील अशा आहेत. जग हे मिथ्या आहे आणि संसार म्हणजे माया आहे ह्या विरक्तीच्या तत्त्वज्ञानाने महाराष्ट्रातल्या गोरगरिबांचे फार नुकसान झाले आहे. ह्या अडाणी शेतकरी कवियित्रीने 'संसार' या कवितेत फारच सुंदर अन् सामर्थ्यवान संदेश दिला आहे. 'संसाराला कधी खोटा म्हणू नये.' देवळाच्या कळसाला का कूणी लोटा म्हणते? संसार म्हणजे काही नुसते रडणे अन् कुढणे नाही. गळ्यातल्या हाराला कुणी का लोढणे म्हणते? संसार हा खिर काकडीसारखा आहे. 'वर तोंडाला ती कडू असते पण बाकीची सारी गोडच लागते.'

याविषयी प्रा. प्र. के. अत्रे आपल्या प्रस्तावनेत म्हणतात, महाराष्ट्रात कोणत्या संताने किंवा कवीने संसाराचे अशा रसाळ शब्दात सांगितले आहे? मानवी जीवनामध्ये शुद्ध प्रेम आहे, स्वार्थ नाही. जीवन हे 'हृदयाचे देणे घेणे' हा बहिणाबाईंचा दुसरा तेजस्वी संदेश आहे. मुख्य म्हणजे 'अरे संसार संसार' या कवितेला 'फाळके पुरस्कार' लाभला आहे.

### ५.१.२ 'मन' :

कवियित्री श्रीमती बहिणाबाई चौधरी यांनी 'मन' या कवितेतून मानवी मनाच्या सैरभैर वर्तनावर नेमकेपणाने बोट ठेवले आहेत. प्रा. के. अत्रे यांनी याविषयी मार्मिक वर्णने केले आहे. महाकवी झाला तरी तो ह्यापेक्षा अधिक काय आणखी बोलू शकतो? समर्थानी 'मना' वर श्लोकांचा एवढा डोंगर रचून ठेवला आहे. पण -

मन वढाय वढाय
उभ्या पीकातलं ढोर
किती हाकला हाकला
फिरी येतं पिकांवर

मन हे ओढाळ आहे. आपण कितीही एकाग्रता आणण्याचा प्रयत्न केला तरी काही क्षणातच आपले मन तिसराच विचार करायला लागतो. यासाठी बहिणाबाई चौधरींनी शेतामध्ये खायला येणाऱ्या गुरांची उपमा दिली आहे. कारण शेतात चरायला येणाऱ्या गुरांना कितीही हाकललं तरी ते काही वेळाने त्या शेतामध्ये पुन्हा येतच राहते.

मन पाखरु पाखरु
त्याची काय सांगू मात ?
आता व्हतं भुईवर
गेलं गेलं आभायात

तसंच मनाचे आहे. मन हे असे चंचल आहे की ते माणसाच्या आवाक्याबाहेरचे आहे. मन कसे कुठे भरकटेल याची खात्री देता येत नाही. केव्हा आभाळात तर क्षणात भुईवर म्हणजेच सर्वत्र ते संचार करीत असत. कवियित्री बहिणाबाई चौधरी याला रोजच्या व्यवहारातील उदाहरणे देतात.

मन मोकाट मोकाट
त्याले ठायी ठायी वाटा
जशा वाऱ्यांन चालल्या
पान्यावऱ्हल्यारे लाटा

माणूस स्वतःला एखाद्या ठिकाणी कोंडून ठेवू शकतो. परंतू तरी त्याचे मन मात्र सर्वत्र भरकटच असते. मनाला अनेक वाटा आहेत. त्यासाठी बहिणाबाई चौधरी पाण्यावरील लाटांची उपमा देतात. जशा वाऱ्यां पाण्यावरील लाटा ह्यायेतच असतात तसेच मन आहे त्याला बंदिस्त करुन ठेवताच येत नाही. ते मनुष्याच्या हातामध्ये केव्हाच नसते. पुढे त्या म्हणतात -

मन लहरी लहरी
त्याले हाती धरे कोन ?
उंडारलं उंडारलं,
जसा वारा वाहादन

मानवी मन हे लहरी आहे. त्याला कोणही थोपवुन ठेवू शकत नाही. जशी वाऱ्याची वावटळ येते मग त्याला कोणीही थोपवू शकत नाही तसेच मानवी मनाचे आहे. ते कुठेही कसेही भरकटत जाते.

मन जहरी जहरी,
त्याचं न्यारं रे तंतर
असे इंचू साप बरा,
त्याला उतारे मंतर !

कवयित्री बहिणाबाई चौधरी मनाचा वेध घेतांना म्हणतात की, मन हे जहरी आहे. मनातील विषयाला उपाय काहीच नाही. एकवेळ विंचू सापाला यांच्या विषाला उतारे आणि मंत्र - तंत्र तरी आहे. हा भाषेचा अन् विचारांचा हृदयंगम मासला 'मनाच्या श्लोका'त कुठे आढळून येईल काय ? आणि मनाच्या रचनेसंबंधी शेवटी बहिणाबाईंनी देवाला प्रश्न केला आहे की,

देवा, असं कसं मन, असं कसं रे घडलं

कुठे प्रकारे मनाची जडण - घडण करणारा देव योगीच आहे. तुझीच ही करामत आहे. पुढे मनाच्या व्यापकतेबद्दल बहिणाबाई चौधरींची अशीच प्रतिभा खुलून येते आणि त्या म्हणतात -

मन एवढं एवढं, जसा खाकसचा दाना
मन केवढं केवढं ? आभायात बी मायेना

एखाद्यावेळी मन हे खसखसाएवढे बारीक म्हणजेच संकुचित असते, तर काहींच्या कृतीत हेच मन आभाळत मावणार नाही याची प्रचिती येते. म्हणजेच संकुचित आणि व्यापकतेसाठी बहिणाबाईंनी खसखस आणि आभाळाची यथार्थ अशी उपमा दिली आहे.

प्र. के. अत्रे यांनी बहिणाबाईंच्या 'मन' या कवितेची तुलना समर्थ रामदासांच्या मनाच्या श्लोकांशी केलेली आहे. ते प्रस्तावनेत म्हणतात भाषेचा अन् विचारांचा हृदयंगम मासला 'मनाच्या श्लोका'त कुठे आढळून येईल काय ? असा ते प्रश्न विचारतात.

### ५.१.३ हिरीताचं देनं घेनं :

मानवी जीवनाचे रहस्य शुद्ध प्रेम आहे, स्वार्थ नाही. जीवन हे 'हृदयाचे देणे घेणे' आहे. हा बहिणाबाईंचा तेजस्वी संदेश होय.

नको लागू जीवा, सदा मतलबापाठी
हिरीताचं देनं घेनं नही पोटासाठी

त्या म्हणतात, माणसा सतत स्वार्थासाठी जगू नको, हृदयाची देवाण - घेवाण ही पोटासाठी नाहीच आहे.

उभे शेतामधीं पिकं, ऊन वारा खात खात
तरसती 'कव्हा जाऊ, देवा, भुकेल्या पोटात'
पेटवा ने चुल्हा आता, मांडा ताटवाटी
नको लागू सदा जीवा, मतलबापाठी

जसं शेत ऊन, वारा झेलत शेतामध्ये उभे असते, पण त्याला या ऊन वाऱ्याचे काहीच वाटत नाही. ते कायम विचार करत असते की देवा मी भूकेल्याच्या पोटामध्ये केव्हा जाऊ धान्य पिकलं की त्या म्हणतात आता चुल पेटवा आणि ताटवाटी मांडा म्हणजे जेवणाची तयारी करा. ऊन आणि वारा पाऊस खात पिके शेतात उभी असतात. कशासाठी भुकेल्यांच्या पोटात आम्हांला लौकर जाऊ दे रे असा मनामध्ये ती देवाचा धावा करीत असतात. बहिणाबाई अशा पद्धतीने सुंदर उपमा देतात तेव्हा त्यांच्या उच्च प्रतिभेची कल्पना येते.

पाहीसनी रे लोकाचे. यवहार खोटे नाटे
तव्हा बोरी बागयीच्या, आले अंगावर काटे
राखेयीच्या झाल्या शेताले कुपाटी
नको लागू  सदा जीवा, मतलबापाठी

माणसांचे खोटे नाटे व्यवहार बघून तर बोरी बाभळींच्या अंगार काटे  आले तरी देखील माणसांवर उपकार करण्यासाठी त्याच्या शेताभोवती आपल्या शरीराची त्या कुंपणे करतात!

किती भरला कनगा, भरल्यानं होतो रिता
हिरीताचं देनं घेनं, नही डाडोराकरता
गेली देही निंघीसनी नाव रे शेवटी
नको लागू सदा जीवा, मतलबापाठी

पोट कितीही भरले तरी ते शेवटी  रिकामेच होणार! अन् शरीर तर  एक दिवस निघूनच जाणार! मागे जे काही शिल्लक  राहाणार ते फक्त ह्रदयाचे देणे घेणे.  दुसरे काही नाही. शुद्ध आणि निःस्वार्थी  प्रेमाचे यापेक्षा अधिक ह्रदयंगम स्त्रोत्र कोण  लिहू  शकेल?

कवयित्री श्रीमती  बहिणाबाई चौधरी यांनी मनुष्याच्या स्वार्थी वृत्तीचे वर्णन निसर्गाच्या उदाहरणाने पटवून दिले आहे. माणसाला तर ह्रदय आहे.  परंतु तो त्या  ह्रदयाने व्यवहार केव्हाच करत नाही.  निसर्ग निस्वार्थीवृत्तीने कशा प्रकारे वावरत असतो याचे बारीक बारीक तपशील त्यांच्या प्रतिमांमधून उमलत जातात. असे काव्य पहिले की, श्रेष्ठ कवियीत्री असे बहिणाबाईंना का संबोधले जाते याची प्रचिती येते.

**५.१.४ 'मानुस' :**

कवयित्री श्रीमती बहिणाबाई चौधरी यांना सर्वात कशाची जास्त चीड असेल तर ती माणसाच्या स्वार्थातून निर्माण झालेल्या त्याच्या कृतघ्नपणाची! त्या माणसाला संतापून म्हणतात.

मानूस मानूस, मतलबी रे मानसा,
तुले फार हाव, तुझी हाकाकेल  आशा

माणसा तू खरंच मतलबी आहेस. मानूस म्हणून घेतोस पण माणूसपण तुझ्यात नाहीच. तुला प्रत्येक  गोष्टीचीच फार हाव आहे. तुझी  आशा ही  सतत हपापलेलीच आहे. आजच्या काळात मंत्र्यांना भ्रष्टाचाराचा झालेल्या 'भस्म्या' पाहिला की बहिणाबाईंच्या या पोटतिडकीचा खरंच प्रत्यय येतो.  माणूस किती हावरट झाला. आहे हे समजून येते.  त्यासाठी त्यांनी वापरलेल्या गोठ्यातल्या गाय-म्हैशीची रुपक समर्पक अशीच वाटतात.

मानसा मानसा, तुझी नियत बेकार
तुझ्याहून बरं, गोठ्यांतल जनावर
भरला डाडोर, भूलीसनी जातो सूद
खाईसनी चारा, गायम्हैस देते दुध

माणसाला, तुला नियत नाही रे. तुझ्यापेक्षा ते गोठ्यातले जनावर बरे. गायन् म्हैस चारा खाऊन दूध तरी देतात. तुझे एकदा पोट भरले की, तू उपकार साफ विसरुन जातोस.

मतलबासाठी, मान मानूस डोलये
इमानाच्यासाठी, कुत्रा शेपूट हालये

कुत्रा आपले शेपूट इमानीपणाच्या भावनेने हालवतो. तर माणसा, तू आपली मान मतलब साधण्यासाठी हालवतोस. केवळ लोभामुळे तू माणूस असूनही काणूस (पशू) झाला आहेस. एवढे सांगून झाल्यानंतर बहिणाबाईंनी माणसाला तळमळून विचारले आहे.

मानसा, मानसा, कधी व्हशील मानूस!
लोभासाठी झाला, मानसाचा रे कानूस!

मानवतेलाच जणू काही त्यांनी हे व्याकूळ हृदयांचे आव्हान केले आहे! स्वार्थाचा वणवा सर्व जगभर आज पसरलेला आहे. माणसे पशू होऊन एकमेकांशी झगडत आहेत. मानवता आज रक्तबंबाळ झाली आहे. म्हणूनच 'माणसा, माणसा, कधी होशील माणूस?' हीच आर्त हाक मानवतेच्या कल्याणासाठी तळमळणाऱ्या संतमहात्म्यांच्या कारुणिक अंतःकरणातून उचंबळते आहे! माणसाने माणूस कसे व्हायचे हीच प्रचंड समस्या मानवजातीपुढे आज उभी आहे.

हा समस्येचा साक्षातकार बहिणाबाईंसारख्या खानदेशातील एका अडाणी शेतकरी महिलेला व्हावा, हा तिच्या प्रतिभासामर्थ्याचा केवढा पडताळा आहे! माणसांच्या कल्याणाचा जे नुसता कांगावा करतात ते पंडित कवी 'नराचा नारायण' करण्याच्या वारेमाप वल्गना करीत असतात. पण माणसाच्या जन्माला येऊन तो अजून पूरता माणूसही झाला नाही, हे मानवतेच्या व्याधीचे अचूक निदान श्रीमती बहिणाबाई चौधरी या निरक्षर कवियित्रीने केले आहे.

## ५.२ ब) कवयित्री पद्मा गोळे यांचा परिचय

यांचा जन्म तासागावचे संस्थानिक पटवर्धन यांच्या घराण्यात झाला. शिक्षण : एम. ए. व्यवसायःलेखन, वास्तव्यः पुण्यात होते. शाळेत असतानाच नाट्यलेखन आरंभ नंतर काव्यक्षेत्रातच रमलेल्या दिसतात.

त्यांचे कविताविश्व, प्रितीपथावर (१९४७), नीहार (१९५४), स्वप्नजा (१९६२), आकाशवेडी (१९६८) आणि श्रावणमेघ (१९८८) या कवितासंग्रहात सामावलेले आहे. त्यांच्या काव्यात शालीनता, संयम, निरागसता, स्नेह, मुग्धता या व अशासारखी गुणवैशिष्ट्ये चित्रित होतात.

प्रेम आणि निसर्ग या व अशासारख्या अनुभूती परस्परपूरकतेने त्यांच्या कवितातून प्रकट होतात. त्यांच्या कवितातील स्त्रीप्रतिमांत (सीता, सावित्री, राधा, कुंती, कुब्जा या व अशासारख्या पौराणिक आणि जिजाबाई, झाशीची राणी या व अशासारख्या ऐतिहासिक प्रतिमा).

माहेरचे कौतुक करणारी, सासरी सुखाने नांदणारी, नातवाचे कौतुक करणारी आजी या व अशासारख्या कौटुंबिक प्रतिमा विविधता दिसते.

प्रणयाच्या विविध छटा, प्रीतिभावनांचे विविध पैलू, प्रियकरात रमणारी शालीन आणि विनयशील वृत्ती मुग्ध निरागस जीवनाकडे वळून पाहणारे आतुरलेले मन हे त्यांच्या कवितेचे लक्षणीय विशेष आहेत.

### ५.२.१ आम्ही कुलीनांच्या कन्या :-

कवयत्री पद्मा गोळे यांचे लेखन मुळात सुसंस्कृत अशा पद्धतीने आहे. त्यामुळे त्यांच्या काव्यामध्येही कुठेही आक्रस्ताळेपणा नाही किंवा समाजाबद्दलचा विषय नाही परंतू तरीही त्यांचे संवेदनशील कवीमन त्यांच्या काव्यातुन द्विपदी दिसुन येते. त्यावेळच्या उच्चभ्रू कुटुंबातील स्त्रियांची मानसिकता व प्रतिनिधित्व आम्ही कुलीनांच्या कन्या या काव्यातून त्या करतात.

आम्ही कुलीनांच्या कन्या, चाफेकळ्या पानांआड
मुळी मांडू ना आरास, मुग्धपणें लावू वेड!

मुळात उच्चभ्रु समाजात फारशा कोणत्याच विवंचना नव्हत्या. स्त्रियांना सर्व काही मिळत होते. परंतु सोन्याच्या पिंजऱ्यातील पोपटाची जशी अवस्था असते तशीच अवध्या या स्त्रियांची होती. चाफेकळ्या पानांआड यातुन कुलीनांच्या मुलींना माजघराच्या बाहेर यायची परवानगी नव्हती. कोणताही साजशृंगार न करता मुकेपणाणिच वेड लावायचे म्हणजे स्त्रीचे कर्तव्य मात्र पार पाडायचे त्या पुढे म्हणतात.

आम्ही कुलवती कन्या, वाद कुळाचा ना घालू
शब्द चतुर मोजके, हिरे-माणकांशी तोलूं

कुलीनांच्या मुलींना चर्चेमध्ये बोलायचा अधिकार नव्हता. बोलायचे ते थोडक्यात मोजक्या शब्दांत कचा कचा भांडण, मोठया आवाजात बोलायची परवानगी नव्हती. त्यांचे शब्द म्हणजे हिरे-माणकांसारखे दुर्मीळ असेच होते.

आम्ही कुलशीलवती नाही बोलणार प्रीत
कुलीनांच्या डोळ्यांनाच, समजेल गुढ हित!

आम्ही उच्चभ्रु कुळातल्या मुली, त्यामुळे आम्हाला कोणत्याही प्रेमविषयक शब्द उच्चारायची परवानगी नाही, आमचे प्रेम वगैरे व्यक्त करणे हे डोळ्यांतूनच आणि समोरच्यालाही म्हणजेच कुलीनांनाच आमचा हेतु समजेल. म्हणजेच अबोलपणात सर्व काही दडलेले आह

डोळा कराल वाकडा, कडाडेल वीज जशी
सखी शृंगार-मंजिरी, लीलावती पतीपाशी!

आमच्याकडे कोणीही वाईट नजरेने पाहायची हिंमत करणार नाही. आणि जर केलात तर वीज कडाडते. तशा आम्ही कडाडुन उठू. आमचा शृंगार प्रीती आणि आमचे सखीपण हे फक्त पतीपाशीच चालते.

कर्ते घरचे गर्जती, आज्ञा देती रागें कोणा
वाजताच कंकणे ही, होई अटक शब्दांना !

बोलण्याची विषाद नाही. कारण घरातील कर्त्या व्यक्तीच्या पुढे कोणाचेच काही चालत नाही. असे घडले तर आमचे शब्द तिथल्या तिथेच गोढुन जातील

पाऊल ना ओलांडील, व्यर्थ कधीच उंबरा
दरबारी, दंवडीत, पायरवाचा दरारा!

कुलीनांच्या मुलींना कधीच घराचा उंबरा ओलांडायची परवानगी नव्हती. आमचे आयुष्य म्हणजे घर आणि देवघर. आमचा तेथेच फक्त दरारा चालतो. यापलीकडे मुलीनांच्या मुलींना विश्वच नाही.

झालें विलीन आमुचें, व्यक्तिमत्व घराण्यांत
सुंगधाने व्यापारी घर, उदबत्ती की जळत!

आमचे आयुष्य म्हणजे घराच्या चार भिंतीच्या आतच आहे. उदबत्ती जशी जळून घराला सुगंध पसवते तशीच आमची स्थिती. घरासाठी फक्त झिजत राहायचे. फक्त चांगले आणि आणि चांगलेच करायचे यातच आमचे आयुष्य निर्माण किंवा समर्पण करायचे. कितीही कर्तृत्ववान स्त्री असली तीला घराबाहेरच्या कार्यामध्ये केव्हाच परवानगी नव्हती.

प्राणरक्षकता कधी, उगा जाणवे हवेची ?
प्रसंगात कुलकन्या, शिवशकित संसाराची!

आमच्या सारख्या कुलीनांच्या घरातील मुलींना बाहेरच्या हवेत मोकळा श्वास घ्यायला मिळावा ही अगदी बारकशी इच्छा असते. परंतु आमचे आयुष्य हे कठीण प्रसंगात सामोरे जाण्यासाठी आमची सगळी शक्ती संसाराचा गाडा ओठण्यातच खर्च होते.

कवयित्री पद्मा गोळे यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा नेमक्या शब्दात वेध घेतला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यावेळी अनेक समाजसुधारक स्त्रीयांच्या स्थितीविषयी जागरुक झाले होते. आपल्याला परीने स्त्रियांची दुःखे मांडत होते व त्यांना वाचा फोडण्याचे काम करत होते. श्रीमती पद्मा गोळे यांनी आपल्या काव्याच्या आधारे असे प्रश्न संयमीपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

कुलीन घराण्यातील मुलींच्या मनाची व्यवस्था प्रसृत कवितेमधुन मांडली आहे. कारण पुर्वीच्या काळी आपल्या घराण्याच्या प्रतिष्ठेसाठी स्त्रियांना घरातच चार भिंतीच्या आतच विश्व होते. रुढी, परंपरा, प्रथा, परंपरांमध्ये अडकलेला समाज होता. पुरुषवाचक कुटुंबपद्धतीमध्ये स्त्रियांवर मोठया प्रमाणावर बंधने टाकलेली होती. त्याचे आम्ही कुलीनांच्या कन्या ही कविता प्रातिनिधीक रुप आहे. असेच म्हणावे लागते. यातुन स्त्रियांची आणि मुलींची काय स्थिती होती हे लक्षात येते. कवयित्री पद्मा गोळे यांनी यातुन कुलीनांच्या घरातील मुलींच्या मनाचा वेध घेतला आहे.

हा वेध घेताना उपरोधिकपणे त्यांनी ही व्यवस्था मांडली आहे. थोडासा उपहासही त्यांचा काव्यातून दिसुन येते. त्यांनी यापद्धतीची समस्या मांडतांना मनाचा संयतपणा पारखून दिला आहे.

### ५.२.२ अवखळ ये पोरीसमान :-

श्रीमती पद्मा गोळे या अर्वाचीत काळातील कवयित्री असल्यामुळे त्यावेळची सामाजिक परिस्थिती ही स्त्रियांना सामाजिक स्थान हे तसे दुय्यम स्वरुपाचे होते. अनेक बंधने होती. रुढी परंपरेने अनेक समस्या स्त्रीच्या वाटयाला येत होत्या. आणि त्यातच त्या अडकवल्या गेल्या होत्या. त्यामुळे स्त्रीचे स्थान फक्त घरातल्या चार भिंतीमध्येच होते. जरी उच्च कुलातील स्त्रियांना काही सवलती आल्या तरी पुरुषप्रधान कुटुंबपद्धतीमध्ये संवेदनक्षम मनात कोलाहल माजवणारा होता. परंतु जाहिररीत्या या गोष्टींचा निषेध करणे. त्यामुळे त्यांच्या बऱ्याचशा कवितांमधील गाभा स्त्री व कुलीन स्त्री हाच आहे. त्यांनी त्यांच्या काव्याद्वारे आपल्या मनाला मोकळी वाट करुन दिलेली दिसुन येते. आणि त्यातुनच त्या म्हणतात -

अवखळ ये पोरीसमान आज सकाळी
तोडीत गळ्यांतिल सोन्याची फुलमाळ
नादांत वाजवित रुमझुम अपुले चाळ
घरटयांतुनि उडवी खगांस हीच खटयाळ

कवयित्री पद्मा गोळे या पहाटेच्या वातावरणाचे वर्णन करतात. पहाटेचा वारा जसा निर्मळ वातावरणात विहंग करत असतो. त्याचे स्वागत कवयित्री करतात. लहान खटयाळ मुलीला जसे पुढे येणारे कोणतेच पाश माहीत नसतात. आणि मी स्वच्छंदपणे वापरत असते. त्याचप्रमाणे नादांत वाजवित झुमझुम अपुल चाळ, घरटयांतुनि उडवी खगांस हीच खटयाळ अशा पद्धतीचे वर्णन त्या करतात.

करिं आनंदाचें मोरपीस घेवोनी
गुदगुल्या करी मज गालावरि फिरवेनी;
गुणगुणत स्वतांशी वारा अचिरे गाणे
अन् फुगडी घाली घलित मजसि उखाणे.

हातामध्ये आनंदाचे मोरपीस घेऊन ते गालावर फिरवल्यावर गुदगुल्या होतात. जसा वारा स्वत:शीच गाणे गुणगुणत असतो, इकडुन तिकडे स्वच्छंदीपणे वावरत असतो. हे शेवटी सुंदर जग आहे. का असेच उखाणे तो घालत असतो.

हे ऊन केशरी कोवळ घेई अंगी
लुसलुशीत कोवळी निर्मळ बाळतनु की
तृणपीं हसतें इंव मिचकवित डोळे
भिजवितें वसन मम लावुनियां का ओलें.

सकाळी कोवळे ऊन केशरी आपल्या अंगणात लोळण घेते. जसे तान्हा मुलांचे मऊशार बाळाचे शरीर पहाटेचे दव पडते तेही पानांतुन डोळे मिचकावीत हसते आहे. आणि आपले ओले हात लावुन मला भिजविते आहे. अशा पद्धतीचे वर्णन कवयित्री काम करत आहे. त्या पुढे म्हणतात.

munotes.in

पानवेलींवरती फुलला समुसंभार
लाडीवाळ हास्य हे सकाळचे अनिवार
मैत्रीण हिची ती निळी टेकडी वेडी
मखमलिचा परकर आज लावल्या काही

झाडे वेली पहाटे फुलांनी संभार केला आहे हे सकाळीचे लाडीक हास्य अनिवार असे होते. तिची निळी टेकडी मैत्रीण आहे. सर्वत्र हिरवेगार झाले आहे. म्हणजेच आज मखमलीचा परकर घातला आहे

घेऊनी ओढणी जरमारी सुकुमार
मज खुणाविते, ये बनुनी अवखळा पीर
अन् मलाही वाटे मुक्त सोडुनी केश
लेऊन परीगत हलका निळासर वेष

त्यातच एखादा जरतारी ओढणी घेऊन सुकुमार मला खुणावित म्हणतो आहे. ये बनुनी आवखळ पोर. आणि मग मलाही वाटते. की मोकळे केस सोडुन, परीसारखा हलका निळसर वेष करुन आपणही बागडावे.

होऊन तरल या वाऱ्यासम धावावें
सोनेरी असल्या उन्हांत मिसळुनि जावें
गुद्गुदल्या कराव्या तुर्त बनुनि आनंद
गुणगुणात बरसावें स्वरांशीच स्वच्छंद

आनंदी होऊन हया शांत अशा वाहणाऱ्या वाऱ्यासोबत धावावे सोनेरी उन्हांत मिसळुन जावे. आणि आनंदी बनुन गुदगुदल्या कराव्यात आणि स्वतःशीच स्वच्छंदपणे गाणे गुणगुणत बसावे. आपल्या भावनांना कवयित्री या काव्यातुन मोकळे करत आहेत. प्रत्येक तरुणीची हीच अवस्था असते. कारण त्यांच्यावर बरीच बंधने असतात त्यामुळे निसर्गातील स्वच्छंदपणे त्यांना आनंद घेताच येत नाही.

सुमनापरी निर्मळ हसुनि जगा हसवावे
अन् विहंग बनुनी आकाशी विहरावें
या लीन तुणाला दंव बनुनी नटवावें
अन् माझ्यांतुनि मी निसटुनि सकाळ व्हावे,

फुले जशी दुसऱ्यासाठी सुगंध देतात, निर्मळ आनंद देतात. तसाच आपणही जगाला हसवावे, आणि वारा होऊन आकाशमध्ये भ्रमण करत राहावे. या माझ्या अशा लीन देहाला दंव बनुनी नटवावे आणि माझ्यातुनि मी निसटुनि सकाळ व्हावें.

कवयित्री स्वच्छंदीपणाची स्वप्ने बघते आहे. प्रत्यक्षामध्ये जे घडणार नाही. त्याची कल्पना करुन ती अवखळ पोरीसमान जगण्याचा प्रयत्न करत आहे. किंबहुना हे सर्व स्त्रियांच्या जीवनाचे प्रातिनिधीक रुप आहे असेच म्हणावे लागते.

munotes.in

### ५.२.३ मी इथली :

कवयित्री पद्मा गोळे यांच्या कवितांतून स्त्री जीवनाचे विविध स्तर उलगडलेले पहावयास मिळतात. स्त्री जीवनाचा प्रत्यय त्या कधी निसर्ग प्रतिमांतून मांडतात तर कधी विविध पौराणिक संदर्भ देवून आपल्यासमोर वास्तवपणे उभे करतात. त्यांच्या 'स्वप्नजा' या काव्यसंग्रहातील 'मी इथली' ही कविता 'कृष्ण आणि राधा' यांच्या प्रीतीया आणि भक्तीछा साक्षात्कार करतांना दिसून येते. या कवितेत कवयित्रीने राधा-कृष्ण या प्रेमिकांची पारंपरिक जोडी चित्रीत केली आहे. स्त्रीत्वाची जाणीव आणि 'स्व'त्वाचे भान ही कविता आणून देते. मी याच परंपरेतील आहे. अस म्हणताना कवयित्री म्हणते

मी इथी, मी इथली,
नाही मी कुणी परकी,
सखि राधे, का बघसी ?
नाही मी अनोळखी

या कवितेतून राधा, कृष्णा, गोपी, यमुना, मुरलीख या अशा काही पौराणिक प्रतिमांचा वापर केला आहे. प्रियसीची प्रतिमा विशेष प्रभावीपणे मांडली आहे.

प्रिती राधनेचा आशय घेवून येणारी ही कविता अभिव्यक्ती दृष्ट्याही वैशिष्ट्यपूर्ण वाटते. रुपहीन, गंधहीन, मी साधी, मी भोळी, तनुमखमाली, व्यथीत मधूर कंप, पदकमळे चुंबणारी मी, फुलते झुलते, यमुनाताटी रुजलेली हिरवळ मी, हरीमय मी अशासारखे शब्दामाधुर्य विशेषण या कवितेतून पहावयास मिळतात. यातून कवयित्री पद्मा गोळे यांच्या लेखनातील शब्द भांडाराचा प्रयत्य येतो. या कवितेतून 'कल्पना', 'चमत्कृती' याचाही अनुभव येतो.

### ५.२.४ आईपणाची भीती :

कवयित्री पद्मा गोळे यांच्या काही प्रातिनिधीक कवितांवर नजर टाकल्यास असे दिसते की, त्यांच्या बऱ्याचशा कविता ह्या स्त्रीप्रधान स्वरुपाच्या आहेत. स्त्रीच्या वेदना, तिचे कोंडलेपण, धगधग, स्त्रियांवर असणारी बंधने याविषयी त्या आपल्या कवितातून भाष्य करतात. प्रस्तूत कविता ही देखील वास्तवाशी संघर्ष करणाऱ्या आईच्या आंतर मनःस्थितीचे चित्रण करणारी एक लक्षणीय कविता आहे. आपल्या मुलाला दिशा दर्शवतांना, मागदर्शन करतांना आईला आईपणाची भीती वाटते. ती आपल्या बाळाला माणूसपणाचा वसा घ्यावयास कवितेतून सांगते.

जळी स्थळी आकाशीही
अणुबाँब झाकला आहे.
प्रत्येक रस्ता माणसाच्या
रक्ताने रे माखला आहे.

बदलत्या सामाजिक वास्तवाचा प्रत्यय देवून आई आपल्या बाळाला पुढील मार्गक्रमणाचा संदेश देत आहे. या ओळीतून स्त्रीचे सोशीक असणं, घरंदाज असणं सिद्ध होतांना दिसून येते. पुढे कवयित्री म्हणते

आज आईच्या कुशीत सुद्धा
उरला नाही बाळ, निवारा
द्रौणीच्या अस्त्रासारखा
हिरोशिमाचा बाधेल नारा...

विज्ञान युगात बदलत्या जीवनशैलीत काळानुसार आईच्या मनातील भावविश्व कवयित्री चित्रीत करते. गतीमान जीवनात आई आणि मूल यांच्यातील भावसंवाद हे अनुभवविश्व या कवितेतून चित्रीत केले आहे. रचना दृष्ट्या ही कविता सरस वाटते. नवकाव्याचा प्रभाव या कवितेतून जाणवतो शिवाय ही कविता संत कवींच्या परपंरेशी जवळीकता साधतांना दिसते.

## ५.३ समारोप

कवयित्री श्रीमती पद्मा गोळे या सुसंस्कृत घराण्यातील असल्यामुळे त्यांना शिक्षण संस्कार हे घरातुन मिळाले आहेत. त्यामुळे त्यांचे मुळातील संवेदनशील मन अधिकच संवेदनशील बनतांना दिसते. त्यांच्या काळातील कविंमध्ये नवकवितेचे वारे मोठया प्रमाणावर वाहत होते. परंतु पद्मा गोळे यांच्या कवितामध्ये कुठेही समाजावर आकस दिसत नाही. त्याचबरोबर दुसरी गोष्ट म्हणजे त्यांनी स्त्रियांची मांडलेली दुःखे ही उच्चवर्णीय स्त्रियांची आहेत त्यावेळच्या समाजात कनिष्ठ वर्गातील स्त्रियांची कुंचंबणा अधिकच होती. परंतु पद्मा गोळे या कवयित्रीकडुन त्याची दखल फारशी घेतलेली दिसत नाही. असे असले तरी त्यांच्या काव्यातील प्रतिभा मात्र उच्च दर्जाची आहे. तसेच त्या अनेक निसर्गातील उपमा, रुपके यांचा वापर योग्य प्रकारे करतात एवढे मात्र खरे.

❖❖❖❖

# घटक -६

## अनुराधा पाटील, इंद्रजित भालेराव

**घटक रचना :**


६.१ अ) अनुराधा पाटील यांचा परिचय

६.१.१ म्हणतात उमटत नाहीत

६.१.२ आठवणी येतात

६.१.३ माझी अक्षरं भिजतात

६.१.४ गवताच्या वाळलेल्या मुळासारखीच

६.२ ब) कवी इंद्रजित भालेराव यांचा परिचय

६.२.१ आषाढीला येते

६.२.२ माझ्या कवितेला यावा

६.२.३ रानावनातल्या उन्हातान्हात वाळलेल्या

६.२.४ झाडा झाडाला विचारा

६.३ समारोप


## ६.१ अ) कवयित्री अनुराधा पाटील यांचा परिचय

१९७० नंतरच्या कालखंडातील एक महत्त्वाच्या कवयित्री म्हणून 'अनुराधा पाटील'. यांच्या नावाला सुस्थिरता आली आहे. स्वातंत्र्योत्तर काळातील १९७५ ते १९८५ च्या कालखंडातील रजनी परुळेकर, मल्लिका अमरशेख, अनुराधा पाटील या व अशासारख्या कवयित्रींची ही दुसऱ्या पिढीची कविता आहे.

कवयित्रीच्या (अनुराधा पाटील) यांची कविता प्रत्यक्ष जीवनापेक्षा तिच्या काव्य जीवनाची कविता आहे. कवीच्या आत्म्याची ती कविता आहे.

(दिगंत) १९८५ या काव्यसंग्रहातून तरल भाववृत्ती, हळूवार अभिव्यक्ती, मोहक आणि आकर्षक या व अशासारख्या गोष्टी चित्रित होता.

(तरीही) १९८५ या काव्यसंग्रहातून 'आत्मिक आविष्कार' आणि दुर्दम्य आशावाद चित्रित होतो.

(दिवसेंदिवस) (१९९२)मधील अनेक कवितांमधून 'आई-मूल' नात्यातील 'केंद्रवर्ती अनुभव' चित्रित होतात. त्याचबरोबर (दिवसेंदिवस) हे काव्यशीर्षक 'स्थल' आणि 'काल' या

तत्त्वांना आंतरिकतेएवढे प्राधान्य देते. त्याचबरोबर (वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ) (२००५) या काव्यसंग्रहातून 'आंतरिक स्त्रीत्व' चित्रित केले जाते. त्याचबरोबर 'स्त्रीवादा' ची भारतियीकरण करणारी बहुआयामी अभिव्यक्ती या व अशासारख्या गोष्टी प्रकट होतात.

### ६.१.१ म्हणतात उमटत नाहीत

नियतीच्या तालावरच माणसाला फिरावं लागतं, शरण जावं लागतं, माणसाची ही अगतिकता त्यांच्या कवितेत जागोजागी व्यक्त झाली आहे. नियती जे म्हणेल तेच अंतिम सत्य, ती देईल तेच घ्यायचं आणि निमूटपणानं जगायचं हाच जीवनाचा अर्थ त्यांच्या कवितामधून उलगडत जातो.

म्हणतात उमटत नाहीत
तुझी पावलं इथल्या मातीवर
आणि ऐकू येत नाही
तुझा देवाचा म्हणून एखादा शब्द
ईश्वरा.
वाचताच येत नाही
अशा अक्षरांचा तू ग्रंथ आहे

ईश्वराच्या अस्तित्वावरुन पुर्णपणे विश्वास असणाऱ्या मनाची ही प्रक्रिया कवितेत उमटली आहेत.

ज्या प्रश्नांना उत्तर नाहीत तिथ फक्त समजूतदारपणानं वागणं हाच पर्याय असतो. तोच कवियंत्रीनं स्वीकारलेला दिसतो. म्हणूनच त्यांच्या कवितेचाही जणू तोच स्वभाव बनतो. परमेश्वराच्या हाती जणू काठी आहे. आणि तिच्या ठकठक आवाजाच्या धाकावर माणसे जगत आहेत पण ईश्वराला शोधणे, पाहणे कठीण आहे कारण -

जात नाही भूक
पोटावर भाकरी बांधुन
आणि तु तर होतोस सारं काही
तुझा आवाज नसलेल्या
अक्षर काठीच्या
ठक ठक धाकावर

त्याचं असणंही स्वीकारता येत नाही पण ती नाही म्हणूनही चालणार नाही म्हणून मग मनात संघर्ष सुरु होतो. आपल्याला धाकात ठेवणाऱ्या ईश्वरालाही मर्यादा आहेत ही जाणीव प्रकट होते. आणि केवढी जवळ असते नेहमीच विनाशाची चाहुल

चेतवतोस फुंकरुन असा
दुराव्याचा जाळ
की अधिकच अवघड होतं जगणं
आणि नुसतीच
बुरुदुक गळत राहते अंगावर
पडक्या घराची माती
परमेश्वरा माणसाचे

दुःख हळुहळु कमी होत जात. परंतु प्रत्येक वेळी तुच बोट धरुन नव्या नव्या समस्याकडे घेऊन जातोस. खरंतर आपल्या जवळच सगळ्या गोष्टी असतात. पण या ओसाड प्रदेशात तुच नेऊन सोडतोस.

म्हणतात हळूहळू झिजत जातात.
कोणताही दुःखाच्या कडा
पण तुच तर नेऊन सोडतोस
प्रत्येक वेळी
बोट धरुन इथल्या वाटांवर
ज्या घेऊन जातात
नव्या नव्याच ओसाडीकडे
हाकेच्या अंतरावर असतात तेव्हा
सगळ्या आपल्याशा गोष्टी

ईश्वराविषयक चितंन, एकटेपणा अटळ असल्यानं स्वतः मध्येच सामावून जाणं हे जीवनविषयक तत्वज्ञान आणि नियतीच्या ईच्छा प्रबळ मानणारी प्रवृत्ती त्यांच्या बव्हंश कवितांतून आढळते. माणसाच्या हाती काहीच नाही, असा निराशेचा सूर कवितेच्या पार्श्वभूमीवर सतत ऐकू येतात.

स्वीकारता येत नाही मला आता
तुझं निरंतर असणं
आणि फिरवताही येत नाही पाठ
तुझ्याकडे
माझ्या या बिनसावलीच्या जगात
ईश्वरा
लागला आहेस आता तुही देशोधडी

तु आहेस हे सत्य मला आता स्वीकारणेही अवघड झाले आहे. आणि दुसऱ्या बाजुला तुझ्याकडे पाठही फिरवता येत नाही. येथे प्रेमाचा, दयेचा ओलावा, आसरा मिळत नाही. या अशा ओसाड, वैराट जगात आता तुझेही अस्तित्व नामशेष होत आहे.

### ६.१.२ आठवणी येतात

आपले उदास भावविश्व कवयित्री ग्रामीण जीवनाशी निगडीत प्रतिमासृष्टीतून व्यक्त करते. दुष्काळ, पानगळ, अंतहीन आकाश, पुरात वाहुन गेलेले उजाड गाव अशा प्रतिमांतून कवयित्रीची आंतरिक पडझड सूचित होते. स्वतःची उदासीनता ओलांडण्यास प्रयत्नही त्यात वारंवार दिसतो. अशा वेळी दुरस्थाचे आतंरिक संवेदन मदतीला धावुन येते आणि शब्द येतात

ऊण्या गाथेतली
माणसं आणि गाव
नकळत मनात
चालत राहतात

प्रवास करतांना एकीकडे प्रवासाचा अर्थ शोधणेही मनात चालु असते.

ललाटावर रंगवलेल्या अदृश्य
नशिबासारखी सतत जमलेली नाती

सगळे शकुन नाकारुन वाळूवरही
पावलं येण्याची केवढी जिद्द होती

आपल्या कपाळी काय लिहून ठेवले आहे. शकुन अपशंकुनांना बाजुला सारुन उभारी घेण्याची जिद्द असते. परंतु नशिबामुळे आपण काहीच करु शकत नाही. त्यामुळे आयुष्य जगण्याची जिद्ध आता हरवली आहे.

### ६.१.३ माझी अक्षरं भिजतात

माझी अक्षरं भिजतात या कवितेतून 'मी' चा विशिष्ट काव्य संवेदन स्वभाव अविष्कृत झाला आहे. कवितेत या 'मी'ची अक्षरं भिजतात, कुडकुडतात ती चिमुटभर उजेडासाठी आणि उबेसाठी. या अक्षरांना प्रकाशदायी चैतन्य आणि आस्थेवायिक महत्त्व हवे आहे. ही अक्षरं भुगर्भातील अंतःस्थ खळबळ भुईला कान लावुन ऐकतात. आतल्या अंतःस्थ खळबळीचा वेध घेण्याचे सामर्थ्य या काव्यसंवेदनेमध्ये आहे. पाण्याच्या सळसळण्यातही ही अक्षर मिसळून जातात. समूह जीवनाचे आयुष्य पारखत पारखत ती त्यांची होऊन जातात मात्र समाज संस्कृतीत वास्तव वेगळे आहे. पेरांव ते उगवतं हे खरं मात्र कधी न पेरलेलंही उगवतं या विपरीत वास्तवामुळे अक्षरं कोरडी होत जातात पुढे या निवेदिलेल्या जनीच्या जात्याला ठायी ठायी हात देणारा विठ्ठल भारी वाढतो आणि 'आतल्या काळोखात' उदास बसलेली बाई दिसते. तेव्हा ही अक्षरे हवेपणाची कवचकुंडले उतरुन ठेवतात आणि चुपचाप अलिप्त कडेलोटाच्या काठावर उभी राहतात. इथल्या समाजजीवनात स्त्रीच्या वाट्याला दुःख येते, याचे शल्य अक्षरांना खुपते. आणि अलिप्त, अबोल होतात.

जनीच्या जात्याला। हात देणारा विठ्ठल
ठायी ठायी भेटतो भार होऊन! आणि आतल्या काळोखात
उदास बसलेली बाई! आणखी उदास होते.
तेव्हा उतरुन ठेवतात अक्षरं! हवेपणाची कवचकुंडल
आणि उभी राहतात स्वेच्छने! कडेलोटाच्या काठावर
चुपचाप अलिप्त

स्वतःच्या शोधासाठी मांडलेला हा अक्षरांचा उत्सव आहे. आयुष्य जोडताना हरेक वळणावर उमटलेल्या प्रतिक्रियांच्या स्वीकारातून आणि नकारातून स्वतःला लयबद्ध करित राहणं या कवितेचं संचित आहे. या कवितामधून शब्दाचे 'साचे' दिले नाहीत. उत्स्फूर्त आकलनीय साधेपणाचा ऐवज कवितामधून साकार केला आहे. व्यक्त परिसराबद्दलची कवितामधून साकार केला आहे. व्यक्त परिसराबद्दलची स्पष्ट आणि स्वच्छ समज, त्याच साधेपणातून त्या प्रवृत्तीपर्यंत अलगद आपल्याला घेऊन जाते. परकेपणाची भावना मनाला शिवत नाही. त्यामुळे ही कविता सुसंवादाच्या रुपाने आपल्याला भेटल्यासारखी वाढत राहते. तिच्या भाषेच्या सामान्यपणामागे असामान्य पण साठवलेलं आहे.

### ६.१.४ गवताच्या वाळलेल्या मुळासारखीच :

कवितेच्या अपरंपार पुरांमध्ये कवयित्रीचे व्यक्तिमत्त्व सामावून जाते. स्वतःची ओळखदेखील अखेरीस कवितेच्या ओळींमधूनच शिल्लक राहणार आहे, याची तिला खात्री पटते. कवितेमधूनच 'कुणाशी' तरी संवाद साधण्याचा प्रयत्न होतो आणि कविता कवयित्रीचे व्यक्तिमत्व यांच्यामध्ये अतूट नाते निर्माण होते. तिच्या स्मृतीमधून जाऊन पाहणाऱ्या ओळी जेव्हा

तिला पुन्हा स्मरु लागतात तेव्हा जणू काही आपणच आपणाला आठवतो आहोत, असे वाटू लागते.

कवितेचा गाण्याशी विरोध नाही. किंबहुना गाण्याबद्दल प्रेमच आहे. झाडांनी किनारलेल्या या रस्त्यांवर थोडी गाडी, आता आपणच विसरावीत एखाद्या वाटसरुसाठी चालतांना असा तिला ध्यास आहे पण -

खरं तर कागदावर लावु नयेत
कवितेची झाड वाढली तरी
कोणतेच पक्षी त्याच्या फांद्यावर बसुन
गात नाही आपल्यासाठी एखादं गाणं.

असा तिच्या आयुष्याचा अनुभव आहे. कवितेतल्या झाडावर पक्षी गाणी म्हणणारही नाहीत पण अखेर 'कवितेतलं जगणच तेवढ खरं उरलं' किंवा कवितेशिवाय जवळ काही नाही हे जाणवले म्हणजे कविता ही अस्तित्वाला झोंबणारी, सत्वाची परीक्षा पाहणारी, आत्मभान जागवणारी, सृजनाच्या शक्यता वाढवणारी, काहीतरी वेगळी अंतःशक्ती आहे याचा प्रत्यय येऊ लागतो.

कविता ही गाण्यासारखी आवर्ती नसते. ती गतीशील असते. कविता दुर गेल्या तरी त्यांची पावले मनात वाजत राहतात.

गवताच्या वाळलेल्या मुळासारखी
कविता मनाच्या मातीत

त्यामुळे खरोखर जात नाही. निदान कविता तरी माझ्या असतात हा जगण्यातला दिलासा असतो आणि अशी स्वत्वाची कविता अस्तित्वालाच जेव्हा पेटून टाकते, तेव्हा

तशी कवितेच्या अपरंपार पुराने मी
मी संपतेय हळूहळू कवितेत

असा अनुभव येऊ लागतो. कवितेत असे संपुन गेले म्हणजे कळते की कविता
मला कागदावर उतरवत रहाते...

इथे तिथे ओळखीच्या जुन्या शोधतांना / कविताच ओळख देते. गाण्यात आवाज उसना असतो. आपण गुणगुणतो अन लक्षात येतं हा आवाज आपला नाही.

मन अद्‌भुत आनंदानं भरुन जावं तशी कविता कधी अवतरते तर कधी ती परकीही वाटते. एका वेगळ्याच भावविश्वातून आलेला हा अनुभव आहे. पण आज किती दुरची परकी वाटते कविता.

आपल्याला आपण दुरावत चाललो आहोत असं वाटु लागलं की, कवितेत आपण काय व्यक्त करणार हा प्रश्न कवयित्रीला अस्वस्थ करतो. आपण आपले अस्सल अनुभव तरी कवितेत प्रकट करु शकू की, नाही अशीही साशंकता वाटु लागते.

स्वतःच स्वतःला परकं वाटु लागलं की, कविताही परकी झाली अशी एक खिन्न मनःस्थितीही कवितेत उमटते. काही वेळा कविता सोडून घ्यावी, आता लिहिण्यासारख नाही

असं वाटुन त्यांनी कविता लिहिणेही बंद केले होते. काहीतरी नवं सांगता आलं पाहिजे हा ध्यासच त्यामागचं कारण असावं. कवितेशी एकरुप होऊन सर्व जग बाजुला ठेवता येतं अशीही त्यांच्या मनाची एक अवस्था त्यांच्या कवितेत चित्रित होत.

तुझ्या किनाऱ्यावर उभं राहुन कविते,
मी सोडून दिले होते एकदा
उरलेल्या जगाचे दोन्ही किनारे

इतक कवितेशी अतूट नातं, जवळीक असल्यामुळेच कविता आधार देते, आपल्याला जगवते, तीच आपले सर्वस्व आहे, ही भावना जागोजागी व्यक्त झाली आहे. आपल्या अनुभवातूनच कविता निर्माण होत असल्याने ती ताजी टवटवीत असते. तिला शेवट नाही असा ठाम समजही त्यांच्या कवितेत आहे.

'गवताच्या वाळलेल्या मुळांसारखी
कविता मनाच्या मातीत
प्रत्येक श्वासाची ओल ओढत
पुन्हा हिरवी होऊन उगवुन देणारी'

अशी स्वतःची एक वेगळी वाट शोधावीशी वाटते. कविता जगण्याचं बळ देते, नैराश्याचे अनुभव पचविण्याची शक्ती देते म्हणून तिथेच सर्व झोकून देऊन रमून जायंच व आपलं एक वेगळचं विश्व निर्माण करायचं. एकाकीपणानं ढासळून न जाता कवितेशी संवाद करायचा, कवयित्रीच्या मनाच्या अशा विविध अवस्थांचे शब्दांकन म्हणजे अनुराधा पाटील यांची कविता होय.

## ६.२ ब) कवी इंद्रजित भालेराव यांचा परिचय

जन्म : २८ मे १९६२, रिधोरा (जि. हिंगोली) या खेडेगावात जन्म आणि वास्तव्य परभणी येथील शिक्षण एम.ए.एम.फिल. असून मराठीचे महाविद्यालयीन स्तरावर अध्यापन. कवितेखेरीज बरेच गद्यलेखन (माई घरा आल्या, लळा) या व अशासारखे ललितलेख संग्रह. त्याचबरोबर (भिंगुळवाणा) ही कादंबरी. त्याचबरोबर समग्र बी. रघुनाथचे संपादक. नॅशनल बुक ट्रस्टचे मराठी भाषा सल्लागार... १९८५ नंतरच्या मराठी कवितेमधील विलक्षण लक्षणीय कवी. तरल निसर्ग आविष्कार, प्रसन्न व्यक्तिमत्त्व, गावाभोवतीचं रान आणि पीकपाण्यात रमणारे काव्य, कृषिनिष्ठा, लोकपरंपरा, नवे ग्राम संवेदन, ग्रामीण जग, ग्राम जीवन अनुभव, शेतीचे प्रश्न, शेतीनिष्ठ जाणिवा, निसर्गाचे रौद्ररुप, प्राक्कथा आणि सांस्कृतिक संदर्भाचा प्रभावी वापर ही वैशिष्ट्ये त्यांच्या कवितामधून चित्रित होतात.

**काव्यसंग्रह :** पहिला कवितासंग्रह (पीकपाणी) (१९८९), आम्ही काबाडाचे धनी (१९९२) दूर राहिला गाव (१९९४), कुळंबिणीची कहाणी (१९९६), पेरा (२००२), टाहो (२००४)...

अनेक पुरस्कारांनी सन्मानित...

(उदा. राज्यशासनाचा उत्कृष्ट संपादन राज्य पुरस्कार, समग्र बी. रघुनाथ (१९९७), शिवार साहित्य पुरस्कार, शिवार प्रतिष्ठान,

### ६.२.१ आषाढीला येते :

इंद्रजित भालेराव हे जातीवंत शेतकरी आहेत, त्यामुळे ते पावसाची आतुरतेने वाट पहात असतात. आषाढी आली की पावसाला जोर येतो. त्याचबरोबर वारकरी पंढरपूरची वाट तुडवायला लागतात. कवी म्हणतो -

आषाढीला येते। आभाळ भरुन
काळीज कोरुन। जाते माझे
दिंड्या पताकांचे। गर्जतात भार
आषाढीची धार। कोसळते

आषाढीला आभाळ भरुन येते आणि कवीचे काळीज कोरुन जाते. आषाढीचा पाऊस म्हणजेच जसं दिंड्या पताका घेऊन, भजन म्हणत वारकरी जात असतात, तशीच आषाढीला पावसाची धार कोसळत असते.

उरी उसळतो। भावनाचा लोंढा
पताकीचा झेंडा। ओला होतो

याचवेळी भावनांनी उर भरुन येतो. पाऊस हा निश्चित पडणारच. कारण पताकांचा झेंडा ओला होतो. पांडुरंगाची कृपाच आहे.

खाली चिखलात। पडते पाऊटी
माती जणू उटी। वास येतो

पहिला पाऊ पडला की मातीतून सुगंध दरवळू लागतो. पाऊस पडतो म्हणजे शेतीच्या कामांना बहर येतो. त्यावेळी साहजिकच शेतकऱ्याची पावली चिखल तुडवायला सुरुवात करतात.

काट्यामधी पाय। चालतात पाटा
मनामधी लाटा। आनंदाच्या
माझ्या मनामध्ये। उठतो काहूर
वाटे हूरहूर। काय करु

वारकऱ्याला ऊन, वारा, पाऊस याचे काहीच वाटत नाही. त्याच्या मनामध्ये फक्त पांडुरंगाच्या भेटीची आस असते. तसेच शेतात कितीही त्रास झाला तरी जातीवंत शेतकऱ्याच्या ऊर भरुन येतो. त्यालाही पावसाची आस आहे.

कवी इंद्रजित भालेराव हे आषाढीच्या पावसाच्या आगमनाने आनंदून जातात. त्याची ते वाट पहात आहेत. आषाढीला पंढरपूरची वारी असते. पाऊस पडून गेलेला असतो. शेतकऱ्याची कामे संपवलेली असतात, आता तो दिंड्या पताका घेऊन पंढरपूरला चाललेला आहे. त्यामुळेच आषाढीची धार कोसळते, आणि शेतकऱ्याचा ऊर भरुन येतो.

### ६.२.२ 'माझ्या कवितेला यावा' :

इंद्रजित भालेराव हे शेतकऱ्यांच्या जीवनाशी इतके निगडीत झाले आहेत की? त्यांच्या काव्यात शेतकरी आणि त्याचे जीवनच येते. त्याही पुढे जाऊन ते स्वतःच्या काव्याविषयी लिहायला लागतात त्यावेळी त्यांची कविताही जमिनीशी इमान राखूनच अवतरते.

munotes.in

'माझ्या कवितेला यावा
शेना... मातीचा दर्वळ
काट्याकुटात हिर्वळ'

असे स्वतःच्या कवितेबद्दल लिहिणाऱ्या भालेरावांची कविता जमीन, पीकपाणी आणि शेतकऱ्यांचे कष्ट यांच्याशी निगडित आहे. कवी आपल्या कवितेलाही शेणा-मातीचाच सुगंध येऊ दे असेच म्हणतो. त्यापुढे जाऊन तो म्हणतो माझ्या कवितेनेच काट्याकुट्यात हिर्वळ जतन करावी.

माझ्या कवितेने बोल
काळजातला बोलावा
उन्हाळ्यात खापराला
जसा असतो ओलावा

कवी कविता करतांना त्याला उदार उसणवारीची गरज नाही. कारण तो म्हणतो माझ्या कवितेने माझ्या काळजात जे दडले आहे तेच बाहेर यावे जसा उन्हाळ्यात खापराला ओलावा असतो तसा. म्हणजेच मुद्यामहून कोणतीही गोष्ट करु नये. तो ओलावा मुळातला असावा.

असो काळा सावळाच
माझ्या कवितेचा रंग
गोऱ्या-गोमट्या कपाळी
बुका अबिराच्या संगं

माझ्या कवितेचा रंगही काळा सावळाच असावा. त्याला कोणत्याही अलंकारांनी, रुपांनी, प्रतिमांनी नटवलेली नसावी. कारण आतून येणारंच खरं काव्य असते. गोऱ्या गोमट्या कपाळी अबिर बुका शोभून दिसतो.

माझ्या कवितेचा हात
असो ओबड धोबड
नांगरल्या मातीवानी
व्हावं काळीच उघडं

माझी कविता आतून आली पाहिजे ती ओबड धोबड का असेना. ती नांगरलेले शेत जसं मोकळं मोकळं असतं तशीच माझी कविता कशामध्ये लपेटलेली नसावी. खरे सौंदर्य त्यातच आहे.

खारी-आंबट-तुरट
माझ्या कवितेची चव
उर फाडुनिया माझा
तिने पोटातून यावं

माझी कविताही उत्स्फूर्त असावी. तिच्यातील शब्द, भावना ओरडून ताणून नसावी. अशीही भावना ही कविता व्यक्त करते.

### ६.२.३ रानावनातल्या उन्हातान्हात वाळलेल्या :

भालेराव यांच्या (दूर राहिला गाव) या काव्यसंग्रहातून नव्या जाणिवा प्रकट होतात. 'ग्रामजीवन' हा कवीचा अनुभव विश्वाचा केंद्रबिंदू आहे. या संग्रहातील (रानावनातल्या

उन्हातान्हात वाळलेल्या) या कवितेतून शेतमजूर स्त्रियांचे दारिद्र्य चित्रीत होते. दारिद्र्यात जगणाऱ्या स्त्रीचे दु:ख या व अशासारखी गोष्ट चित्रित होते. सासुरवाशिणीचे सजीव चित्र रेखाटताना कवी लिहितो :

रानावनातल्या उन्हातान्हात वाळलेल्या
सासुरवासिण गोवऱ्या वेचते

काट्याकुट्यातून, ढेकळा धस्काटातून 'रानोमाळ फिरणारी आणि चुलीबरोबर जिनगानीचा जाळ' पेटवणारी कवितागत 'ती' त्यांच्या कवितेतून येऊन जाते. प्राक्कथेचा सिता-सावित्रीचां अवलंब या कवितेत होतो. या व अशासारख्या प्राक्कथा वापरामुळे त्यांची कविता अधिक समृद्ध होते.

खेड्यातील स्त्रियांचे अनुभवविश्व या व अशासारख्या कवितेतून अधोरेखित होते. त्याचबरोबर ग्रामीण स्त्रीची विविध रुपे देखील चित्रीत होतात. (आषाढीला येते आभाळ भरुन) या कवितेत 'आषाढाच्या वारीचे चित्र रेखाटले जाते. या कवितेत एका बाजुला संततधार आणि दुसऱ्या बाजुला 'वारकऱ्यांची दिंडी' पंढरपूरला चालल्याचे दृश्य चित्रित केले आहे. वरुन धुवाधार पाऊस सुरु ्हे. पायात काटा रुतला आहे. तरी देखील वारकऱ्यांना विठ्ठल दर्शनाची आस लागल्याचे सूचन या कवितेतून होते. आपल्या घरात, शेतात 'विठ्ठलरुप' सामावल्याचे चित्र या कवितेतून अधोरेखित होते.

सांस्कृतिक जीवनामधील बहुसंख्य संदर्भ सहजगत्या त्यांच्या कवितेतून चित्रित होतात. उदाहरणार्थ (आषाढीला येते आभाळ भरुन) या व अशासारख्या कवितेतून आषाढी दिंड्या पताका आदी सांस्कृतिक संदर्भामुळे त्याची कविता अधिक अर्थपूर्ण होते.

**६.२.४ झाडाझाडाला विचारा :**

कवी इंद्रजित भालेराव यांची कविता गावाकडची आहे. फक्त गावाकडचीच नाही तर ती शेताची आहे. काळ्या आईची आहे आणि त्यात राबणाऱ्या शेतकऱ्यांची जीवनकहानी आहे.

असं म्हणतात की त्याची कविता शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा दारुण इतिहासाला अधोरेखित करते. आजच्या व्यवस्थेने निर्माण केलेल्या शेतकऱ्यांच्या शोषणाची गाथाच कवी येथे मांडतो. तुकारामापासून आजच्या शेतकऱ्यांपर्यंत आत्महत्या करायला भाग पाडणारी शोषणव्यवस्था अव्याहतपणे चालू आहे. काल ती दृश्य स्वरुपात होती. आज अदृश्य स्वरुपात वावरत आहे. त्यामुळे कालच्या सांस्कृतिक प्राक्कथांची नवी मांडणी ते करतात. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे हे सत्र थांबणार नाही याचीही भेदक जाणीव करुन देतात.

झाडाझाडाला विचारा
आत्महत्येचा कहाण्या
या पहाडाला विचारा

वर्षानुवर्षे शेतकरी राबतो आहे, परंतु त्याच्या राबण्याला यश नाही आहे. म्हणूनच कवी म्हणतो झाडाझाडा विचारा आत्महत्येच्या कहाण्या किंवा पहाडाला विचारा माझ्या बापाचे दु:ख म्हणजेच माझ्या वडीलांच्या दु:खाचे गाणे पहाडालाही विचार असे कवि म्हणतो,

ऊस लावल्या रानात
जेव्हा पिकला काऊस
साळ पोट्यात आली
आणि सुकला पाऊस

जेव्हा शेतकरी ऊस पिकवतो त्यावेळी त्याच्या पदरी दु:खच आले. ज्यावेळी साल (सालीचे धान्य) पोट्या भरुन वाढली त्यावेळी पावसाची गरज होती पण त्यावेळीच नेमका पाऊस पडलाच नाही. म्हणजेच ज्यावेळी सुख दिसायला लागते त्याचवेळी ते हिरावूनही घेतले जाते.

टाहो फोडला बापानं
याची दरीत विरला
आत्महत्येचा पहाड
त्याच्या पोटात शिरला

त्याने आक्रोश केला परंतु तो कोणालाही ऐकायला गेला नाही. या दरीच्या बाहेर पडलाच नाही, तो दरीतच विरुन गेला. म्हणजेच शेतकऱ्याचा आवाज कोणापर्यंत पोहचत नाही. त्यामुळेच शेवटचा पर्याय म्हणून तो आत्महत्येलाच कवटाळतो, जवळ करतो.

गेला विदेही होऊन
बाप देवाच्या दारात
देव होता झोपलेला

शेवटी बापाने देवाचा रस्ता पकडला. परंतु देवाच्या दारात जाऊनही त्याला न्याय मिळाला नाही. कारण देव झोपलेला होता. अशा प्रकारे कवी शेतकऱ्याच्या दु:खाविषयी भावना व्यक्त करतो.

## ६.३ समारोप

कवी इंद्रजित भालेराव यांची कविता शेतकऱ्यांच्या प्रश्नांची चर्चा करते. त्यांची कविता आपल्या कृषी संस्कृतीचे दर्शन तर घडविते पण त्याचबरोबर वास्तवावर प्रखर भाष्य देखील करते आहे. त्यांची कविता केवळ दु:खाचे कढ आवळणारी नाही तर जे कृषीसंस्कृतीच्या मुळावर उठले आहेत. त्यांच्या मुसक्या आवळण्याची जरबही या कवितेत व्यक्त होते आहे. इंद्रजित भालेरावांची कविता वास्तवाचे दाहक दर्शन घडविणारी व वाचकाला अंतर्मुख करायला लावणारी आहे.

❖❖❖❖

# घटक -७

## अरुण काळे, वीरधवल परब

**घटक रचना :**

७.१ अ) कवी अरुण काळे यांचा परिचय
- ७.१.१ नंतर आलेले लोक
- ७.१.२ खरं बोललं की सख्या आईला राग येतो
- ७.१.३ तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा
- ७.१.४ प्रेमाचं होऊ द्या ना जागतिकीकरण

७.२ ब) कवी वीरधवल परब यांचा परिचय
- ७.२.१ वय वाढत जातयं आपलं
- ७.२.२ जोतिराव फुल्यांचं चित्र
- ७.२.३ खूप दुरवर पाहुनही
- ७.२.४ आपली नाळ कधी पुरली गेलीच नाही गावकुसांत

७.३ समारोप

## ७.१ अ) कवी अरुण काळे यांचा परिचय

**अरुण काळे (जन्म २५ एप्रिल १९५२, मृत्यू : २००८)**

कवी अरुण काळे यांचे नाशिक येथे 'वास्तव्य' अनेक वर्षापासून नोकरी करत होते. पहिला कवितासंग्रह रॉकगार्डन (१९९३) मध्ये प्रकाशित. सायरनचे शहर (१९९७), नंतर आलेले लोक (२००६), ग्लोबलचं गावकूस या व अशासारखे त्यांचे (चार) काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत. अनेक पुरस्कारांनी सन्मानित...

(नंतर आलेले लोक) या काव्यसंग्रहातून सामाजिक आणि आर्थिक अनुभवविश्व चित्रित होते. त्यांच्या समाजनमस्क प्रवृत्तीला चिंतन आणि व्यासंग यांची जोड मिळाल्यामुळे त्यांची कविता वास्तववादी होते. शोषणाविरुद्ध त्यांची कविता उभी राहते. त्यांची कविता जागतिकीकरणाची बाजारसंस्कृती आणि माहिती क्रांतीचे अंतरंग उलगडून दाखवते.

उपहास-उपरोध हा स्थायीभाव (जागतिकीकरणातील विविध गोष्टींचा उपहास) जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या जल्लोषाची भाषा, अस्वस्थ करणारी चांगली कविता, अन्यायाची आणि शोषणाची जाणीव, गेयता, नाट्यपूर्णता, भाव प्रकटी करणासाठी मुक्त शैलीचा वापर, समकालीन वास्तव, संदर्भसंपृक्तता, शब्दकळेमधील सूचकता, ओघवती अर्थबहुल शब्दकळा, या व अशासारखे त्यांच्या कवितेचे ठळक विशेष आहेत.

**७.१.१ नंतर आलेले लोक :**

'कानामागून आली आणि तिखट झाली' या म्हणीचा प्रत्यय आपल्याला दैनंदिन आयुष्यातही अनेकदा येत असतो. घुसखोरी करुन, आक्रमण करुन आलेले उपरे, परदेशी अनेकदा मूळ भूमीतील प्रस्थापितांना उद्ध्वस्त करुन प्रसंगी नष्ट करुन स्वतःचे साम्राज्य प्रस्थापित करतात. अरुण काळे यांच्या 'नंतर आलेले लोक' या कवितेची मूळ संकल्पना हीच आहे.

नंतर आलेल्या लोकांना
आधी नव्हती बायका-मुलं
घरदार, प्रांत, देश
किंवा प्रेम करावं अशी मातृभूमी
हे सर्व त्यांनी बलकावलं
अन् काढली मुलं
पलीकडचे लोक आपले नाहीत
सांगितलं त्यांना नंतर आलेल्या लोकांनी

घुसखोरी करुन आक्रमण करुन आलेले हे लोक सुरुवातीला एकटेच असतात, त्यांच्या बरोबर त्यांची बायका-मुले नसतात, त्यांना घरदार नसते, प्रांत, देश नसतो, तरी त्यांची मातृभूमी तर नसतेच. मात्र ते सारे काही बळकावतात. आपले कुटुंब वसवतात आणि त्या भूमीतील मूळचे लोक उपरे आहेत अशी शिकवण ते मुलांना देतात. कवी पुढे वेगळीच खंत व्यक्त करतो -

नंतर आलेले लोक आधी गुराखी होते
चोर आणि लुटारु होते, व्यापारी होते
टोळीवाले आक्रमण होते, ते मालक झाले
राजे आणि पुरोहित झाले

नंतर आलेले लोक सुरुवातीला गुराखी असतात, चोर लुटारु असतात, कधी व्यापारी असतात तर कदी आक्रमणकर्ते असतात. पण नंतर येथील भूमीवर कब्जा करुन ते मालक होतात, राजे होतात. ते वेगवेगळे भुखंड शोधतात, देश शोधतात. ग्रह-तारेही शोधतात आणि त्याला आपल्या पूर्वजांची नावे देतात. पण मूळ भूमीतला माणूस मात्र ते कधीच शोधत नाहीत त्याला कधी समजून घेत नाहीत.

नंतर आलेल्या लोकांनी प्रस्थापितांमध्ये दुहीची बीजे रोवली. त्यासाठी त्यांनी कधी असत्याच्या आधार घेतला. कधी डोंगर रचले. कधी वंशभेद केला, कधी वर्णभेद केला. त्यांच्यात फूट पाडून त्यांच्यावर विजय मिळविला.

नंतर आलेले लोक लोभी, विलासी होते. स्वतःसाठी स्वर्ग निर्माण केले. स्वतःच्या देवाला इतरांना नरकयातना दिल्या. कुटुंबामध्ये, समाजात सीमा, बांध, यांच्यावरुन वाद निर्माण केल्या गेल्या. हे करत असतांना स्वतःचा (धार्मिक, सामाजिक) रंग दिला. कवी अरुण काळे हे पुढे अशाही भावना व्यक्त करतात -

नंतर आलेले लोक विध्वसंक होते
त्यांनी दगडं कापली आणि झाडं
पाणी कापले आणि माती
दुसऱ्यांची जंगल विकली
नद्या आणि डोंगरावर बाजारात आणले
कधी कधी दुसऱ्याचा देश
आपला म्हणून विकला
नंतर आलेल्या लोकांनी

हे लोक विध्वंसक होते, त्यांनी येथील नैसर्गिक साधनसंपत्तीही उद्ध्वस्त केली. झाडे कापून जंगले नष्ट केली. गौणखनिज विकुन डोंगर बोडके केले इतकेच नाही तर अनेक ठिकाणी दुसऱ्यांची जमीन स्वतःची म्हणून विकली.

त्यांनी तेथील जनजीवन विस्कळीत केले. त्या कपटी लोकांनी येथील लोकांची घरेदारे उद्ध्वस्त केली. युद्ध पुकारले. कपटाने जिंकून तथाकथित स्वातंत्र्याचे पुतळे उभारले. स्वःचे राष्ट्रगीत लिहिले आणि एक दिवस यानंतर आलेल्या लोकांनी मूळ भूमिपूत्रांना हद्दपार केले आणि ते प्रस्थापित झाले.

अरुण काळे यांनी कवितेत वर्णन केलेले हे नंतर आलेले लोक पुरण काळात, इतिहासात आणि अगदी आजच्या युगातही दिसतात. फक्त त्यांचे स्वरुप बदलले आहे. जुन्या काळातही साम्राज्यांवर आक्रमण होत होते. आज ते कुठे जमिनीवर होते, कुठे ते समाजाच्या अस्मितेवर होते. काही ठिकाणी या आक्रमण कर्त्यांकडून समाजाच्या श्रद्धेच्या, भावभावनांचा शस्त्र म्हणून वापर केला जातो, तर कधी धार्मिक, जातीय तेढ निर्माण करुन वर्चस्व मिळविले जाते. तात्पर्य, मूळ भूमिपूत्र जर आक्रमक झाले नाही, तर नंतर आलेले शिरजोर होऊन त्यांना हद्दपार करतील.

### ७.१.२ 'खरं बोललं की सख्ख्या आईला राग येतो' :

कवी अरुण काळे हे जग कसं बदलत चाललं आहे आणि कुणाचा कुणाला पोस राहिला नाही हे वास्तव 'खरं बोललं की सख्ख्या आईला राग येतो' या सारख्या कवितेतून तळमळीने मांडताना दिसतात.

सध्याच्या जगात चांगुलपणा, सत्य, प्रामाणिकपणा कुठे तरी हरवून गेला आहे. असत्याचा, विजय होतांना दिसतो. कष्ट करुन, प्रामाणिकपणे बोलण्याची शिकवण देते, तिलाही हल्ली खरे बोलले की राग येतो.

माणसाने देव बनवला
देवाने बनवला संगणक
खरं बोललं की,
सख्या आईला राग येतो.

जगभरचीच ही रीत झाली आहे. 'बळी तो कान पिळी' या न्यायाने जगभरात व्यापाऱ्यांचे राज्य आहे. पॅसिस्टनी लोकांसारखे शुद्र. आजही रस्त्यावरील जिणेच जगत आहेत. यंत्रयुगामुळे कामगारांचे महत्त्व कमी झाले आहे. आता मोठमोठ्या कामांसाठी 'ऑन-ऑफ'च बटण दाबणारे तर्जनीचे (बोटांचे) एक टोकही पुरेसे आहे. पुढे कवी म्हणतो -

सुक्काळीच्या कर्जात नियमित दुष्काळ
मरतो शेतकऱ्याचा ट्रॅक्टर
मध्यमवर्ग एक तरुण :
अंधारात भवितव्याला
माहितीवाले गेले हरवून

ट्रॅक्टरसारख्या यंत्रामुळे शेतकऱ्यांचे कष्ट कमी झाले. पण त्याचबरोबर पावसाच्या लहरीपणाने तो कर्जाच्या खाईत लोटला जात आहे. मध्यमवर्गीय तरुणाला तर भवितव्यच राहिलेले नाही. तो चाचपडतोच आहे. अंधारात आणि त्याचवेळी माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील तरुण मात्र ऐटीत जगत आहेत.

मातेच्या दुधाला मिळतंय मार्केट
माणसाला मिळतेच एक्सेंचज ऑफर
पुरोगामी दुकानात चालतंय
कुणाचंही क्रेडिट कार्ड

यांत्रिकीकरणांमुळे मध्यमवर्गीय कारकून नष्ट होतोय. त्याचवेळी वाममार्गाने बदबदा पैसा मिळविणाऱ्याची  हावही कमी होत नाही (चमचाही भरत नाही) सध्या स्वतःचे म्हणणे मांडायचे असेल तर ते लोकशाही मार्गाने नाही. आरडाओरडा करुनच मांडावे लागते. तरच त्याची दखल घेतली जाते. आईच्या दुधाचे (प्रेमाचे) बाजारीकरण झाले आहे.

माणसालाही मिळते आहे 'एक्सचेंज ऑफर' दुकानात कोणतेही आधुनिकतेच्या नावाखाली काहीही खपवून घेतले जाते आहे. जसे कोणत्याही दुकानात कोणतेही क्रेडीट कार्ड चालते.

पुन्हा पुन्हा तेच विषय घेऊन
परीक्षा देतात परिवर्तनाच्या चळवळी
कारभारणीसारखं चुपचाप
कुणाच्या मागं चाललं बौद्धिक नेतृत्व ?
रातोरात क्रांतीची स्वप्नं पाहणाऱ्यांना
सकाळी व्हावं लागतंय हास्यास्पद

परिवर्तनाच्या चळवळींनाही अपयश दिसते. तेचतेच विषय घेऊन ते चघळत बसतांना दिसतात. आपल्या कारभाऱ्याच्या मागे कारभारणीचे चालावे, तसेच बुद्धिजिवी लोक कोणाचेही नेतृत्व मान्य करीत आहेत. त्यातूनही एखादा क्रांतिकारी विचारांचा उभा राहतो. एका रात्रीत

क्रांती करायला, पण दुसऱ्याच्या दिवशी त्याचे हसे होते. पुढे कवी आपली व्यथा अधिक स्पष्टपणे मांडतो.

मी नाहीए कुणी समालोचक
हरणाऱ्या टीमच्या बाजूने बोलणारा
मी लांब पल्ल्याचं
विजयी सूत्र मांडणारा
मी नात्यांची नव्याने मांडामांड करतो
माणूस भंगारात येऊ नये म्हणतो
कवितेतून पुन्हा पुन्हा उगवत राहतो.

कवी म्हणतो, मी काही कुठल्या हरणाऱ्या टीमच्या बाजूने बोलणारा समालोचक नाही, की कोणी मोठ्या, दूरगामी विजयाचे सूत्र मांडणाराही नाही. पण माणसांमाणसांतील नाते भंगारात निघू नये. म्हणून केवळ या नात्यांची कवितेच्या माध्यमातून नव्याने मांडणी करु पाहतो आहे.

### ७.१.३ 'तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा' :

माहिती-तंत्रज्ञान हे सध्याच्या नव्या पिढीला मिळालेले वरदान आहे. प्रगतीची-विकासाची अनेक कवाडे या माध्यमातून तरुणांना खुली झाली आहेत. जग वेगाने जवळ येत आहे. मात्र यातून भौतिक अंतर कमी होत असतानाच माणसामाणसांतली दरी मात्र वाढत आहे.

तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा
आणि मल्टीमिडिया कीबोर्ड
हा संगणक, ही मेमरी अन्
अपडेट प्रोग्रॅमही तूच दिलेला

संगणकाचा आत्मा असलेला 'मदरबोर्ड' हास सध्याच्या तरुणाईचा आत्मा बनला आहे. मेमरी (स्मरणशक्ती) तोच आहे, अपडेट प्रोग्रॅमही (भविष्यकालीन योजना) तोच देतो आहे, थोडक्यात ही तरुण पिढी बहुश्रुत होते, पण ती केवळ संगणकाच्या जोरावर. संगणकांच्या मदतीशिवाय एक पाऊलही पुढे टाकणे अशक्य आहे. कवी पुढे म्हणतो,

पोरगं हरवू नये म्हणून
बाप पुढे जावून रस्त्यावर उभा राहतो
तसा तू पुढे आलास एकविसाव्या शतकात
आमच्याही आधी

मुलगा हरवू नये म्हणून वडील जसे पुढे जाऊन रस्त्यावर उभे राहतात, तसा हा संगणक एकविसाव्या शतकातील महापुरुष तरुणाईला मार्ग दाखविण्यासाठी आधीच येऊन उभा राहिला आहे. त्यामुले तत्कालीन महापुरुष (तत्वज्ञ, संशोधक, विचारवंत) सारे इतिहासजमा झाले आहेत. माहिती तंत्रज्ञानाने सारे विश्वच काबीज केले आहे. बारा हत्तीचे बळ त्याला मिळाले आहे. अभ्यासापासून कला-साहित्यापर्यंत सर्वच क्षेत्रात त्याचे प्राबल्य आहे.

munotes.in

आता या आयटीच्या युगात
दलितांना डि-लिट करण्यासाठी
नवनवीन सॉफ्टवेअर येताहेत
आणि प्रोग्रॅम खराब करण्यासाठी
सोडले जाताहेत विषाणू

मात्र हे होत असतांना माणसांमाणसांतील परस्पर संवाद हरवला आहे. या आयटीच्या युगात दीन दुबळ्यांना स्थान नाही. त्यांना 'डीलिट' करण्यासाठी नवनवीन 'सॉफ्टवेअर' येत आहेत. 'प्रोग्रॅम' खराब करण्यासाठी 'व्हायरस' सोडले जात आहेत. माणसाला 'माणूस' म्हणून नाही तर वस्तु म्हणून गणले जात आहे. मात्र 'अँटी व्हायरस' खबरदारीही घेतली जाते आहे,जी अगदीच तोकडी आहे.

सारे जगच बदलते आहे. प्रचंड वेगाने बदल घडत आहेत. मात्र जे सकारात्मक बदल व्हायचे आहे, ते मात्र अजूनही पुर्णपणे दिसत नाहीये. उफाराट्या पद्धतीनेच गणिते सोडविली जात आहेत. माणसाला 'माणूस' म्हणून नाही तर वस्तू म्हणून गणले जात आहे.

स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी दुसऱ्याचं स्वातंत्र्य खतम करणारे
साले हे लोकशाही जननीवाले दुलांगे
आपलं त्यांच्यावर फार प्रेम
पण आपल्या कल्याणाचं राज्य
निघालेय ते मोडीत काढायला
अन् हे माहिती तंत्रज्ञानाचं कोलीत
सापलंय माकडांच्या हातात

स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी दुसऱ्यांच्या स्वातंत्र्याला घाला घातला जात आहे. लोकशाहीवर आमचे प्रेम आहे म्हणणारे लोक कल्याण्याचे राज्यच मोडीत काढायला निघाले आहेत. ही सारी लढाई आता निर्णायक टप्प्यावर आहे कारण माहिती तंत्रज्ञान नावाचे कोलीत खरोखर माकडांच्याच हाती सापडले आहे.

### ७.१.४ 'प्रेमाचं होऊ द्या ना जागतिकीकरण' :

जागतिकीकरण हा सध्याच्या युगातला परवलीचा शब्द बनला आहे. जागतिकीकरणामुळे जग जवळ आले. माहितीचे जाळे सर्वांना खुले झाले. मात्र त्याचवेळी माणूस मनाने एकमेकांपासून दूर गेला. इंटरनेट, स्मार्ट फोन आणि इतर आधुनिक तंत्राच्या गदारोळात मानवी भावभावना मात्र हरवून गेल्या. प्रत्येक गोष्टीत, प्रत्येक कृतीत तंत्रज्ञानाचा हस्तक्षेप वाढल्याने, माणसाचे जीवनच यंत्रवत झाले. प्रेमासारखी उदात्त भावनाही कृत्रिम झाली. तिचेही बाजारीकरण झाले म्हणूनच कवी म्हणतो, जागतिकीकरण हे मानवाच्या भल्यासाठी आणि या तंत्रयुगात गरजेचे असेल, तर प्रेमही तितकेच गरजेचे आहे त्याचेही जागतिकीकरण होऊ द्या!

'प्रेमाचं होऊ द्या ना जागतिकीकरण' या कवितेत अरुण काळे यांनी मानवाचे आयुष्य कसे यंत्रवत होत आहे. आणि माणूस तंत्रज्ञानाच्या किती आहारी गेला आहे. हे सांगताना विनोदी शैलीत काही उदाहरणे दिली आहे. जी सध्याच्या आधुनिक युगात पावलापावलांवर प्रत्ययास

येतात. कुटुंबातील संवाद हरवत चाललाय, मुलाला मोठ्या शाळेत घातले की, आपले कर्तव्य संपले असे मानणाऱ्या वडिलांना आपला मुलगा कितवीत आहे हे माहित नसते तीच गोष्ट मुलाची.

वडील म्हणजे पैसे पुरवणारे यंत्र, हेच मनात घट्ट बसल्याने वडीलांचे पुर्ण नाव त्याला माहीत असण्याचे कारणच नाही. मोबाईलचा रिंगटोन हा अनेक अवसान घातकी ठरतो. प्रसंगाचे गांभिर्य नष्ट करतो, हे सांगताना कवीने म्हटले आहे, आईच्या चितेला अग्नी देत असतांना मुलाचा मोबाईल वाजला... 'कुर्यात सदा मंगलम...' आजीबाईंच्या बटव्यात आता जडीबुटी नसते, पोट दुखल्यावर तीही म्हणते, 'दोन घोट कोल्ड्रींकचे'

मोठ्या मुलाने चितेला अग्नी दिली
कुर्याऽऽत सदा मंगलमच
मागून मोबाईलवर रिंगटोन आला
पोटात कृमी झाल्या
आजीबाईंन बटव्यातून शीतपेयाची बाटली दिली.
तीन वेळा घे म्हटली.

पूर्वी पती दूर गेला तरी पत्नीला मनातून हुरहुर वाटायची. आता मोबाईलमुळे सतत संपर्क ठेवणे शक्य झाल्याने 'हुरहुर' हा शब्दच अनोळखी झाला आहे. नवीन वर्ष एक जानेवारीला इंग्लिश पद्धतीने शुभेच्छा देत साजरे होते. गुढीपाडव्याला मात्र प्रथा, परंपरांना फाटा देत इलेक्ट्रॉनिक वस्तुंची खरेदी होते. जोडीदार निवडतांना प्रथम चौकशी होते बँक बॅलन्स, क्रेडीट कार्डची. त्यामुळे अनेक प्रत्यक्ष भेटण्याआधीच इंटरनेटवरुनच लग्न मोडते. माणसाच्या मूळ संवेदना हरवून गेल्याचे चित्र दिसते.

कला क्षेत्रातही बाजारुपणाचा शिरकाव झाला आहे. म्हणूनच कवी म्हणतो, कृत्रीम पावसावर लिहिलेल्या कवितेला पाहून राज्य पुरस्कार मिळतो. कवितांचीही रिमिक्स होत आहेत. कवितासंग्रह डिजिटल झाले आहेत. आणि त्यांची समीक्षा करण्यासाठी पॉलीसमीक्षाकेंद्रे उभी राहत आहेत. कोणतीही कविता अस्सल राहिलेली नाही.

म्हणूनच हॉरर सिनेमावाले सूचना देतात, 'भीतीची जनूके' सोबत आणल्याशिवाय थिएटरमध्ये प्रवेश मिळणार नाही.

विभक्त कुटुंबातील माणसेही विभक्त होत आहेत. मुलगा सायबर बँकेत गेम खेळायला, तर वडील वाइन कॅफेत दारु प्यायला, हे चित्र अनेक कुटुंबात दिसते. ज्याला वरची कमाई आहे तो अशा व्यसनांच्या ठिकाणी लोकप्रिय होतांना दिसतो. उदात्तीकरणाच्या नावाखाली अनेक सामाजिक उपक्रम केले जातात. मात्र त्यात माणूसकी आणि माणसाला स्थान नसते म्हणूनच समानतेचा बुरखा पांघरलेल्या समाजात स्त्री अजूनही अबलाच आहे. तिच्यावरील अत्याचार वाढतच आहेत. चंगळवाद बोकाळत असतांना शेतकऱ्यांकडे कोणाचे लक्ष नाही.

चिनी बनावटीच्या तकलादू वस्तूंचे सर्वत्र प्राबल्य आहे. अगदी भारतीय संतावरही त्याचा परिणाम झाला आहे. मात्र दुर्दैव आहे की, अस्सल कला बाजूला सारुन अशा तकलादू गोष्टींना वाहवा मिळते आहे.

जागतिकीकरणाचा आणखी एक परिणाम म्हणजे जीवनातली सहजता हरवून जाऊन त्यात कृत्रीमता वाढत आहे. कधी म्हणतो, खेड्यापाड्यातल्या मुलीही आता बक्षीसं मिळाल्यावर आनंद व्यक्त करण्यासाठी विश्वसुंदरीसारख्या राहू लागल्या आहेत. भटकंती होते आहे पण स्केटिंग करुन, आदिवासींसाठी जंगलेही आता आर्टिफिशियल झाली आहेत. आणि दलितांनाही मटणाच्या वेफर्सचा व्यवसाय मिळाला आहे.

जागतिकीकरणामुळे जग जवळ येत असतांना, ग्लोबल ते लोकल अर्थात ग्लोबल ही संकल्पना रुजत असतांना, समाज मात्र संकुचित होत आहे. समाज हा अनेक माणसांवरच्या समूहाचा न होता, तो एका माणसाचा होतो आहे इतका माणूस स्वार्थी, स्वकेंद्रित झाला आहे. नाती विसरु लागला आहे.

प्रबोधनकार, विचारवंत यांचा प्रभाव समाजावर राहिलेला नाही, रस्त्याचे डांबरीकरण जसजसे पुन्हा पुन्हा उखडते, तशीच माणसाची अवस्था झाली आहे. त्यांच्या जीवनात स्थैर्य उरलेले नाही. कोणतेही बंध त्याला राहिलेले नाही. प्रेम, श्रद्धा या भावना तर दाबल्याच गेल्या आहेत. द्वेषातून द्वेषच वाढीला लागतोय. हवा-पाणी यावरही जो-तो हक्क सांगू लागलाय. यातून समाजातली दरी वाढते आहे आणि ती कमी करण्यासाठी प्रेम हेच एकमेव साधन आहे. पण कवी म्हणतो, प्रेम हे काही कुठून ट्रक, ट्रेन, विमान, जहाजे भरुन आणता येत नाही. तंत्रज्ञानाचे जाळे पसरुन समाजातील माणसे एकमेकांजवळ आणली पाहिजेत. प्रेमाच्या बंधनात त्यांना अडकवले पाहिजे, जागतिकीकरणाने जगाचे जसे वैश्विक खेडे निर्माण केले. आता प्रेमाचेही जागतिकीकरण होऊ द्या.

## ७.२ ब) वीरधवल परब

शिक्षण : बी.एस.सी.डी.एड.
व्यवसाय : प्राथमिक शिक्षक, वास्तव्य पाल, (ता. वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग) येथे.
काव्यसंग्रह : दरसाल दर शेकडा (२००६, २००९)

नवाक्षरदर्शन या वाङ्मयीन नियतकालिकाचे प्रकाशक. अनेक पुरस्कारांनी सन्मानित... उदाहरणार्थ (राज्य शासनाचा बहिणाबाई चौधरी काव्य पुरस्कार २००६), महाराष्ट्र फाउंडेशन ग्रंथ पुरस्कार (२००७), 'तुका म्हणे' काव्य पुरस्कार (२००७), ना.ह. आपटे काव्य पुरस्कार (२००७)... आदी.

स्वतःच्या वेगळेपणाने व्यक्त होणारा आणि विशिष्ट सामाजिक, राजकीय, वैचारिक भूमिका घेणारा हा कवी आहे. त्याच्या कवितेतून समाजवादी दृष्टीचे संवेदनशील कवीमन चित्रित होते.

आयुष्यात काहीच घडत नसल्यामुळे जगण्यातील उमेद संपत चालल्याची खंत, त्याचबरोबर जगण्याचे नित्य सोपस्कार करुन देखील काहीही करीत नसल्याची कुरतडणारी भावना या कवीच्या कवितेतून चित्रित होते.

**७.२.१ वय वाढत जातंय आपलं :**

एखाद्या व्यक्तीला आपल्या जीवनाची दिशा सापडत नाही, किंवा मार्ग मिळत नाही. त्याला कारणही तिच व्यक्ती असते. अशावेळी माणसाचे मन अधिकच भांबावुन जातांना दिसून येते. आणि अनेक गोष्टी करायच्या राहून जातात. जे करायला पाहिजे ते नेमकेपणाने व त्या त्या वयात केले जात नाही. त्यामुळे अशा व्यक्तीच्या पदरी निराशाच येते. किंबहुना मन अधिकच भांबावून जाते. आणि बघता बघता वय वाढत जाते. याविषयी कवी म्हणतो -

वय वाढत जातंय आपलं
आणि फालतु गोष्टींत अडकत जातोय आपण
आपण कुठल्यातरी किराणा मालाच्या दुकानात
पतसंस्थेच्या किंवा कुठल्यातरी संघटनेच्या कार्यालयात
बिनकामी बसुन असतो
किंवा कुठल्यातरी देवळातल्या काकड आरतीत
सूर मिसळत राहतो.

कवीने दिशाहीन माणसाच्या वावरण्यावर नेमकेपणाने भाष्य केले आहे. कारण बऱ्याचशा व्यक्ती अशाच विविध गोष्टीत अडकत जातात. त्यातही कोकणातील परिस्थितीत यासाठी जास्तच पोषक असते असेच म्हणावे लागते. देवळातल्या काकड आरतीत, सूर मिसळत राहातील या पंक्तीतुन कवीने पहाटेपासुनच माणसाचा दिनक्रम सांगुन टाकला आहे.

आपला वेळ जात नाही
मित्राकडं जाव तर त्याच्या खोलीला कुलुप
किंवा कुठल्यातरी ऑफिसात
कमावणाऱ्या बायकोला
आणायला जायचं असतं त्याला
किंवा रॉकेल मीठ मिरची
इलेक्ट्रिकल बिल बिघडलेल्या फोनची तक्रार
नातेवाईकाची आजारपण, बाळंतपण, वाढदिवस किंवा बारसं
किंवा तो सर्दीपडशानं
बेजार होऊन डॉक्टरकडं
किंवा हातात जपमाळ धरुन तासनतास ध्यानात गुरफटून
किंवा बायकोशी भांडुन तावातावांन घराबाहेर
किंवा कुलगुरुचं स्वागत, उद्घाटन, सूत्रसंचालन, ग्रामस्वच्छता
रक्तदान, सोशल कॅम्प्स, वित्तीय अनुदान, देणग्या
असा तो गळाभर बुडालेला

कवी वीरधवल परब माणसाच्या बिनकामाची यादीच देतो. कारण अशी माणसं समाजामध्ये अवतीभोवती पहायला मिळतात. ही माणसं म्हटलं तर खूपच कार्यमग्न असल्यासारखी असतात. परंतु त्यांचे कुठलेही काम हे उत्पादकतेत मोडत नाही. ही कामे तशी अनुत्पादकच आहेत. अशा माणसांना अशाच कामात रस असतो. म्हटलं तर ही माणसं दिवसभर कुठेना कुठे गुंतलेली असतात. परंतु त्यांच्या त्या वावरण्याचा फायदा त्यालाही होत नाही आणि

कुटुंबाला तर नाहीच नाही! वीरधवल परब थोड्याशा उपरोधिकपणे, उपहासात्मकतेने अशा माणसांचा आपल्या काव्यातून समाचार येतांना दिसतात. पुढे कवी म्हणतो -

आपण मग त्याच्या बारक्या पोरांच बळेबळेच
कौतुक करुन वाट धरतो

कवी धार्मिकपणाचा म्हणजेच उपास-तपास, जप-तप इत्यादी गोष्टींच्या आहारी गेलेल्या समाजाची काव्यातून खिल्ली उडवितो. तसेच जागतिकीकरणातील नव्या नव्या उत्पादनाची माणसाला पडलेल्या भुरळीचा उपरोधातून समाचार घेतांना दिसून येतो.

घरी परतावं तर
बायकोचे सोळा शुक्रवार, मार्गशीर्ष गुरुवार
शिर्डी शेगाव अक्कलकोट, संकष्ट चतुर्थी
अष्टविनायक श्रद्धा सबुरी फ्रिज उंच टांचाचे सँडल्स
विणकाम भरतकाम वॉशिंग मशीन शेजारी नव्या जाहिराती
कोलगेट शाम्पु फॅमिली प्लॅनिंग
वजन कमी करण्याचे उपाय
शनि शिंगणापुर
लिंबु मिरच्या बिब्बा
महिला मंडळ पालथा तांब्या

महिला घरचे वातावरणही तसे सनातनीचे असते. कारण बायकोने ओबाळे, अनेक उपास-तापास यामध्ये घरी गेल्यावर अशाच गोष्टींमध्ये अकडुन पडलेली माणसं, तर दुसरीकडे जागतिकीकरणामुळे बाजारात आलेल्या नवनवीन गोष्टींची यादीच खरं तर हे सर्व परवडणारं नसतचं परंतु जागतिकिकरणाच्या भुलभुलैय्याला फसलेली सगळीच माणसं. त्यामध्ये वजन कमी करण्याचे उपायही सुचविलेली असतात, परत यामध्ये लिंबु मिरच्या आणि बिब्बा म्हणजेच अंधश्रद्धा पसरलेली दिसते. आणि घरी घोडं शृंगारिक व्हावे, तर पत्नीची मासिक पाळी (पालथा तांब्या) म्हणजेच सर्वत्र निराशाच कवीला दिसते. परत बायकोचा त्रागा व त्यातुन ती ठणकावते की, कुठल्यातरी आश्रमात जाऊन राहा. सात-आठ दिवस म्हणजे डोकं ठिकाणावर येईल. हतबल होऊन, किंवा बायकोला मदत म्हणून दोन मुठ मुग बांधुन ठेवतो आपण ओल्या फडक्यात कवी उपहात्मक रीतीने सर्वसामान्य व्यक्तीची व्यथाच मांडतांना दिसतो.

कधी मराठीचे प्राध्यापक भेटतात
त्यांना संतसाहित्य वगैरे प्राचीन पेपर असल्यानं
आर्वाचीन वगैरे टच नसतो.
तरी पण आपण वाढती पोरंबाळ
कुळथाची पिठी नाचणीची भाकरी
जीवनसत्व भाजीपाला स्मरणशक्ती वाढविण्याची टॉनिक्स
सत्य साईबाबा फेंगशुई गावाकडचं हवापाणी किंवा
मुतखड्यावरचे रामबाण इलाज
घरबांधणीच्या कर्ज योजना आणि आग्नेयेकडे किचन की असा-अतोनात
त्यापेक्षा सहकारी गृहनिर्माण संस्था हिरो होंडा
सलमान बजाज ॲव्हरेज विश्वसुंदरी
असच काहीबाही खुप खुप आत्मीयतेनं बोलत राहतो

तत्वज्ञान आर.डी. पॉलीटिक्स नॉन-ग्रँटेड बेकारांना
एम्प्लॉयमेंट न्युज देत आधारवड होत राहतो
आपला वेळ जात नाही

३ माणसं आपला वेळ जात नाही. त्यावेळी ज्ञान नसतांना कशावरही बोलत राहतात, यांचे उपहासात्मक व उपरोधिकपणे वर्णन कवीने केले आहे. त्यामध्ये कोणत्याही गोष्टींचे बावडे नसते. मग तत्वज्ञान असु दे, बेकारांना नोकऱ्यांबाबत सल्ला, संत साहित्य, गाडीचे ॲव्हरेज काय पासुन कोणत्या ३ खाद्यपदार्थात जीवनसत्व असतं इथपर्यंत अशा बऱ्याच काही गोष्टीवर माणसे आपल्या तारा छेडत असतात यावर कवी वीरधवल परब आपल्या काव्यात नेमकेपणाने मांडतात यामध्ये माणसाचे रिकामटेकडेपण दाखवून दिले आहे. कवी पुढे म्हणतो -

काल मुद्दामच म्हणून, खुप गर्दी असलेल्या सलूनमध्ये शिरलो
पिठाच्या चक्कीवर सर्वांत शेवटच्या नंबरावर राहिलो
सकाळचा बरा वेळ संडासातच घालवला
दुपारी सगळी कोलिष्टकं झाडून काढली
नंतर दुधाचं नी वर्तमानपत्राचं अंदाजपत्रक मांडलं
आणि सांयकाळी बुजगावण्यासारखं बायकोसोबत
हळदीकुंकवाच्या बाजाराला गेलो.

ज्यांना काहीच करण्यासारखे नसते अशी माणसं अनेक गोष्टीमध्ये जाणिवपूर्वक आपला वेळ घालवत असतात. म्हटलं तर निष्क्रिय कर्म म्हटलं तर स्वतःला उगिचच गुंतवून ठेवणे अशा माणसांच्या प्रवृत्तीचे दर्शन कवी घडवतांना दिसुन येतो. शेवटी कवी म्हणतो -

एकूण काय तर काहीही करत नाही आपण
आणि वय वाढत जातयं आपलं
दरसाल दर शेकडा शून्य दरानं

कवी 'वय वाढत जातयं आपलं' या काव्यात माणसांच्या एकूणच निष्क्रियतेवर भाष्य करत राहतो. माणसांना नेमके उत्पादीत काम कोणते आणि अनुत्पादीत काम कोणते यातला फरक समजत नसतो; माणसं आपला वेळ कुठेतरी घालवत राहतात, त्यामुळे त्यांच्या हातुन स्वतःसाठी कुटुंबासाठी आणि समाजासाठी कोणतेही चांगले काम घडत नाही. फक्त वय वाढत जातयं आणि तेही दरसाल दर शेकडा शून्य दरानं.

कवी वीरधवल परब हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील (कोकण) असल्यामुळे त्या भागातील माणसांचे जीवनचक्र रेखाटले आहे. अशी माणसं आजुबाजुला नेहमीच दृष्टीस पडतात. वीरधवल परब यांचे समाजाकडे बघण्याचे संवेदनशील मन या काव्यात दिसुन येते. तसेच त्यांना या प्रकाराबद्दल अतोनात चीड असलेली दिसुन येते. त्यातुनच त्यांचा त्रागा होतो. त्यामुळेच कुठे त्राग्याने, केव्हा केव्हा उपहासात्मक, उपरोधिकपणे ते लिहित जातात.

### ७.२.२ जोतिराव फुल्याचं चित्र :

ज्ञानगंगेच्या सर्वत्र प्रसार करणाऱ्या महात्मा जोतिबा फुलेंचा आपल्या रोजच्या व्यापारामध्ये माणसाला विसर पडतो. फक्त शिक्षणच नाही तर बहुजन समाजाच्या वंचितेसाठी महात्मा फुले हे बंड केलेले पाहिले क्रांतिकारी व्यक्तिमत्त्व परंतु त्यांचा आता फक्त भिंतीवर फोटोच लटकवलेला आहे. त्यांच्या विचारांचा मनुष्याला विसर पडत चालला आहे अशी खंत कवीला आहे.

नेमकं कधीपासून फुल्याचं चित्र
भिंतीवर अडकवून ठेवलयं, माहित नाही
सहसा त्याकडे लक्ष जात नाही
लक्ष जाऊनही चित्र डोळ्यात शिरत नाही

आदर्श पुरुषांच्या आता फक्त तस्बीरीतरच भिंतीवर लटकवून ठेवल्या जातात. त्याही वर्षानुवर्ष त्याच अवस्थेमध्ये असतात. त्याकडे फारसा लक्ष कोणालच जात नाही. आणि लक्ष गेलाच तरी त्यांची प्रतिमा डोळ्यांत शिरत नाही म्हणजेच त्याचे विचार मनापर्यंत पोहचत नाहीत अस कवीला म्हणायचे आहे.

कवी पुढे म्हणतो, दररोजच्या व्यापातुन मग, कधीतरी सवड काढून, लक्षपुर्वक चित्र निरखतो, रंग... रेषा... रुप

मधेच काय होत कळत नाही
भीती वाटु लागते की,
चष्मा न लावण्याच्या अट्टाहासामुळे
नंबर वाढून एक दिवस निकामी होतील डोळे
किंवा साचत जाईल मळ भराभर कानात
किंवा कानातली पोकळी भरुन काढील एखाद हाड दुर्लक्ष केल्यानं

आजुबाजुला उघड्या डोळ्यांनी पहायचेच नाही हा अट्टाहास माणसाचा नेहमीच असतो. त्यामुळे एखाद्यावेळेस चांगले दिसायचेच बंद होईल. चांगल्या गोष्टी ऐकण्याची सवय सुटत चालली आहे. कानच बंद होतील. कारण आपल्या आजुबाजुला इतक्या वाईट गोष्टी ऐकायला मिळतात, तसेच समाजात विकृत गोंष्टीचाच अधिक भरणा झालेला आहे. त्यानेच आपले कान बंद होतात, आणि हे केवळ आपण अनेक गोष्टींकडे दुर्लक्ष केल्यामुळे घडत आहे. कवी पुढे उपहासाने म्हणतो -

त्यापेक्षा -
पाठीचा कणा पाठ ठेवायला शिकलं पाहिजे
किंवा मग नियमित योगासनं केली पाहिजेत,
आरोग्य जपलं पाहिजे, पाणी गाळुन आणि उकळुन प्यायला हवं

कवी आताच्या समाजातील गोष्टींवर उपरोधिकतेने टीका करतांना दिसतो. पाठीचा कणा ताठ ठेवायचा म्हणजे योगासनं केली पाहिजेत, आरोग्य जपलं पाहिजे. त्यासाठी पाणी उकळुन, गाळुन प्यायला पाहिजे. म्हणजेच समाज इतर गोष्टींमध्येच कसा गुरफटत चालला आहे. निर्भिडपणा हा मनाने येत असतो. हे माणसं विसरायला लागली आहेत. त्यासाठी इतर गोष्टींचाच जास्त आधार घेतांना दिसतात. प्रतिकारशक्ती माणसाची मारत चालली आहे. मग ती शारीरिक असो अथवा मानसिक असतो. मनुष्य प्रतिकारशक्ती निर्माण करण्याऐवजी आपल्या शरीराचे जास्तच चोचले पुरवतांना दिसुन येतो याबद्दल कवीने खंत व्यक्त केली आहे. तो म्हणता–

मग हळुहळु जाणवतं
फुल्यांच्या पाठीचा कणा इतका ताठ कसा ?
आणि आपला अवघा देहच
का असा निर्णायक क्षणी
होऊ लागलाय लोळागोळा।

माणुस आज अवसानघातकी बनत चालला आहे. ज्या महात्मा फुलेंनी वंचितांना ताठ मानेने जगायला शिकवलं तिच माणसं आज अशी हतबल का होतात! कारण आज आपल्यावर कितीही अन्याय झाला तरी आपण आपली नोकरी टिकवण्यासाठी हाजीहाजी करतांना दिसतो. तसेच ज्या आईवडिलांनी जन्म दिला. लहानाचे मोठे केले, वाढवलं, शिकवलं. त्यांना अडगळीत टाकून देतो का तर बायकोच्या सांगण्यावरुन अशी अवस्था होते. कारण निर्णायक क्षणीच आपला लोळागोळा झालेला आहे. कशाची कास धरावी हेच आपल्याला समजत नाही. महात्मा ज्योतिबा फुलेंना समाजात कितीतरी विरोध झाला परंतु त्यांनी त्याला परखडपणे तोंड दिले आणि आज आपण बारीक-सारीक गोष्टीत लगेच माघार घेतो. कवी वीरधवल परब हे आपल्या प्रत्येक काव्यामध्ये समाजातील या विफलतेविषयाची, उदासिनतेविषयाची खंत व्यक्त करतांना दिसुन येतात.

### ७.२.३ खुप दुरवर पाहुनही :

आपण खुप पुढ जाण्याचा विचार करतो. परंतु पुढे जाता येतेच असे नाही. अशावेळी आपण आपले पूर्वआयुष्यही मागे टाकलेले असते. त्यामुळे आपली अवस्था, ना घर का ना घाटका अशी होतांना दिसुन येते. याविषयी कवी आपल्या 'खुप दुरवर पाहुनही' या काव्यात म्हणतो -

खुप दुरवर पाहुनही दूरचं दिसत नाही
पायाखालची मातीही स्वीकारायला तयार नाही
अशा या भयाण दिवसात, निमिषार्धात बदलणार
नि गळा घोटु पाहणार वास्तव, क्षणक्षणाला काबीज
करत जातं आपला कोवळा जीव

आपण विकासाच्या नावाखाली खुप पुढे जाण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु आपली नाळ त्या समाजात जोडली जात नाही. आणि या खटाटोपात आपण आपली पुर्वाश्रमीच्या, समाजाशी नाळ तोडलेली असते. त्यावेळी माणसाची अवस्था ही भांबावल्यासारखी होऊन बसते. पुढे जाण्याचे प्रयत्न माणसाने सातत्याने करत राहिले पाहिजेत. परंतु त्याचवेळी आपले पुर्वाश्रमीचे ऋणानुबंध तोडता कामा नये. कारण अशा अवस्थेत खरं वास्तव डोळ्यांसमोर उभं राहतं आणि आपल्यालाच सतत आपले मन खात राहतं कवी म्हणतो -

सारचं कसं अस्ताव्यस्त नि अंधातरी!
काय स्वीकारायच हे आपण कुठ ठरवत असतो ?
ते तर अगोदरच चालत आलेलं असतं सटवीच्या पायानं.

मनुष्याने कितीही ठरवलं तरी होतच असं नाही. कारण सर्व गोष्टी संचितानेच होत असतात. रुढी, परंपरेने चालत आलेल्याच गोष्टी आपल्याला स्वीकाराव्या लागतात. त्या चांगल्या असो अथवा वाईट असो आपण आपले डोळे बंद करुन स्वीकारत आलेला असतो. त्यातील चांगले-वाईट आपल्याला समजत नाही. किंबहुना ते समजत नाही किंबहुना ते समजुन घेण्याची आपल्याकडे सोयच नाही. सर्व काही नियतीच ठरवत असते.

आपण आपलं अविरत चालत राहायचं,
वाटेवरचे दिवे विझत नाहीत तोवर अथकपणे

कवी म्हणतो, आपलं ध्येय गाठण्यासाठी आपण आपले प्रयत्न करत रहायचे. जोपर्यंत कवी आशावादी आहे की, आपल्याला केव्हा ना केव्हा तरी यश मिळणारच आहे.

munotes.in

### ७.२.४ आपली नाळ कधी पुरली गेलीच नाही गावकुसांत :

ग्लोबल दुनियेत मनुष्य स्वत:लाच हरवुन बसला आहे. याविषयी कवी वीरधवल परब 'आपली नाळ कधी पुरली गेलीच नाही गावकुसांत' या कवितेतून आपली असफलता व्यक्त करतो. यासाठी कवी सिंधुदुर्ग परिसरातील वातावरणाचा आधार घेताना दिसतो. कोकणातील सणावारांच्या सादरीकरणाचा आढावाच घेतांना म्हणतो -

आपण ना साक्षीदार गाव पंढरीचे,
ना शिमग्यातल्या शेंबटाचे
ना चतुर्थीतल्या भजनी मंडळाचे

शिमगा हा कोकणातील प्रसिद्ध आणि उत्साही सण. तसेच चतुर्थी म्हणजेच गणरायाचे पवित्र आगमन. या सणांना कोकणातील मनुष्य कितीही लांब असु दे किंवा कितीही कामात असु दे तो हजर राहतील. एवढे महत्त्व कोकणात या दोन सणांना आहे. परंतु कवी म्हणतो शिमग्यातल्या शेंबटांचे आणि चतुर्थीतल्या भजनी मेळ्यांत आपण कधी साक्षीदार झालोच नाही. एवढे या ग्लोबल दुनियेत अडकुन गेलो आहोत.

आपली नाळ कधी, पुरली गेलीच नाही गावकुसात. कुठल्यातरी हॉस्पिटलात, नर्सने केले आपल्याला, श्वास घ्यायला मोकळे त्यामुळे आपली नाळ गावामध्ये कधीच जोडली गेली नाही. मुळात हॉस्पिटलमध्ये आपला जन्म झाला. त्यासाठी कधी म्हणती नर्सने केले आपल्याला श्वास घ्यायला मोकळे.

बांडगुळासारख्या जगात राहिलो
गावाच्या हवापाण्यावर, उकड्या पेजेवर
कलमी आंब्याच्या घाऊक, बाजारभावावर
बोलत राहिलो तदन खोटं बेगडी हासु ओठांवर ठेवुन
गावात असुन नसल्यासारखं

बांडगुळ ही वनस्पती दुसऱ्या झाडावर जगते आपले जीवन आहे. गावाच्या हवापाण्यावर आणि उकड्या पेजेवर जगत राहिलो. हापुस आंबा केव्हा खायला मिळालाच नाही. त्याचा फक्त बाजारभावावर खोटे हासु ओठांवर ठेवुन खोट बोलत राहिलो. गावात असुनही नसल्यासारखेच आपले जीवन. कारण गावात नाळ कधीच जोडली गेली नाही.

धावत्या गाडीच दार पकडून जमतील तसे कुळाचार सांभाळले
कौल-प्रसादाच्या सुरक्षित सवलतीतून, अस्तित्वाचे घोडे पुढे दामटताना
राखणदाराच्या मर्जीसाठी, कापले उलट्या पिसाचे शेकडो कोंबडे

कवी कोकणातील अंधश्रद्धेवर आपल्या काव्यातून घाला घालतो. जगरहाटाबरोबर राहुन रितीभीती सांभाळण्यातच आयुष्य गेले. देवाला लावला जाणारा कौल - प्रसादामध्ये कोकणी मनुष्य अडकुन पडलेला आहे. त्यातच राहुन आपले अस्तित्व दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न चालु असतो. गावच्या वेशीवरील गावाच्या राखणदाराला वश करुन घेण्यासाठी उलट्या पिसाचे कोंबड्याचे शेकडो बळी कोकणात दिले जातात. या जगरहाटीतून बाहेर पडता येत नाही. याविषयी कवी पुढे म्हणतो -

समकालीन कातळ फोडून
आकाशाला गवसणी घालण्याची हिंमत केली नाही
की नदीपात्रातल्या वळसेदार घातक कोंडित

munotes.in

डोकावून पाहण्याची शामत झाली नाही
आणि कुकारे घालत, सोबतीच्या भोळकट कुळवाड्यांशी
चार-दोन शब्दांची उधार उनवार करत,
हिरव्या शेतीभातीची राखणही करता आली नाही
निःसत्व होत गेली वंशपरंपरागत कसदार माती

म्हणजे परंपरागत विचारसरणीच्या विरोधात आपण कधी जातच नाही. नवीन काही करुन दाखवण्याची विजिगिषा वृत्ती आपल्यात कधीच नाही. एखादे साहस दाखवता आले नाही. कारण नदीपात्रातील घातक कोंडित जाण्याचा तर सोडाच पण त्यामध्ये डोकावून पाहायची आपणाला उमीद नाही. मग काय तर त्याच विचारसरणीच्या भोळसट लोकांना साद घालत, आवाज देत, इकडच्या-तिकडच्या उगीचच गप्पा करत जीवन जगत राहिलो. त्यामुळे आपले शेत राखताही आले नाही. त्यामुळे वंशपंरापरागत कसदार मातीही नापीक होऊन गेली. कवी म्हणतो या जीवनात आपण राहिलोच नाही. म्हणजेच आपली नाळ जोडली गेलीच नाही. पुढे कवी म्हणतो -

राहाटाला अडकवुन घेत मग
कच्चं खाऊन मुखदर्शनावरच मानलं समाधान, पिटाळलं स्वतःला सतत
धुळीच्या, खाचखळग्यांच्या, गुराख्यांनी मळलेल्या
पायवाटांपासून खूप दूर, समकाळाशी संवाद साधत
डोईवरच मुंडांस उतरुन, ग्लोबल चकोट करुन घेतलं.
भरवशाच्या न्हाव्याकडून, भरवशाच्या सलुनमध्ये
शाहि इतमामात निर्विघ्नं

गावाकडच्या व्यवहारांमध्ये सामावता न आल्यामुळे पंरपरागत शेतीवाडी सोडुन नोकरीसाठी शहराचा रस्ता धरला तेही आपल्याच गावापासुन रोजच्या सरावातल्या गुराख्यांनी मळलेल्या पायवाटा, खाचखळग्यांमधून दुर जात नवीन जगात प्रवेश करतो. स्वतःच मुळचं अस्तित्व टाकून देऊन ग्लोबल दुनियेत प्रवेश करतो कारण नाळ कधी पुरली गेलीच नाही गावकुसात.

## ७.३ समारोप

कवी वीरधवल परब आधुनिक पिढीचा, नोकरीसाठी शहरात जाणाऱ्या तरुणांच्या मनाची व्यथा मांडताना दिसतात. तसेच गावातील रुढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा या विषयांवरही नेमकेपणाने बोट ठेवतात. आपल्या जन्मगावापासुन दूर गेलेल्या व्यक्तीची मनोव्यथा कवीने या कवितेत अधोरेखित केलेली दिसुन येते.

❖❖❖❖

# घटक -८

## निवडक मराठी कविता संग्रहातील कवितांची वैशिष्ट्ये

**घटक रचना :**

८.१ प्रस्तावना
८.२ कविता संग्रहाची वैशिष्ट्ये - आधुनिकतेचा प्रभाव
८.३ स्त्री जीवनाचा वेध
८.४ शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनांचे चित्रण
८.५ जागतिकीकरणाची कविता
८.६ समारोप

## ८.१ प्रस्तावना

पद्य वाङ्मयाचा अविष्कार असलेल्या 'कविता' या प्रकारचा प्रवाह हा सुरुवातीपासून ते आजतागायत वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. मराठी कवितेच्या वाटचालीचा विचार करता काळाच्या प्रत्येक टप्प्यावर आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने मराठी कविता ही आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे. आशयात भोवतालचे अनेक विचार प्रवाह कवितेतून व्यक्त होतात. त्यामुळे मराठी कविता विविध प्रकारच्या विचारप्रवाहाला आपल्यामध्ये सामावून घेताना दिसते. रचनादृष्ट्याही विचार केल्यास केशवसुतांच्या कवितेपासून ते आजच्या कवितेपर्यंत विविध प्रकारच्या रचना प्रकारातून कविता प्रस्तूत झाली. 'निवडक मराठी कविता' संग्रहातून आपल्याला कविता वाङ्मयप्रकारच्या अनेकविध गुणवैशिष्ट्यांचा प्रत्यय येतो.

प्रस्तूत निवडक मराठी कविता संग्रहात मराठीतील वेगवेगळ्या कालखंडातील आठ कविंच्या कवितांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्य बहिणाबाई चौधरी, पद्मा गोळे, बा.सी. मर्ढेकर, मंगेश पाडगांवकर, अनुराधा पाटील, अरुण काळे, इंद्रजित भालेराव, वीरधवल परब या कविंच्या कविता अभ्यासात नेमण्यात आल्या आहेत. मराठीत अनेकविध जाणीवांचे कवी आहेत. वेगवेगळ्या कालखंडातील आणि वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्तींच्या कवींच्या कवितांचा समावेश या संग्रहात करण्यात आला आहे. बहिणाबाई चौधरी सारखी निरक्षर स्त्री आपल्या बोलीभाषेतून जीवनाचे सखोल चिंतन मांडते. अनुराधा पाटील, पद्मा गोळे ह्या कवयित्री स्त्रीजीवनाचे वास्तवदर्शी चित्रण करतात. मर्ढेकर, अरुण काळे जागतिकीकरणावर भाष्य करतात तर इंद्रजित भालेराव सारखा कवी येथील कृषी वस्तुतील शेतकऱ्यांच्या प्रश्नांतून अधोरेखित करतो. या

सर्वांच्या वेगळेपणातून हा निवडक कविता संग्रह वैविधतापूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण बनला आहे. त्या गुणवैशिष्ट्यांचा आढावा आपल्याला पुढीलप्रमाणे घेता येईल.

## ८.२ कविता संग्रहाची वैशिष्ट्ये - आधुनिकतेचा प्रभाव

साठोत्तरी कालखंड व त्याच्या पूर्वार्धात मराठी कवितेवर आधुनिकतेचा मोठा प्रभाव असल्याचे दिसून येते. आधुनिकतेतील परालता, अस्तित्ववाद, व्यसतावाद, अतिवास्तववाद, प्रतिकवाद या अशा विविध आधुनिकवादाच्या वाङ्मयीन संकल्पनांचा परिणाम या कवितांतून जाणवतो. आधुनिक युगातील या नव्या समकालीन जाणीवांचा अविष्कार बा.सी. मर्ढेकराच्या कवितांतून होतांना दिसतो. मर्ढेकरांची 'पिपात मेले आल्या उंदिर' यासारखी कविता महायुद्धोत्तर परिस्थितीचे वास्तव चित्रण करते. तसेच 'सकाळी उठोनी चहा-कॉफी घ्यावी' ही कविता तर माणसाच्या जगण्यातील निरर्थकता मांडण्याचा प्रयत्न करते. चाकोरीबद्ध यंत्रावत झालेल्या मानवी जीवनाचे ते यथार्थ वास्तवचित्रण करतात. आशयाबरोबर त्यांची कविता 'नवते'चा आग्रह होत अभिव्यक्तीतून प्रयोगमूल्य जोपासतांना दिसते.

अरुण काळे हा कावी आपल्या कवितांतून वंचितांचे, शोषितांचे दुःख मांडत असला तरीही 'नवकवी' किंवा 'आधुनिक कवी' म्हणून त्याचा उल्लेख करता येतो. 'तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा' या कवितेतून आधुनिक काळात तंत्रज्ञानाच्या साहाय्याने माणूस प्रगती करतो आहे. जग बदलत आहे. मात्र हे होत असताना माणसा-माणसांतील परस्पर संवाद हरवत चालला आहे याचे दुःख मांडले आहे. ते म्हणतात

'तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा'
आणि मल्टिमिडीया की बोर्ड
हा संगणक, ही मेमरी अन्
अपडेट प्रोग्रॅमही तूच दिलेला

नवप्रतिमांतून आधुनिकतेचा प्रभाव या कवितांतून दिसतो. एकुणच मर्ढेकर, काळे यांसारख्या कवींनी आपल्या कवितांतून आधुनिक जीवन जाणीवांचे चित्रण केलेले दिसून येते.

## ८.३ स्त्री जीवनाचा वेध

निवडक मराठी कविता संग्रहातून प्रातिनिधीक कवयित्री बहिणाबाई चौधरी, अनुराधा पाटील, आणि पद्मा गोळे या कवयित्रींच्या कवितांचा समावेश करण्यात आला आहे. त्यांच्या कवितांतून स्त्रीयांच्या भावनाविश्वाचा उलगडा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. स्त्रीमनातील दुःख, दैन्य, मनातील विचारांचे द्वंद्व याचे यथार्थ चित्रण केलेले आहे. निरक्षर असुनही प्रतिभासंपन्न असणाऱ्या बहिणाबाई चौधरी 'संसार' सारख्या कवितेतून अप्रत्यक्षपणे सोशीक असणाऱ्या स्त्रीचे भावविश्व मांडतात त्या म्हणतात सोशीक असणाऱ्या स्त्रीचे भावविश्व मांडतात त्या म्हणतात

munotes.in

अरे संसार संसार
नही रडनं कुढनं
येड्या, गयातला हार
म्हनू नको रे लोढनं

सौभाग्यवतीच्या गळ्यातला हार म्हणजे सौभाग्याचे लेणं होय. त्या मंगळसूत्राला लोढनं म्हणू नये असे बहिणाबाई सांगतात.

कवयित्री पद्मा गोळे यांच्या कविता ह्या स्त्रीप्रधान स्वरुपाच्या आहेत. स्त्रीचे संवेदनशील मन, तिच्या वेदना, कोंडलेपणा, धगधग, स्त्रीयांवर असणारी बंधने या प्रश्नांना त्यांनी आपल्या कवितेतून वाट करुन दिली आहे. 'आम्ही कुलीनांच्या कन्या' या कवितेतून उच्चभ्रु कुटुंबातील स्त्रीयांची मानसिकता व प्रतिनिधित्व केले आहे. चार भितींच्या आतील स्त्रीयांच्या प्रश्नांचा वेध त्यांनी घेतला आहे. कुलीन घराण्यातील मुलींच्या मनाची व्यथा प्रस्तुत कवितेतून मांडली आहे. 'अवखळ ये पोरीसमान' या कवितेतून ही कवयित्री बंधनात असलेली स्त्री स्वच्छंदीपणाची स्वप्ने पहातांना दाखविली आहे. जे प्रत्यक्षात घडणार नाही त्याची स्वप्ने बघुन, कल्पना करुन ती अवखळ पोरीसमान जगण्याचा प्रयत्न करत आहे.

अनुराधा पाटील यांची कविता स्त्री विषयीचे अनुभवात्मक मुलगामी चिंतन करते. स्त्रीचे जगणे, तिच्या भावना, जाणीवा आणि संवेदना विषयी अत्यंत संयमाने त्या स्त्रीयांचे भावविश्व उलगडतात. नियतीच्या तालावरच माणसाला फिरावं लागतं, शरण जावं लागतं यातून निमूटपणे जीवन जगावं लागतं म्हणून कवयित्री ईश्वराच्या अस्तित्वाचा वेध घेते.

या संग्रहातील कविता समस्त्र स्त्रीवर्गाच्या भावविविधतचे प्रतिनिधित्व करतात.

## ८.४ शेतकऱ्यांच्या व्यथा वेदनांचे चित्रण

या संग्रहातील इंद्रजित भालेराव यांची कविता ग्रामसंस्कृती आणि कृषीसंस्कृती यांच्या चित्रणाबरोबरच शेतकऱ्यांचे दुःख, कष्ट तसेच होणारे शोषण यांच्या व्यथा वेदनांची भाषा बोलते. शेतकऱ्यांच्या भोवताली असणारे पीक, पाणी, जमीन, पशुधन हे शेतकऱ्याच्या कष्टाशी संबंधीत आहे. त्यामुळे या रावणाच्या हातांचे वर्णन, भालेराव यांची कविता करते. 'शेतकरी आत्महत्ये' सारख्या ज्वलंत विषयाला हात घालून याची भेदक जाणीव पहिल्यांदा आपल्या कवितेतून भालेरावांनी मांडली. 'झाडा झाडाला विचारा, आत्महत्येच्या कहाण्या' मधुन त्यांनी हे वास्तव मांडले आहे. त्यांच्या 'आषाढीला येते' ही कविता पावसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या आणि भक्तीभावे पंढरपुरच्या वारीत जाणाऱ्या शेतकऱ्याचे वर्णन केले आहे. भालेराव हे शेतकऱ्यांच्या जीवनाशी इतके निगडीत झाले आहेत की, त्यांच्या काव्यात शेतकरी आणि त्याचे जीवनच कवितेतून येते. ते म्हणतात,

'माझ्या कवितेला यावा
शेना-मातीच्या दर्वळ
तिने करावी जतन
काट्याकुटात हिर्वळ'

शेतकरी हा सर्व समाजासाठी जन्मदाता म्हणून कार्य करतो आहे. त्याच्या कष्टाची आणि उपकाराची कृतज्ञ भावना आपल्याला, समाजाला होत नाही याचे शल्यही ते कवितेतून व्यक्त करतात.

## ८.५ जागतिकीकरणाची कविता

जागतिकीकरणामुळे जग अत्यंत झपाट्याने विकासाची गती धरत आहे. पण दुसरीकडे याच जागतिकीकरणात माणसाचे जगणे कसे यंत्रावत होत चालले आहे. हे कवी अरुण काळे यांनी आपल्या कवितेतून मांडले आहे. त्यांच्या 'प्रेमाचे होऊ द्या ना जागतिकीकरण' या कवितेतून, मानवी नातेसंबंध, विभक्त, कुटुंबपद्धती, बाजारुपणा, चंगळवाद, कृत्रीम पाऊस अशा सर्वच विषयांचा ऊहापोह ते या कवितेतून घेतात. जागतिकीकरणात माणूस शून्य होत चालला आहे हे सांगतांना कवी म्हणतो,

'मातेच्या दुधाला मिळतयं मार्केट
माणसाला मिळतेच एक्सेंज ऑफर
पुरोगामी दुकानात चालतयं
कुणाचंही क्रेडिट कार्ड'

यांत्रिकीकरणामुळे मध्यमवर्गीय कारकून नष्ट होत चालला आहे, बाजारुपणा आला आहे याची जाणीव करुन दिली आहे.

कवी वीरधवल परब यांनीही आपल्या कवितेतून ग्लोबल दुनियेत मनुष्य स्वतःलाच कसा हरवत चालला आहे याचा आढावा घेतला आहे. वाढत्या शहरीकरणात खेडी ओसाड होत चालली आहेत. गावातील रुढी, परंपरा ह्या नष्ट होत आहेत. याचीही खंत त्यांनी आपल्या कवितेतून व्यक्त केली आहे.

## ८.६ समारोप

या संग्रहात समाविष्ट करण्यात आलेल्या कविता ह्या आशयाच्या आणि अभिव्यक्तीच्या दृष्ट्या वैविधतापूर्ण तसेच वैशिष्ट्यपूर्ण आहेत. अंतर्भूत कवींना जीवनाच्या सर्वच अंगाना स्पर्श करत आपल्या भावना कवितेतून अविष्कृत केल्या आहेत. त्यामुळे या संग्रहाला एक परिमाण लागले आहे. वैविधतापूर्ण जाणीवांनी या संग्रहाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे असे जाणवते.

❖❖❖❖

munotes.in

सराव प्रश्नपत्रिका-प्रथम वर्ष कला

मराठी (ऐच्छिक)- **द्वितीय सत्र**

(३ तास) (एकूण गुणः १००)

सूचनाः सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.
प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात.

प्र.१ कवितेचे स्वरूप सांगून कवितेची वैशिष्टये स्पष्ट करा. (२०)

**किंवा**

मराठी कवितेची परंपरा सांगून १९८० नंतरच्या कवितेचे विशेष स्पष्ट करा.

प्र.२ 'निवडक मराठी कविता' मधील मंगेश पाडगांवकर यांच्या कवितांचा आढावा घ्या. (२०)

**किंवा**

कवयित्री पद्मा गोळे यांच्या कवितेतून येणारे स्त्री-जीवन स्पष्ट करा.

प्र.३ 'निवडक मराठी कविते'मधील कवी अरुण काळे यांच्या कवितेतील दलित जाणिवा स्पष्ट करा. (२०)

**किंवा**

'निवडक मराठी कविते'मधील कवी इंद्रजित भालेराव यांच्या कवितेतील ग्रामीण जीवन स्पष्ट करा.

प्र.४ प्रत्येक गटातील एक टीप लिहा. (३०)

अ. कवितेच्या भारतीय साहित्यकारांच्या व्याख्या

**किंवा**

कवितेचे प्रकार.

आ. बहिणाबाई यांची कवितेतील सामान्य माणसाचे चित्रण

**किंवा**

बा. सी. मर्ढेकरांची कविता

इ. अनुराधा पाटील यांच्या कवितांचा परामर्श

**किंवा**

वीरधवल परब यांच्या कवितांचा परिचय

प्र. ५. पुढील एकूण १० वस्तुनिष्ठ प्रश्न सोडवा. (१०)

१. बा. सी. मर्ढेकरांच्या 'निवडक मराठी कविता' संग्रहातील कवितांची नावे लिहा.
२. 'दिवस तुझे हे फुलायचे' या कवितेचे कवी कोण आहेत?
३. पद्मा गोळे यांच्या कवितेची नावे सांगा.
४. 'आठवणी येतात' आणि 'माझी अक्षरं भिजतात' या कोणत्या कवयित्रीच्या कविता आहेत?
५. कवी अरुण काळे यांच्या कविता सांगा.
६. 'जोतिराव फुल्यांचे चित्र' या कवितेचे कवी कोण आहेत?
७. 'आषाढीला येते' ही कविता कोणत्या कवीची आहे?
८. संसाराचे वास्तव चित्र बहिणाबाईंच्या कोणत्या कवितेतून आले आहे?
९. ब्राह्मण वर्गातील स्त्रीचे दुःख कवितेतून कोणी मांडले?
१०.'दिवसेंदिवस' ही कविता कोणाची?

munotes.in